NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 51 ) 15th June 2026 ( No. of Pages 32 ) ( No : 06

# ‘नुटा बुलेटीन’चा ‘नुटा बुलेटीन’वरील सुवर्णमहोत्सवी विशेषांक

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| (१) | 'नुटा बुलेटीन' ची ५० वर्षे | प्रा.बी.टी.देशमुख | ५१ |
| (२) | नुटा बुलेटीन : पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक शैक्षणिक दस्तऐवज | प्रा.रमाकांत कोलते | ५४ |
| (३) | स्वगत... नुटा बुलेटीनचे | प्रा.दिनकर वानखडे | ५५ |
| (४) | शैक्षणिक चळवळीच्या पाच दशकाचा साक्षीदार - नुटा बुलेटीन | प्रा.डॉ.विवेक हरिभाऊ हिवरे | ५६ |
| (५) | नुटा संघटनेचे संघर्ष पर्व | डॉ.बी.आर.वाघमारे | ५८ |
| (६) | 'नुटा बुलेटीन' चा आत्मा जतन करायला हवा! | न.मा.जोशी | ५९ |
| (७) | ''फाईलरूपी धनुष्य'' आणि ''रेफरन्सरूपी बाण''अविरत संघर्षाची पन्नास वर्षे | डॉ. प्रवीण श्रीकृष्ण बनसोड | ६१ |
| (8) | Golden Jubilee of NUTA Bulletin: A Saga of Patience, Penance and Perseverance | Dr. N.G. Belsare | 62 |
| (9) | The NUTA Bulletin: A Tribute | Dr. Arun Kumar | 63 |
| (10) | NUTA Bulletin: Fifty Years of a Journey Towards Commitment, Struggle, and Academic Integrity | Prof. Prashant A. Gawande | 64 |
| (11) | On the Golden Jubilee Celebrations of NUTA Bulletin | Dr. Vilas B Dhone | 66 |
| (12) | NUTA BULLETIN TURNS 50 | Dr. Anil Dhage | 67 |
| (13) | The Golden Jubilee of The NUTA Bulletin | P. K. Kotia | 68 |
| (१४) | सुवर्णकाळाचे दस्तऐवजीकरण | डॉ. किशोर फुले | ६९ |
| (१५) | नुटा बुलेटीन : पन्नास वर्षांचा संघर्षशील, वैचारिक आणि ऐतिहासिक प्रवास | प्राचार्य डॉ.काशीनाथ बऱ्हाटे | ७० |
| (१६) | शिक्षण क्षेत्रातील ध्येयवेड्या प्राध्यापकांच्या संघर्षाचा आणि शैक्षणिक चळवळीचा ऐतिहासिक दस्तऐवज : नुटा बुलेटीन | प्रा.डॉ.आर.के.चव्हाण | ७२ |
| (१७) | नुटा बुलेटीन - वार्तापत्र नव्हे एक चळवळ | प्रा.प्रकाश मा.तायडे | ७४ |
| (१८) | ''रोलमॉडेल'' म्हणजे नुटा बुलेटीन | प्राचार्य डॉ.अरविंद देशमुख | ७६ |

# 'नुटा बुलेटीन' ची ५० वर्षे

- प्रा.बी.टी.देशमुख
*माजी विधान परिषद सदस्य व नुटाचे तसेच महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

'नुटा बुलेटीन'ने आपल्या आयुष्याची ५० वर्षे पूर्ण केलेली आहेत हे नमूद करताना मला अत्यंत आनंद होत आहे. संघटनेच्या वतीने सर्व शिक्षकांशी संपर्क साधण्याच्या माध्यमाच्या अभावी येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी लहान लहान पुस्तिका काढण्याची व्यवस्था १९७३ च्या दरम्यान सुरू करण्यात आली होती. *"कॉलेज कोड नव्याने येऊ घातलेले", "प्राध्यापक रस्त्यावर कां आले?", "नवे विद्यापीठ विधेयक : एक कैफियत", "नवीन वेतनश्रेणीबाबतचा शासकीय ठराव : एक निवेदन"* ह्या त्या काळात संघटनेच्या वतीने काढण्यात आलेल्या स्वलिखित पुस्तिका नियतकालिकाच्या अभावी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनियतकालिकांच्या स्वरूपात होत्या हे मान्य करावेच लागेल.

**(२)** तहान लागल्यावर विहीर खणण्याच्या या अनियतकालिक प्रकारातून नियतकालिकाचा विचार पुढे आला. अगदीच नियमितपणे ठरलेल्या वेळीच हे नियतकालिक प्रकाशित होऊ शकणार नाही याची कल्पना असल्यामुळे १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालखंडात एकामागून एकचे पृष्ठ क्रमांक व वर्षाच्या शेवटी अनुक्रमणिका देण्याचा निर्णय झाला. बिनचूक व समप्रकारची संकलन सुलभता हा लाभ त्यातून मिळेल असे त्या वेळी वाटले.

**(३)** सनदी लेखापालांनी अंकेक्षित केलेल्या ३१ मार्च १९७४ रोजी संपलेल्या संघटनेच्या 'उत्पन्न व खर्च लेख्या' मध्ये खर्चाच्या बाजूला रुपये २३३९.२७ दाखविण्यात आले असून त्यातसुद्धा उत्पन्नाच्या बाजूला ८०२.०० रुपये ही 'उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झालेली रक्कम' म्हणून दाखविलेली आहे. वर्षाकाठी एकूण २४०० रुपयेसुद्धा खर्च करण्याची शक्ती नसल्याने मुद्रण ही गोष्ट आवाक्याबाहेर वाटत होती व तशी ती होतीही.

**(४)** आवाका येईपर्यंत वाट पाहत बसण्यापेक्षा आवाक्यात येईल त्या पद्धतीने काम सुरू करावे असे ठरले व त्यामुळे १९७६ मध्ये एकामागून एक चक्रमुद्रित पृष्ठे प्रसृत व्हायला लागली. छापून काढणे महाग पडणार म्हणून चक्रमुद्रित प्रसारण सुरू झाले. १९७६ मध्ये अशी १ ते ८३ पृष्ठे प्रसारित करण्यात आली. १९७७ या वर्षातील सुरुवातीची १ ते ६३ पृष्ठे ही चक्रमुद्रित स्वरुपातच प्रसृत करण्यात आली. 1977-G.B.File-1 to 63 अशी पृष्ठांकनाची पद्धती होती. (G.B. for General Body)

**(५)** दिनांक १५ ऑगस्ट १९७७ रोजी नुटा बुलेटीनचा पहिला मुद्रित अंक प्रकाशित करण्यात आला. या पहिल्या मुद्रित अंकामध्ये पृष्ठ ६५ वर पुढील सूचना सभासदांसाठी प्रसृत करण्यात आली होती :-

*"**NUTA Bulletin :** ऑगस्ट १९७७ पासून NUTA G.B. File सर्व्हिस यापुढे बंद करण्याचे कार्यकारी मंडळाने ठरविले असून हीच सर्व्हिस यापुढे NUTA Bulletin च्या द्वारे देण्याचे योजिले आहे, याची कृपया सभासदांनी नोंद घ्यावी. पृष्ठ क्रमांक देण्याची पद्धती मात्र पूर्वी सारखीच राहील – **नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार**"*

**(६)** नुटाबुलेटीनचा १५ ऑगस्ट १९७७ ला प्रसिद्ध झालेला अंक हा मुद्रित स्वरूपातील पहिला अंक असला तरी त्यापूर्वी त्या वर्षात ६३ पृष्ठे चक्रमुद्रित स्वरूपात प्रसिद्ध झालेली असल्याने "पृष्ठ क्रमांक देण्याची पद्धती मात्र पूर्वीसारखीच राहील" या निर्णयाप्रमाणे पहिल्या मुद्रित अंकाच्या पहिल्या पानावर त्यावर्षातील पृष्ठ क्रमांक ६४ पडला. याच न्यायाने त्या अंकावर "वर्ष २ रे" पडले. सन २०२५ ह्या संपलेल्या वर्षासोबत 'नुटा बुलेटीन'ने आपले अर्धे शतक पूर्ण केले. या अर्ध शतकामध्ये 'नुटा बुलेटीन'ने केलेल्या कामगिरीचा आढावा हा स्वतंत्र लेखमालेचा विषय आहे. म्हणून त्या भागाकडे वळत नाही.

**(७)** नुटा बुलेटीन मध्ये प्रसिद्ध करण्यासाठीच्या मजकुराची निवड करण्याची बाब ही १९७७ मध्ये नियमबद्ध करण्यात आली आहे. ही व्यवस्था पुढील प्रमाणे आहे. :-

*"(A) नुटाच्या आमसभेने किंवा कार्यकारी मंडळाने ठराव करून जी कागदपत्रे (Documents) प्रसिद्ध करावी असे ठरविले ती कागदपत्रे किंवा (B) नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या सात सदस्यांनी जी कागदपत्रे बुलेटीनमध्ये प्रसिद्ध करावी असे लेखी कळविलेले असेल ती किंवा (C) अध्यक्ष किंवा सचिवांना योग्य वाटतील ती कागदपत्रे बुलेटीनमध्ये प्रसिद्ध केल्या जातील."* असे त्या नियमात नमूद आहे. (१९७७ च्या इ-एक्स फाईलचे पृष्ठ ७२) क्वचित प्रसंगी आमसभेने किंवा कार्यकारी मंडळाने ठराव करून विशिष्ट कागदपत्रे प्रसिद्ध करण्याचे निदेश दिल्याची उदाहरणे आहेत, हे खरे असले तरी प्रकाशित करावयाचा बहुतांशी मजकूर अध्यक्षांनीच निश्चित केलेला असतो.

**(८)** बुलेटीनसाठीचा मजकूर एकदा निश्चित झाल्यानंतरच खरे काम सुरू होते. मुद्रणालयामध्ये अक्षरजुळवणी, मुद्रित शोधन, पृष्ठ बांधणी हे अत्यंत जिकिरीचे, दगदगीचे व थकवा आणणारे काम असते. १९७७ मध्ये मुद्रित स्वरूपात बुलेटीन सुरू झाल्यानंतर अमरावती येथे प्रा.बी.बी. हेडा व प्रा.व्ही.के.वसू यांनी ही जबाबदारी सांभाळली. मुद्रणालयाकडून मिळणारे अपुरे सहकार्य व त्यांच्याजवळ असलेली अपुरी व्यवस्था यामुळे पुढच्या १-२ वर्षांत हे काम नागपूरला हलवावे लागले. हिंद मुद्रणालय व नागपूर टाईम्स प्रेसच्या मदतीने कोषाध्यक्ष डॉ. अरुण सातपुतळे यांनी ही जबाबदारी त्या काळात पार पाडली. कार्यवाह प्रा.अरविंद बारहाते यांच्या नागपूर टाईम्स प्रेसमधील कर्त्या व्यक्तींशी असलेल्या स्नेहबंधाचा या कामी खूपच उपयोग झाला. १९८४ नंतरच्या २-४ वर्षांच्या काळात हे काम यवतमाळ येथे हलवावे लागले. भारत मुद्रणालयामार्फत डॉ. शरद कळणावत यांनी ही जबाबदारी पार पाडली. १९८७-८८ च्या दरम्यान ईलेक्ट्रॉनिक टाईपिंग, फोटो टाईप सेटिंग व नुकत्याच येत असलेल्या डी.टी.पी. व्यवस्थेच्या मार्फत पुन्हा हे काम अमरावती येथे करवून घेण्याचे सुरू झाले व ती जबाबदारी प्रा.बी.बी.हेडा यांनी सांभाळली. १९९१ पासून प्रा.आर.चित्तरंजन यांनी हे काम सांभाळले. १९९५ पासून प्रा.अनिल सोमवंशी यांनी ही जबाबदारी सांभाळली. सुरुवातीच्या या काळात 'नुटा बुलेटीन'च्या सशक्त होण्यासाठी जे श्रम या सहकाऱ्यांनी वेचले त्याबद्दलचा ऋणनिर्देश होणे आवश्यक आहे.

**(९)** संपर्क माध्यम म्हणून बुलेटीनची उपयुक्तता जसजशी वाढत गेली तसतशी बुलेटीनची पृष्ठसंख्यासुद्धा वाढत गेली. मुद्रणालयामध्ये जाऊन मुद्रितशोधनाची यातायात टाळण्याच्या हेतूने नव्यानेच उपलब्ध होऊ पाहत असलेली संगणकाधारित मुद्रण पूर्व प्रकाशन यंत्रणा संघटनेच्या कार्यालयात का बसवू नये? असा विचार १९९१-९२ च्या दरम्यान पुढे आला. अमरावती महानगरपालिकेच्या अनुदान सूत्राबाबत काढलेल्या नुटा बुलेटीन विशेषांक (१९९१ चे नुटा बुलेटीन पृष्ठ १ ते २०) तसेच नुटा बुलेटीन जलसिंचन अनुशेष विशेषांक (१९९२ चे नुटा बुलेटीन पृष्ठ क्रमांक १ ते ३२) या दोन विशेषांकांच्या जाहिरातीतून आलेल्या एकूण उत्पन्नातून त्या अंकांचा खर्च वजा जाता शिल्लक उरलेल्या रकमेचा उपयोग या कामासाठी करावा असे ठरले. अमरावती राज्यशास्त्र मंडळाच्या वतीने अध्यक्ष प्रा.प.सि.काणे व सचिव प्रा.राम काकाणी यांनी दिलेली ११,१०१ रुपयाची देणगीसुद्धा या कामी अत्यंत उपयोगाची ठरली.

**(१०)** संगणकाधारित मुद्रणपूर्व प्रकाशन यंत्रणा (DTP) नुटा बुलेटीनसाठी कार्यालयामध्ये स्थापित करण्याबाबतचा एक तपशीलवार प्रस्ताव नुटाच्या कार्यकारी मंडळाने विचारात घेतला. (*P97EX1994*) त्याप्रमाणे या कामासाठी एक समिती नेमण्यात आली. या समितीमध्ये प्रा.सी.के.दामले, प्रा.जी.एन.वानखडे व प्रा.एस.बी.लोहिया या तीन ज्येष्ठ प्राध्यापकांच्याकडे संगणकाधारित मुद्रणपूर्व प्रकाशन यंत्रणेची (DTP) योजना करण्याची बाब सोपविण्यात आली. या समितीने वारंवार बैठका घेऊन अल्पकाळात याबाबतच्या तपशीलाला अंतिम

स्वरूप दिले व त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवाहीसुद्धा झाली. संगणकाधारित मुद्रणपूर्व प्रकाशन यंत्रणा (DTP) उत्तमरीतीने चालू ठेवण्यासाठी मनुष्यबळाचा विचार करण्यासाठी प्रा.श्रीधर चिंचमलातपुरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीने मनुष्यबळाच्या आवश्यकतेचा यथोचित प्रस्ताव तयार केला. त्याचा आर्थिक भार सहन करणे जवळजवळ अशक्य आहे अशाप्रकारची आम्हा सर्वांची भावना झाली व तो प्रस्ताव काही अंमलात आला नाही. एक तात्पुरती व्यवस्था म्हणून विधानमंडळ सदस्य या नात्याने प्रा.बी.टी.देशमुख यांना उपलब्ध असलेल्या स्वीय सहायकामार्फत या कामी मदत घ्यावी असा निर्णय झाला व त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करण्यात आली व ती यशस्वीरीत्या कार्यरत झाली.

**(११)** नुटा बुलेटीनसाठी कार्यालयाची जागा म्हणून अगदी सुरुवातीला कोणतेही ठिकाण उपलब्ध नव्हते. पहिले वर्ष दोन वर्षे अमरावती रेल्वे स्टेशनच्या समोर असलेल्या शांताराम पहेलवान यांच्या टायपिंग इन्स्टिट्यूटमध्ये बसून आम्ही चार-पाच लोक या कामाचा निपटारा करीत होतो. रोज कागदपत्र सोबत घेऊन जाणे व ती कागदपत्रे घरी परत घेऊन येणे यांमुळे आमचे होणारे हाल पहावेनात म्हणून नुटाच्या अमरावती जिल्हा युनिटचे अध्यक्ष प्रा.रघुनाथराव तट्टे यांनी जिल्हा शाखेतर्फे एक गोदरेजची आलमारी या कामासाठी भेट म्हणून दिली. शांताराम यांचेकडून ती आलमारी टायपिंग इन्स्टिट्यूटमध्ये ठेवण्याची परवानगीही तट्टे सरांनीच मिळविली. त्या आलमारीच्या आधारेच पहिले वर्ष दोन वर्षे बुलेटीनचा कारभार सुरू होता. पुढे नुटा बुलेटीनसाठी पुंडकर भवनाची जागा उपलब्ध झाली व ती गोदरेजची आलमारी त्याजागी हलविण्यात आली. आता ती आलमारी नुटा बुलेटीनच्या कार्यालयातच आहे. जवळजवळ सन २००५ पर्यंत रोज दिवसाच्या ठरवून दिलेल्या वेळी पुंडकर भवन येथील कार्यालयात मी स्वतः रोज नियमितपणे बसून नुटा बुलेटीनचे काम पाहत असे. पुढे २००५ मध्ये सभागृहात भाषण करताना मनाचा क्षोभ हृदयाला सहन न झाल्यामुळे मला हॉस्पिटलमध्ये भरती व्हावे लागले. अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी नंतर प्रकृती धड झाली हे खरे असले तरी रोज पुंडकर भवनची बैठक शक्य होणार नाही असे स्पष्ट दिसून आले. त्यानंतर बुलेटीनचा हा संसार माझ्या राहत्या निवासस्थानी पहिल्या मजल्यावरील जागेत थाटण्यात आला व तो तेव्हापासून आजपर्यंत तेथेच आहे.

**(१२)** १९९४ या वर्षाच्या शेवटी संगणकाधारित मुद्रणपूर्व प्रकाशन यंत्रणा बुलेटीन कार्यालयामध्ये बसविण्याचे काम जवळजवळ पूर्ण होत आले होते. दिनांक १ जानेवारी १९९५ रोजी अध्यक्ष या नात्याने कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांना पाठविलेल्या पत्राच्या (NUTA-1995-EX Page 1 & 2) सुरुवातीलाच मी असे नमूद केले होते की :-

"नुटाच्या कार्यालयामध्ये संगणकाधारित मुद्रणपूर्व प्रकाशन यंत्रणा उत्तम रीतीने कार्यान्वित झालेली आहे हे आपणास कळविताना मला अत्यंत आनंद वाटतो. उक्त यंत्रणा कार्यालयामध्ये बसविण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाने दिनांक ११ सप्टेंबर १९९४ च्या बैठकीमध्ये घेतल्यानंतर या कामासाठी नेमलेल्या समितीने ताबडतोब दुसऱ्याच दिवशी (१२.९.९४) बैठक घेवून या कामाला सुरुवात केली. १२.९.९४ च्या पहिल्या व १५.९.९४ च्या दुसऱ्या बैठकीत या समितीने आपल्या कृतिकार्यांच्या निर्णयाला अंतिम स्वरूप देऊन पूर्ण प्रकल्प पुढील एक महिन्यामध्ये उभा केला. या समितीने आपल्या कामाचा अहवाल स्वतंत्रपणे कार्यकारी मंडळाच्या विचारार्थ व निर्णयार्थ ठेवला असून त्या अहवालावरून समितीने केलेल्या कामाची आपणास कल्पना येईलच. १९९४ च्या ऑक्टोबर महिन्याच्या २० ते २५ तारखेच्या दरम्यान यंत्रणेच्या चाचण्या सुरू झाल्या व त्या यशस्वी ठरल्या. चाचणी उत्पादनाच्या या कालखंडामध्ये १९९४ च्या बुलेटीनच्या शेवटच्या अंकातील चार पृष्ठे (पृष्ठ ६१ व ६२ आणि ७१ व ७२) व १९९४ च्या अनुक्रमणिकेची ४ पृष्ठे अशी एकूण आठ पृष्ठे ही आपल्या यंत्रणेवर काढण्यात आली. १९९४ च्या ई-एक्स फाईलमधील १०९ ते १२० ही बारा पृष्ठे सुद्धा आपल्या यंत्रणेवरच काढण्यात आलेली आहेत व हे काम आता नीटपणे सुरू झालेले आहे."

**(१३)** १९९४ च्या शेवटी शेवटी 'बांधकाम' पूर्ण झालेले असले तरी त्याचे औपचारिक उद्‌घाटन झालेले नव्हते. याबाबत माझ्या उपरोक्त पत्रातील शेवटचा परिच्छेद पुढील प्रमाणे होता. :-

"लहानशा औपचारिक कार्यक्रमामध्ये या यंत्रणेचे उद्‌घाटन फक्त कार्यकारी मंडळ सदस्यांच्या उपस्थितीत करावे असे मी योजीलेले आहे. नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीच्या दिवशीच म्हणजे रविवार, दिनांक १५ जानेवारी १९९५ रोजी असा कार्यक्रम घेण्याचे ठरविले असून त्याचे निमंत्रण आपणास स्वतंत्रपणे पाठविण्यात येत आहे. आपण अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे. नवीन वर्षाच्या मनःपुर्वक शुभेच्छा."

**(१४)** संगणकाची ही यंत्रणा व त्याची हाताळणी ही आम्हा सर्वांसाठी त्यावेळी नवीनच होती. पुरेसा मोठा समारंभ करून पुढे लहानसे सुद्धा काम न होण्याच्या भीतीतून लहानसा समारंभ करून पुरेसे काम करण्याच्या रीतीचा आश्रय घ्यावा असे ठरले. नुटाच्या फक्त कार्यकारी मंडळ सदस्यांच्या उपस्थितीत रविवार, दिनांक १५ जानेवारी १९९५ रोजी या यंत्रणेचे औपचारिक उद्‌घाटन झाले. उद्‌घाटक गुरुवर्य प्राचार्य प.सि.काणे यांनी संगणकाची कळ दाबताच बाहेर पडलेले पहिले पृष्ठ म्हणजे सन १९९५ च्या EX-file चे पृष्ठ क्रमांक १४ होय.

**(१५)** उद्‌घाटन झाल्यापासून आजतागायत ही यंत्रणा उत्तमरितीने कार्यरत आहे. तीला आणखी अद्यावत करण्याचा प्रस्तावही कार्यकारी मंडळासमोर आहे. नुटा बुलेटीनला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने काही विशेषांकांची मालिकाच काढण्याचा तपशीलवार निर्णय आमसभेने यापूर्वीच घेतला आहे.

**(१६)** नुटा बुलेटीन प्रत्येक वेळी प्रकाशित होण्यापूर्वी त्यातील सर्व मजकुराची बिनचूकता उत्तम दर्जाची असावी याची काळजी माझे सहकारी सतत घेत असतात. व्याकरणदृष्ट्या सुद्धा दोष राहू नये यासाठीचा तो प्रयत्न असतो. प्रा.सतेश्वर मोरे हे अनेक दिवस या कामात लक्ष घालून होते. त्यांच्यानंतर प्राचार्य डॉ.काशीनाथ बऱ्हाटे यांनी ही जबाबदारी स्वीकारली आहे. त्यामुळेच प्रत्येक वेळेला बिनदोष अंक बाहेर पडण्याची खात्री असते.

**(१७)** नुटा बुलेटीनच्या वाटचालीविषयीचा हा लेख संपविताना नुटाचे अध्यक्ष प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी यांच्या महत्त्वपूर्ण सहभागाचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. त्यांच्या या सहभागामुळे बुलेटीनचे संचारक्षेत्र व आकारमान वृद्धींगत झाले.

**(i)** त्यांनी सर्व तांत्रिक बाबींचा आढावा घेऊन नुटा बुलेटीनला संकेतस्थळावर (www.nuta.in) स्थापित केले. संकेतस्थळावर बुलेटीन उपलब्ध व्हायला लागले व त्यामुळे बुलेटीनचे संचारक्षेत्र एकदम अमर्याद झाले.

**(ii)** संकेतस्थळाच्या निर्मितीमुळे एका बाजूला बुलेटीनचे संचारक्षेत्र समृद्ध झाले, तर दुसऱ्या बाजूला विधानमंडळातून प्रश्न सुटण्याचा मार्ग जवळ जवळ बंद झाल्यामुळे उच्च न्यायालयाचा मार्ग धरावा लागला. सिनिअर ॲडव्होकेट श्री.फिरदोस मिर्झा यांचे मार्गदर्शन त्यांनी या कामी मिळविले. परिणामी बुलेटीनच्या प्रकाशनाच्या विविध नव्या व्यवस्था उभ्या करून बुलेटीनच्या आकारमानाची समृद्धी वाढविण्याचा निर्णय सुद्धा त्यांनी घेतला.

**(iii)** दिनांक १३ मे २०१२ रोजी एम.एम.सायन्स कॉलेज, नागपूर येथे झालेल्या नुटाच्या आमसभेमध्ये विषय क्रमांक ५७३ अन्वये ठराव *(50/2012)* करून नुटा बुलेटीनला मार्गदर्शनाचे काम पूर्वीप्रमाणे प्रा.बी.टी.देशमुख यांनी सुरू ठेवावे असे ठरविले. असे असले तरी व्यक्तिशः माझे मत त्यावेळी असे होते आणि आजही असेच आहे की, नुटा बुलेटीनमधून प्रकाशित होणारा प्रत्येक मजकूर हा अध्यक्षांच्या अवलोकनानंतरच प्रकाशित व्हावा कारण शेवटी त्याबाबतची जबाबदारी ही अध्यक्षांना स्वीकारावी लागते. बुलेटीनच्या प्रकाशनात गेल्या १५ वर्षांमध्ये आम्हा दोघांच्या अनेक अनौपचारिक बैठका झाल्या. बुलेटीनच्या कामासाठी ठरलेल्या वेळी गेल्या १५ वर्षात अशा बैठकीसाठी एकदाही प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी हे एक मिनिट सुद्धा उशिराने आल्याचे मला आठवत नाही.

**(iv)** नुटा बुलेटीनचा सुवर्ण महोत्सवी विशेषांक काढावा ही कल्पना सुद्धा त्यांचीच आहे. सुवर्ण महोत्सवानिमित्त काढावयाच्या अनेक विशेषांकाच्या कामात माझ्या चित्तवृत्ती अडकून पडलेल्या असताना त्यांनी एके दिवशी सुवर्ण महोत्सवी विशेषांक काढण्याचा विचार मांडला व तसे करतांना त्याबाबतचा संपूर्ण आराखडा त्यांच्या जवळ तयार होता असे दिसून आले. आणि त्यामुळे इतर विशेषांकाचे काम थांबवून या विशेषांकाचे काम हाती घेण्याचा निर्णय झाला.

**(१८)** आता ५० वर्षाच्या या प्रपंचाचा वर्षवार तपशील मी नमूद करू इच्छितो. नुटा बुलेटीनच्या ५० वर्षाच्या कालखंडाचे १०-१० वर्षाचे ५ खंड या कामासाठी करण्यात आले असून त्या त्या वर्षात किती अंक निघाले व त्या अंकात किती पृष्ठे समाविष्ट होती याचे तपशील पुढीलप्रमाणेः-

**(i) १९७६ - १९८५**

**(१) १९७६ : पृष्ठे** ८३ **(२) १९७७ : पृष्ठे** ११७ **(३) १९७८ : पृष्ठे** १४९ **(४) १९७९ :** (१) ६४ (२) १२ (३) ६ (४) ८ (५) १८ (६) १२ (७) १२ (८) ७ : **पृष्ठे १३९ (५) १९८० : पृष्ठे** ५४ **(६) १९८१ :** (१)

४ (२) २ (३) १० (४) ४ (५) ४ (६) ४ (७) २ (८) ४ (९) ४ (१०) ६ : **पृष्ठे ४४ (७) १९८२ :** (१) ४ (२) ६ (३) २ (४) २ (५) १४ (६) २ (७) २ (८) २ : **पृष्ठे ३४ (८) १९८३ :** (१) २४ (२) ८ (३) ४ (४) ८ (५) ४ (६) ४ (७) ४ : **पृष्ठे ५६ (९) १९८४ :** (१) २ (२) ४ (३) ८ (४) ८ : **पृष्ठे २२ (१०) १९८५ :** (१) ८ (२) २ (३) ८ (४) १० (५) ४ (६) ४ (७) २ : **पृष्ठे ३८. या १० वर्षात प्रसृत करण्यात आलेली एकूण पृष्ठसंख्या : ५८७**

### (ii) १९८६ - १९९५

**(११) १९८६ :** (१) ४ (२) २२ (३) ८ (४) ४ (५) ६ (६) २० : **पृष्ठे ६४ (१२) १९८७ :** (१) ४ (२) ४ (३) ४ (४) ८ (५) ८ (६) ६ (७) ४ (८) ८ (९) ४ (१०) ८ (११) ८ : **पृष्ठे ६६ (१३) १९८८ :** (१) ४ (२) ८ (३) ४ (४) ८ (५) ४ (६) १६ (७) १२ (८) ४ (९) १६ (१०) १५ : **पृष्ठे ९१ (१४) १९८९ :** (१) १६ (२) १८ (३) ८ (४) ६ (५) १० : **पृष्ठे ५८ (१५) १९९० :** (१) ६ (२) ४ (३) ८ (४) ८ (५) १४ (६) २ : **पृष्ठे ४२ (१६) १९९१ :** (१) २० (२) ६ (३) ४ (४) ८ (५) २ : **पृष्ठे ४० (१७) १९९२ :** (१) ३६ (२) ४ (३) ८ (४) ६ (५) ८ (६) १८ (७) ४ : **पृष्ठे ८४ (१८) १९९३ :** (१) ४ (२) ४ (३) २० (४) ८ (५) ४ (६) ४ (७) ४ (८) ४ : **पृष्ठे ५२ (१९) १९९४ :** (१) १६ (२) २४ (३) १२ (४) ८ (५) १२ : **पृष्ठे ७२ (२०) १९९५ :** (१) १६ (२) ८ (३) ८ (४) १२ (५) १२ (६) ८ : **पृष्ठे ६४. या १० वर्षात प्रसृत करण्यात आलेली एकूण पृष्ठसंख्या : ६३३**

### (iii) १९९६ - २००५

**(२१) १९९६ :** (१) १२ (२) १६ (३) १२ (४) ७२ (५) २० (६) १६ : **पृष्ठे १४८ (२२) १९९७ :** (१) २० (२०) (३) ८ (४) १२ (५) १४ (६) ८६ (७) ४० (८) १२ : **पृष्ठे २१२ (२३) १९९८ :** (१) ८ (२) १२ (३) २० (४) २० (५) ८ (६) ८ (७) ८ (८) ८ (९) १६ (१०) १६ (११) १२ : **पृष्ठे १३६ (२४) १९९९ :** (१) ८ (२) ८ (३) १६ (४) ८ (५) १२ (६) १६ (७) १६ (८) २० (९) १६ (१०) २४ (११) १२ (१२) १६ : **पृष्ठे १७२ (२५) २००० :** (१) २० (२) १६ (३) १२ (४) १६ (५) २० (६) १२ (७) १२ (८) १२ : **पृष्ठे १२० (२६) २००१ :** (१) १२ (२) १६ (३) १६ (४) ८ (५) २० (६) १२ (७) ८ (८) १२ (९) ८ : **पृष्ठे ११२ (२७) २००२ :** (१) १६ (२) १६ (३) १६ (४) २० (५) १२ (६) १२ : **पृष्ठे ९२ (२८) २००३ :** (१) १६ (२) २८ (३) ३२ (४) २० (५) १६ (६) १२ : **पृष्ठे १२४ (२९) २००४ :** (१) २४ (२) २० (३) १२ (४) १६ (५) २४ (६) २० (७) २० (८) ८ (९) ८ : **पृष्ठे १५२ (३०) २००५ :** (१) १२ (२) १२ (३) २४ (४) १२ (५) ३२ (६) ८ (७) १२ (८) ८ (९) १६ : **पृष्ठे १३६. या १० वर्षात प्रसृत करण्यात आलेली एकूण पृष्ठसंख्या : १४०४**

### (iv) २००६ - २०१५

**(३१) २००६ :** (१) १२ (२) १६ (३) १६ (४) १२ (५) ८ (६) १६ (७) २४ (८) १६ : **पृष्ठे १२० (३२) २००७ :** (१) १६ (२) २४ (३) २० (४) २० (५) १२ (६) ४८ (७) ८ : **पृष्ठे १४८ (३३) २००८ :** (१) १२ (२) २८ (३) २० (४) १२ (५) १६ (६) १२ (७) १२ (८) १२ (९) ८ (१०) १६ (११) ८ (१२) १६ : **पृष्ठे १७२ (३४) २००९ :** (१) १६ (२) १६ (३) ८ (४) २४ (५) २४ (६) १२ (७) १२ (८) ८ (९) २० (१०) १२ (११) ८ (१२) ८ (१३) १६ (१४) ३६ (१५) २० : **पृष्ठे २४० (३५) २०१० :** (१) १२ (२) १२ (३) १६ (४) १६ (५) १६ (६) १२ (७) ८ (८) ८ (९) १६ (१०) २० (११) २० : **पृष्ठे १५६ (३६) २०११ :** (१) १२ (२) ८ (३) १२ (४) १२ (५) ८ (६) २० (७) १२ (८) २० (९) १२ (१०) १६ (११) १२ : **पृष्ठे १४४ (३७) २०१२ :** (१) १६ (२) ८ (३) ८ (४) १२ (५) ८ (६) ८ (७) ८ (८) ८ (९) १२ (१०) ८ (११) ८ : **पृष्ठे १०४ (३८) २०१३ :** (१) ८ (२) ८ (३) १६ (४) १२ (५) ८ (६) ८ (७) २४ (८) २० (९) ८ (१०) २४ (११) ८ (१२) ८ (१३) ५२ (१४) ८ (१५) २४ (१६) १६ : **पृष्ठे २५२ (३९) २०१४ :** (१) ८ (२) १२ (३) २० (४) ३२ (५) १६ (६) १६ (७) १२ (८) २० (९) ८ (१०) ८ (११) १६ (१२) ८ (१३) १२ (१४) १६ : **पृष्ठे २०४ (४०) २०१५ :** (१) ८ (२) १२ (३) २० (४) २० (५) ८ (६) ८ (७) १२ (८) १२ (९) २४ (१०) १६ (११) १६ (१२) ५२ : **पृष्ठे २०८. या १० वर्षात प्रसृत करण्यात आलेली एकूण पृष्ठसंख्या : १७४८**

### (v) २०१६ - २०२५

**(४१) २०१६ :** (१) २४ (२) १२ (३) २४ (४) ८ (५) १२ (६) १६ (७) १२ (८) १२ (९) १६ (१०) २० (११) १२ (१२) १६ (१३) ८ (१४) ८ : **पृष्ठे २०० (४२) २०१७ :** (१) १६ (२) १६ (३) १२ (४) ५६ (५) १२ (६) १२ (७) ८ (८) ८ (९) ८ (१०) ८ (११) ८ (१२) ८ (१३) ८ (१४) २० (१५) ८ (१६) ८ : **पृष्ठे २१६ (४३) २०१८ :** (१) ८ (२) १२ (३) १२ (४) १२ (५) ८ (६) २४ (७) २४ (८) १२ (९) १२ (१०) १६ (११) १६ : **पृष्ठे १५६ (४४) २०१९ :** (१) ८ (२) १६ (३) १२ (४) २० (५) २० (६) ८ (७) १२ (८) १२ (९) १२ (१०) १२ (११) १२ (१२) २४ (१३) ८ (१४) ४४ (१५) ८ : **पृष्ठे २२८ (४५) २०२० :** (१) १२ (२) २० (३) ८ (४) २० (५) ८ (६) १२ (७) १२ (८) २० (९) २४ (१०) ८ (११) १२ (१२) १६ (१३) १२ (१४) ६० : **पृष्ठे २४४ (४६) २०२१ :** (१) २० (२) १६ (३) २० (४) १२ (५) ९२ (६) २४ (७) ८ (८) १२ (९) २० (१०) ८ (११) ४० (१२) २० (१३) ८ : **पृष्ठे ३०० (४७) २०२२ :** (१) १२ (२) ६० (३) ८ (४) १६ (५) ८ (६) २० (७) १२ (८) ८ (९) ८ (१०) २४ (११) ८ (१२) १०० (१३) १६ : **पृष्ठे ३०० (४८) २०२३ :** (१) ८ (२) १२ (३) ८ (४) ८ (५) १६ (६) १६ (७) ८ (८) १२ (९) २४ (१०) १६ (११) ८ (१२) २४ (१३) १२ (१४) १६ : **पृष्ठे १८८ (४९) २०२४ :** (१) ८ (२) ८ (३) २८ (४) १६ (५) २८ (६) ८ (७) ३६ (८) ८ (९) ८ (१०) १२ (११) १२ (१२) ८ (१३) २४ (१४) ५२ (१५) ८ (१६) १६ : **पृष्ठे २८० (५०) २०२५ :** (१) ८ (२) २० (३) ८ (४) २४ (५) ३२ (६) ८ (७) १६ (८) १२ (९) ४ (१०) ८ (११) ४ (१२) ४ (१३) ८ (१४) ८ (१५) ८ (१६) ५६ (१७) १२ (१८) ९६ (१९) १२ : **पृष्ठे ३४८. या १० वर्षात प्रसृत करण्यात आलेली एकूण पृष्ठसंख्या : २४६०**

**(१९)** रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त काढलेले विशेषांक व शब्दयुद्ध विशेषांक यांची आकडेवारी पूर्वपरिच्छेदामध्ये समाविष्ट नाही. प्रा.अनिल सोमवंशी, प्रा.सुशील काळमेघ व प्रा.सुभाष गवई यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००१ मध्ये काढण्यात आलेल्या विशेषांकाची व शब्दयुद्ध विशेषांकाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.:-

**२००१ - विशेषांक** : (१०) ४० (११) ५२ (१२) २८ (१३) ९२ (१४) ४० (१५) ६८ (१६) ४८ (१७) २८ (१८) २८ (१९) ३६ (२०) २८ : **पृष्ठे ४८८**

**२००१ - शब्दयुद्ध विशेषांक :** (A) ५२ (B) ८८ (C) ८८ (D) ८८ (E) ८८ (F) ८८ (G) ८८ (H) १०० (I) ९६ (J) ८० (K) ९६ (L) ९२ (M) ९६ (N) ९६ (O) ९२ : **पृष्ठे १३२८**

**(२०)** मुद्रण ही प्रगत अवस्थेला पोहचलेली जगातील अतिशय संपन्न कला आहे आणि इतर अन्य कलांप्रमाणेच मुद्रण कलेशी मानवी जीवनाचा अनेक शतके अतूट संबंध जोडल्या गेला आहे. मुद्रणस्थळ हे आहे शस्त्रागार अफवांच्या कुजबुजीपासून निर्भय सत्याचे संरक्षण करणारे. येथून शब्द सर्व जगभर संचार करू शकतात. चार भिंतींच्या आत चाललेल्या कारस्थानांना प्रकाशात खेचून आणता येते ते मुद्रित शब्दांच्या आधारानेच. आमच्या सेवाशर्तीवर हल्ला चढविणारे १९७३ चे "कॉलेज कोड नव्याने येऊ घातलेले" हाणून पाडण्यात आम्हाला केवढी मदत झाली त्या मुद्रित शब्दांची! ७३ ची वेतनश्रेणी लागू करताना शासनाने केलेल्या अन्यायाच्या निवारणार्थ "प्राध्यापक रस्त्यावर कां आले" हे सांगण्यासाठी आम्ही शस्त्र म्हणून वापरले ते मुद्रित शब्दच ना ? १९७४ च्या विद्यापीठ कायद्यातील प्रतिकूलता काढून टाकण्यासाठी "नवे विद्यापीठ विधेयक" या मुद्रित शब्दांची मदत घ्यावी लागली आम्हाला. संकट येईल तेव्हा पुस्तिका काढण्याचा प्रकार हा संकटाला तोंड देण्याचा योग्य प्रकार नव्हे असा विचार करून १९७६ मध्ये नुटा बुलेटीनचा जन्म झाला. गेल्या ५० वर्षात आमच्यावर आलेल्या प्रत्येक संकटाच्यावेळी नुटा बुलेटीन ढाल म्हणून उभे राहिले.

*****　　*****　　*****

# नुटा बुलेटीन : पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक शैक्षणिक दस्तऐवज

**- प्रा.रमाकांत कोलते,**

*जिजाऊ नगर, यवतमाळ भ्रमणध्वनी : ९८५०३२१२१३*

प्रामुख्याने उच्च शिक्षणातील शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थापन झालेली संघटना म्हणजे 'नुटा'. या संघटनेने शिक्षकांशी निगडित बाबी प्रकाशित करण्यासाठी नुटा बुलेटीन सुरू केले. या घटनेस आता पन्नास वर्षे पूर्ण झाली. नुटा बुलेटीनचा हा सुवर्णमहोत्सवी प्रवास म्हणजे विचार, संघर्ष आणि बांधिलकीचा ध्यास आहे.

ही संघटना शिक्षकांच्या हक्कांबाबत अत्यंत जागरूक आहे. शिक्षकांवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, न्याय मागण्यांसाठी शिक्षकांना संघटित व्हावे लागले. सुरुवातीला विदर्भात केवळ एकच विद्यापीठ होते. ते म्हणजे नागपूर विद्यापीठ. त्यामुळे या संघटनेला नुटा (NUTA - Nagpur University Teachers' Association) हे नाव पडले. १९८३ साली अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. तरी या संघटनेचे नाव हेच राहिले. याच संघटनेचे मुखपत्र म्हणजे नुटा बुलेटीन.

१९६५-६७ च्या काळात आम्ही प्राध्यापक नोकरीत लागलो. माझ्या वयाच्या सर्वांच्या वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या, नोकरीच्या काळातील आरंभीच्या आठवणी आर्थिक आणि इतरही बाबतीत फारशा सुखद नाहीत. अत्यंत असुरक्षित असा तो काळ होता. वेतन पूर्ण तर मिळत नव्हतेच आणि त्यात नियमितताही नव्हती. ते अनेक महिने मिळत नव्हते. नोकरीत शाश्वतीही नव्हती. अशा काळात आम्हाला खऱ्या अर्थाने आधार दिला तो संघटनेनेच! एकीचे बळ काय असते ते आम्हाला आमच्या या संघटनेनेच शिकवले. आमचे संघटन हेच आम्हाला जगण्याचे बळ देत होते. आज वरिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचे वेतन, सर्व प्रकारची सुरक्षितता, वेतनेतर लाभ, पूरक शासकीय नियम आदींबाबत जे बदल झाले आहेत, त्यापाठीमागे संघटनेची ताकद आहे. याच संघटनेचे मुखपत्र म्हणून नुटा बुलेटीन प्रसिद्ध व्हायला सुरुवात झाली. वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व त्यांच्याशी संबंधित धोरणे, शासकीय परिपत्रके, अन्यायाविरुद्ध लढ्याबाबतचे निवेदन, माहिती याबाबतची अधिकृत नोंद बुलेटीनमध्ये घेतली जाऊ लागली. त्याची अर्थवाही भाषा, उत्तम वैचारिक बैठक आणि मुद्देसूद मांडणीसाठीही बुलेटीन ओळखले जाते.

शिक्षक वर्गासाठी संघटनेने अनेक लढे उभारले. या लढ्यांबाबतची जाणीव-जागृती या बुलेटीननेच केली. आज सामाजिक माध्यमांमुळे कुठलीही बातमी मिळवायला आपल्याला उशीर लागत नाही. मात्र ज्या वेळी मोजकी वृत्तपत्रे होती आणि संघटनेबाबतची अधिकृत बातमी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध होणेसुद्धा कठीण होते, अशा वेळी संघटनेने बुलेटीन चालवायचा निर्णय घेतला. हा एक स्तुत्य निर्णय होता. आणि आता ते बुलेटीन पन्नाशीत पोचले आहे. ही एक प्रकारची चळवळ म्हणावी लागेल. एखादी चळवळ, घटना सातत्यपूर्ण रीतीने एवढी वर्षे नेटाने चालवली ही विशेष महत्त्वाची बाब होय. यात आजपर्यंत शिक्षकांशी निगडित प्रश्न, सेवा शर्तीविषयक बाबी, महत्त्वाचे शासन निर्णय, वेतन आयोगाशी संबंधित माहिती, तरतुदी, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबी प्रकाशित होत आल्या. आता, जे काही आतापर्यंत प्राध्यापकांच्या हितासाठी शासननिर्णय झालेत ते मिळवण्यासाठी दुसरीकडे जाण्याची आवश्यकता नाही. नुटा बुलेटीन असे परिपूर्ण, मौलिक असून शिक्षणक्षेत्रातील पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे महत्त्वाचे दस्तऐवज आहे.

आमची संघटना केवळ हक्कांसाठी लढणारी संघटना नाही तर ती शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक चळवळीचे केंद्र म्हणून ओळखली जाते. गेली पन्नास वर्षे या चळवळीचा आवाज होऊन बुलेटीन कार्यरत आहे. या सुवर्णमहोत्सवी टप्प्यावर बुलेटीनच्या प्रवासाचा आढावा घेताना अभिमान, प्रेरणा आणि कृतज्ञतेची भावना आमच्या मनामध्ये आहे. बुलेटीनची सुरुवात ही फक्त माहितीवजा पत्रक म्हणून झाली नाही तर, तिने एका सशक्त शैक्षणिक, सामाजिक आणि राष्ट्रीय विचारप्रवाहाचे रूप घेतले. सामाजिक, आर्थिक आणि सर्व क्षेत्रातील बदल उत्तम शिक्षणामुळे होतात यावर प्रचंड निष्ठा ठेवून असणारा वर्ग या बुलेटीनच्या मध्यवर्ती विचारस्थानी आहे.

शिक्षण क्षेत्रातील प्रश्न, प्राध्यापकांच्या अडचणी, धोरणात्मक बदल, विद्यापीठामधील व्यवस्थात्मक विसंगती यांबाबत बुलेटीनने सातत्याने स्पष्ट, निर्भीड आणि तत्त्वनिष्ठ भूमिका स्वीकारली आहे. सत्य सांगायला न घाबरणे आणि अन्याय असेल तिथे संवैधानिक मार्गाने आवाज उठवणे हीच बुलेटीनची यथार्थ ओळख आहे.

गेल्या पाच दशकांच्या प्रवासात बुलेटीनने अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली आहे. वेतन आयोग, सेवा अटी, शैक्षणिक स्वायत्तता, गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्च शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक विसंगती, राजकीय व्यवस्थेमधील शैक्षणिक अनुदारता, शिक्षण व्यवस्थेतील भोंगळपणा आणि विद्यापीठ प्रशासनातील पारदर्शकता या विषयांवर सातत्याने लेखन करून बुलेटीनने प्राध्यापकांमध्येच नव्हे तर सर्वसामान्य लोकांमध्येसुद्धा जागरूकता निर्माण केली. केवळ प्रश्न मांडण्याची भूमिका बुलेटीनने स्वीकारलेली नाही तर त्यावर उपाय सुचविण्याचे कामही बुलेटीनने केले आहे. त्यामुळे ते एक दिशादर्शक माध्यम ठरले आहे. बुलेटीनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची वैचारिक स्पष्टता आणि प्रामाणिकता होय. कोणत्याही अनैतिक दबावाला किंवा आमिषाला बळी न पडता बुलेटीनने नेहमी सत्याची बाजू घेतलेली आहे. बदलत्या राजकीय आणि शैक्षणिक परिस्थितीतही बुलेटीनने आपली भूमिका बदलली नाही, हीच त्याची सर्वात मोठी ताकद आहे. या सातत्यामुळेच वाचकांचा त्यावर असलेला विश्वास अधिक दृढ झाला आहे.

अशा या नुटाला नेतृत्त्व लाभलं ते प्रा.बी.टी.देशमुख यांचं. त्यांच्या नेतृत्वात नुटाने दमदार वाटचाल केली. नुटाच्या संघर्षातून आज शिक्षण क्षेत्रात चांगले दिवस, चांगली व्यवस्था आली आहे व सन्मानजनक वेतन मिळत आहे. त्याचे सर्व श्रेय संघटनेच्या सांघिक प्रयत्नांना जात असले तरी ते यश द्रष्ट्या बी.टी.भाऊंच्या नेतृत्वामुळेच मिळाले आहे. त्यांच्याशिवाय ते शक्य नव्हते. त्यांच्या अभ्यासू, प्रखर बुद्धिवादी, तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्वामुळेच त्यांचे नेतृत्व सर्वांनी स्वीकारले व शिक्षक वर्ग त्यांच्या सोबत राहिला. भाऊंचे संघटनकौशल्य आणि निःस्वार्थी भूमिका यांमुळे शेकडो शिक्षक-प्राध्यापक त्यांच्या पाठीशी उभे राहिले. "खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे" ही साने गुरुजींची प्रार्थना त्यांच्या भूमिकेतून स्पष्टपणे दिसते. मेहेर बाबांचे एक सुभाषित आहे : Real happiness lies in making others happy. हा मंत्रच त्यांच्या जीवनात अग्रस्थानी दिसतो, असे मला ठामपणे वाटते.

गांधीजींनी एके ठिकाणी म्हटले होते : My life is my message. त्याप्रमाणे नुटा बुलेटीन हेदेखील भाऊंच्या विचारकार्याचा संदेश होय. नुटा बुलेटीन म्हणजे बीटी भाऊंच्या आत्मचरित्राचा भागच आहे. त्यातून आलेले शैक्षणिक-सामाजिक विचार हे भाऊंच्या चिंतनाचा परिपाक असून ते सर्वांसाठी मार्गदर्शक होय. भाऊ तीस वर्षे विधानपरिषदेचे सदस्य-आमदार होते. त्या वेळी त्यांनी केवळ शिक्षकांच्या वेतनाचे प्रश्न लावून धरलेले नाहीत. शिक्षकांच्या हक्कांसोबतच शेतकऱ्यांच्या समस्या, विदर्भाचा अनुशेष यांबाबतीत प्रश्न त्यांनी लावून धरलेले असून त्यांचा पाठपुरावा केला आहे. विदर्भाच्या अनुशेषावरील भाऊंचे कामही अपूर्व म्हणता येईल असे आहे आणि त्याची साक्ष नुटा बुलेटीनचे अंक देतात. हे कार्य स्वतंत्रपणे ग्रंथरूपाने संग्रहित होण्याची आवश्यकता आहे, एवढे ते मोलाचे आहे. त्या मांडणीमुळे विदर्भ आणि मराठवाडा हे प्रादेशित असमतोलाचे बळी कसे ठरले याविषयी जनसामान्यांमध्ये जागरूकता वाढण्यास मदत झाली. बीटींच्या या मांडणीचा राजकारण्यांवर परिणाम झाला. त्यामुळे बीटींना पुढे निवडणुकीत फटका बसला असे म्हटल्या जाते. पण विदर्भाच्या अनुशेषाचा मुद्दा पुढे आणून, रेटून बीटींनी विदर्भवासीयांना केवळ जागे केले असे नाही तर आर्थिक विकासात विदर्भावर कसा अन्याय होतो याबाबत दक्ष केले. नुटा बुलेटीनचे अंक आजही त्याची साक्ष देतील.

नुटाचे अशा प्रकारचे महत्त्वपूर्ण कार्य ही निर्विवादपणे दुर्मीळ बाब मानावी लागेल. ही चळवळ अखंडपणे सुरू असण्याला आणखी एका गोष्टीची भक्कम अशी साथ लाभली. ती बाब म्हणजे द्रष्ट्या आणि कणखर, निर्भय, स्पष्टवक्तेपणा असणाऱ्या बीटींच्या खांद्याला खांदा लावून कार्य करणारी माणसे. नुटा बुलेटीनचा

सुवर्णमहोत्सवी सोहळा साजरा करत असताना त्या सर्व निष्ठावान माणसांना विसरता येणार नाही. अनेक वर्षे चिकाटीने आणि अभ्यासपूर्ण रीतीने सचिवपद सांभाळणारे डॉ.अरविंद बारहाते, तसेच काटेकोरपणे संघटनेचे हिशोब सांभाळणारे डॉ.शीतल तिवारी, कार्यकारी मंडळातील यवतमाळ येथील डॉ.कळणावत, अमरावतीचे प्रा.चिंचमलातपूरे, चंद्रपूरचे प्रा.जाजुर्ले, वर्ध्याचे जगताप, अकोल्याचे डॅडी देशमुख ही ज्येष्ठ मंडळी आणि संघटनेने आवाज दिल्याबरोबर तयार असणारे यवतमाळचे प्रा.सांगळे, प्रा.कोलते, प्रा.सहस्त्रबुद्धे, प्रा.वानखेडे, प्रा.माडेवार, प्रा.अट्रावलकर, वर्ध्याचे प्रा.घोरपडे, प्रा.रोंघे, चंद्रपूरचे अंधारे, चिखली आणि बुलडाण्याचे प्रा.बाहेकर, घाटंजीचे वाघ, पांढरकवड्याचे प्राचार्य होटे, वाशीमचे सोमाणी, भोयर, नागपूरचे कठाळे, पुसदचे विजयराव देशमुख, आर्णीचे प्रा.शशी वानखेडे, पिस्तुलकर, माहुरे, अमरावतीचे ज्येष्ठ प्रा.वसू, प्रा.तट्टे, नागपूरचे डॉ.सातपुतळे अशी कितीतरी मंडळी (आणि माझ्या स्मरणात नसलेली कितीतरी नावे) या सर्वांना विसरता येणार नाही. किंबहुना या आणि अशा सर्वांना धन्यवाद द्यावे तेवढे कमीच होतील. प्रा.बी.टी.भाऊंचे आमच्यावरील ऋण तर कधी फिटणारच नाही! माझी ही भाषा अतिशयोक्तीची मुळीच नसून ती वस्तुस्थिती आहे. नुटा बुलेटीनच्या आजपर्यंतच्या संपादकांनाही आणि लेखकांना तसेच बुलेटीनशी संबंधित इतर कार्य करणाऱ्यांना विसरता येणार नाही. ते कार्य विशेष कष्टाचे आणि निष्ठेचे, शिवाय निःस्वार्थपणे करावयाचे असते. नुटाच्या ज्या-ज्या सदस्यांनी या बुलेटीनचे कार्य केले त्यांनाही अनेक धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच बुलेटीन आज दखलपात्र उंचीवर पोचले आहे.

सुरुवातीपासूनच नुटाला आम्ही यवतमाळकरांनी उत्तम प्रतिसाद दिला. यवतमाळ आणि मलकापूरच्या समाजकार्य महाविद्यालयाचा संस्थापक म्हणून समाजकार्य महाविद्यालयांच्या अनुदानाच्या प्रश्नाशी माझा संबंध आला. ही महाविद्यालये अनुदानावर येण्यासाठी संघर्ष करावा लागला. अखिल महाराष्ट्रातील महाविद्यालयांचा हा प्रश्न होता. पण ही महाविद्यालये संख्येने विदर्भात जास्त होती. नुटाने हा प्रश्न सोडविण्यासाठी समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना भक्कम साथ दिली. समाजकार्य महाविद्यालयाचे कर्मचारी आंदोलन करत त्या वेळी बीटी भाऊ सभागृहात ताकदीने आणि पोटतिडिकेने प्रश्न लावून धरत. धारधार मांडणी करत. प्रखर युक्तिवादाने मंत्रिमहोदयांना निरुत्तर करत. अशा पद्धतीने म्हणजे आंदोलन आणि सभागृहातील युक्तिवाद या पद्धतीने समाजकार्य महाविद्यालये अनुदानित झालीत. यामागे बीटींचे भक्कम नेतृत्त्व, नुटाची साथ, समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची एकजूट कामी आली. एकदा आम्ही सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालयात नुटाची जनरल मिटिंग घेतली होती. त्याला ४६५ सदस्य विदर्भातून आले होते. बीटी भाऊंच्या नेतृत्त्वावरील विश्वासाचे हे द्योतक होते.

यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयात पाच-सहा वर्षांपूर्वी नुटाची जनरल मिटिंग आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी बीटी यवतमाळला येणार होते. बीटींना शास्त्रीय-उपशास्त्रीय संगीताची आवड होती. त्यामुळे त्या दिवशी संध्याकाळी जिजाऊ शिक्षण महाविद्यालयात बीटींसाठी प्रा.राहूल एकबोटे यांचा गाण्याचा कार्यक्रम आम्ही आयोजित केला. प्रा.राहूल एकबोटे यांनी भाऊंना गाणं ऐकविण्याची इच्छा माझ्याजवळ बोलून दाखविली होती. बीटींनी होकार दर्शविल्यामुळे कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रम छान झाला. बीटींनी प्रा.राहूलच्या गाण्याचा आनंद घेतला. आणि त्या कार्यक्रमात ते मनोगत व्यक्त करतांना संगीतावर छान बोलले. प्रा.राहूल एकबोटे यांची बीटींना गाणं ऐकवण्याची इच्छा पूर्ण झाली होती आणि रसिक श्रोत्यांनाही प्रा.राहूलच्या गाण्याचा लाभ तर झालाच, सोबतच बीटींच्या रसिकसंपन्न जाणत्या कलादृष्टीचा परिचय झाला. हे सारेच अविस्मरणीय ठरले. आपले गाणे बीटींपुढे सादर करावे असे एका गायकाला वाटणे हे बीटींच्या गाण्याच्या अभिजात रुचीचे लक्षण होय. बीटींच्या व्यक्तिमत्त्वाचा हा असा अनोखा पैलू म्हणता येईल.

वेगवेगळ्या कारणाने माझे अमरावतीला येणे होत असे. तेव्हीं बीटींकडे जाऊन त्यांची भेट घ्यावी, असे मनात असेच. पण बीटींना केव्हाही भेटायला जात येत नसे. तसे जाणे योग्य होणार नाही याविषयी संघटनेच्या सर्व सदस्यांना जाणीव आहेच. कारण त्यांचा वेळ घेणे योग्य ठरणार नाही असे नेहमीच वाटत असते. ते सतत कामात असतात. शिक्षकांसाठी सेकंद अन सेकंद पणाला लावतात. पण तरी त्यांना भेटण्याची ओढ मनात असतेच. मग मी त्यांना फोन करून त्यांची वेळ घेऊनच भेटायला जात असे. बीटींनीही कधी मनाई केली नाही. त्यांचा वेळ खूप महत्त्वाचा असल्याने ही काळजी घ्यावी लागत असे. त्यांच्याय भेटीदरम्यान अनेक विषयांवर गप्पा रंगत. त्यात त्यांची अनेक निरीक्षणे, गाढे ज्ञान, अनुभवसंपन्न मतप्रदर्शन अनेकदा मला ऐकायला मिळाले आहे. त्यातून दीपून जायला होत असे.

बीटी हे ज्ञानसंपन्न व्यक्ती पण त्याबरोबरच त्यांच्यात अभिजात रसिकता आहे. त्यांची साहित्याची, कलेची जाणही संपन्न आहे. त्यामुळे त्यांच्या सोबतचे संवाद आनंददायी ठरतात. त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक झाले आहे ते याच गुणसंपन्नतेमुळे. त्यांच्या धारधार वक्तृत्त्वाची आठवण आमच्या पिढीच्या प्राध्यापकांच्या मनात खोलवर रुजली आहे. त्यांच्या वक्तृत्वाला उपरोध, मिश्किलीची झालर आहे. त्यामुळे त्यांचे वक्तृत्व अनन्यसाधारण होते. बीटी युक्तिवादप्रिय व्यक्ती असले, तार्किक मांडणीमुळे प्रखर होत असले तरी ते प्रसन्न व्यक्ती आहेत. ते लोकप्रिय नेते, प्राध्यापक, वक्ते आहेत. ते उत्तम ज्ञानसंग्राहक आहेत. त्यांनी परिश्रमपूर्वक उभारलेले नुटा बुलेटीन हे शैक्षणिक-सामाजिक क्षेत्रासाठी महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल. येणाऱ्या अनेक पिढ्यांना ते मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास वाटतो.

शिक्षणक्षेत्रातील बदलत्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर संघटना आणि संघटनेचे मुखपत्र म्हणून बुलेटीनची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण आणि धोरणाचे एकूणच भारतीय समाजजीवनावर आणि शिक्षण व्यवस्थेवर होणारे परिणाम याबद्दल सर्वांच्या मनात संभ्रम असताना आपण बुलेटीनचा पन्नास वर्षाचा टप्पा साजरा करतो आहोत. बदलत्या शैक्षणिक संधी आणि एकूणच बदलते शैक्षणिक वातावरण, बदलता शैक्षणिक परीघ आणि बदलत्या शैक्षणिक समस्या यांबाबत संघटना आणि बुलेटीन पुढील काळातसुद्धा शिक्षकांचे उद्‌बोधन करेल आणि शिक्षकांच्या उद्‌बोधनासोबतच एकूण समाजजीवनालाही दिशा दाखवेल अशी मला आशा आहे.

नुटा ही महाराष्ट्र पातळीवरील शिक्षकांची संघटना एमफुक्टोची शाखा आहे. महाराष्ट्रातील विविध शाखांमध्ये नुटाची शाखा अधिक प्रभावी ठरली. कारण शिक्षकांच्या संघर्षात नुटा सतत अग्रेसर राहिली आहे. नुटाचे कार्य अधिक बलवत्तर आहे. नुटाने बीटींच्या नेतृत्वाप्रमाणेच पुढील सक्षम नेतृत्वाची फळी उभी केली. आज प्रा.प्रवीण रघुवंशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हातात भाऊंनी नुटाची भक्कम परंपरा सोपविली आहे. आणि नवीन पिढी ही परंपरा उत्तम रीतीने सांभाळत आहे याचा मनस्वी आनंद होतो. त्यांना शुभेच्छा!

### *स्वगत... नुटा बुलेटीनचे*

मी फक्त नुटा बुलेटीन नव्हतो तर..
जिथे अन्याय झाला
कायदा बेकायदेशीर करण्याचा प्रयत्न झाला अन्..
प्राध्यापकी पेशाला दाबण्याचा प्रयत्न झाला..
जेंव्हा अन्यायाला न्याय म्हटल्या गेले..
तिथे मी 'बुलेट' ही झालो..

वाटेवरच्या काट्यांना दूर सारत..
अनेकांसाठी मी वाटाड्याही झालो..
पन्नास वर्षे झाली आता..
पण थकवा माहित नाही, थांबणे माहित नाही..
एकीचं बळं होतं आणि आहे..

मागे वळून पहाताना
सारचं 'फ्लॅशबॅक' प्रमाणे दिसत आहे..
नियम-कायदे धाब्यावर बसविणाऱ्यांच्या
'भाईगिरीला' कधी दबलो नाही..
कारण मी भाऊंच्या अपराजित 'लेखणीची' धार झालो

**- प्रा.दिनकर वानखडे, यवतमाळ**
संवाद : ९४२२९२२६८५

# शैक्षणिक चळवळीच्या पाच दशकाचा साक्षीदार - नुटा बुलेटीन

- प्रा.डॉ.विवेक हरिभाऊ हिवरे, अकोला

आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सर ज्यावेळेस नुटाचे अध्यक्ष व विधानपरिषद सदस्य होते त्यावेळेस माझे वडील प्रा.हरिभाऊ हिवरे हे अकोला जिल्हा नुटाचे सचिव व आदरणीय प्राचार्य डॅडी देशमुख हे अध्यक्ष होते. १९८५ ते १९८७ या कालावधीत मी श्री शिवाजी विद्यालयात बी.ए.चे शिक्षण घेत होतो. माझे वडील नुटाचे सचिव असल्यामुळे अनेकदा मला त्यांच्यासोबत राहावे लागे त्यामुळे माझा नुटाशी अतिशय जवळचा संबंध आला. ज्या ज्या वेळी अकोल्यात श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात सभा होत त्यावेळी वडिलांना सहकार्य करण्यासाठी मी सोबत राहत असे. आजच्या प्रमाणेच त्या काळातही नुटाच्या जिल्हास्तरीय सभांचे वेळापत्रक ठरलेले असे.

आदरणीय बी.टी.देशमुख सर जिल्हास्तरीय सभेत मार्गदर्शन करण्यासाठी येणार अशी सूचना मिळाल्यानंतर जिल्ह्यात एक चैतन्यमय वातावरण निर्माण होत असे व प्रत्येक तालुक्यातून एक प्राध्यापक सभेला खूप मोठ्या संख्येने उपस्थित राहत. सभा अगदी वेळेवर सुरू होत असे. सभेच्या सुरुवातीला आदरणीय प्राचार्य डॅडी देशमुख आपल्या प्रास्ताविकपर भाषणामधून भाऊंच्या दौऱ्याचा उद्देश स्पष्ट करीत. त्यानंतर भाऊंचे प्रभावी भाषण होत असे. प्राध्यापकांच्या समस्या, शासनाची ध्येय धोरणे यासंदर्भात अगोदरच भाऊंनी नुटा बुलेटीनमध्ये दिनांक व पुराव्यासहित सर्व प्रकाशित केलेले असे. अनेक गोष्टी त्यामधील क्लिष्ट व अनाकलनीय राहत असत त्या सर्व बाबी सविस्तरपणे व अतिशय सोप्या पद्धतीने भाऊ सभेमध्ये समजावून सांगत. भाषण करताना अनेकदा दर्जेदार विनोद व उपहासात्मक कोट्या करून सभागृहातील लोकांना हसवित असत. त्यांच्या या उत्कृष्ट भाषण शैलीमुळे प्राध्यापक मंडळी भारावून जात. केंद्रशासन व राज्यशासन यांच्या शिक्षक व प्राध्यापकांवरील अन्यायाची कूटनीती ते लक्षात आणून देत, त्यामुळे प्राध्यापक मंडळी प्रेरित होऊन भाऊ म्हणतील तसे आंदोलन व सहकार्य करण्यास तयार राहत असत. या प्रसंगी आणलेले नुटा बुलेटीन व शासकीय परिपत्रकांच्या सत्यप्रती सभागृहात वाटण्याचे काम तसेच सभा आटोपल्यानंतर सहभोजन व्यवस्थेचे कार्य माझ्याकडे राहत असे. विद्यार्थी दशेपासूनच भाऊंच्या प्रति आदर व नुटा संघटनेबद्दल व नुटा बुलेटीनबद्दल जिव्हाळा, प्रेम व आपुलकी निर्माण झाली.

अनेकदा पदाधिकाऱ्यांच्या भाषणांमधून बुलेटीन मुद्रित करण्यासंदर्भात येणारा खर्च व अडचणी या संदर्भात चर्चा होत. त्या चर्चेतून नुटा बुलेटीन मुद्रित करताना नुटाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांना किती मेहनत व खर्च करावा लागतो याची जाणीव होत असे, परंतु केवळ संघटना व प्राध्यापक हितार्थ ह्या गोष्ट अतिशय निस्वार्थपणे करण्यात येतात याची जाणीव होत होती. हीच परंपरा गेल्या पन्नास वर्षापासून अखंड सुरू आहे हे अतिशय कौतुकास्पद व अभिमानास्पद आहे.

आजही भाऊंच्या मार्गदर्शनाखाली विद्यमान नुटाचे अध्यक्ष आदरणीय प्रा.डॉ.प्रवीणभाऊ रघुवंशी व त्यांचे सहकारी नुटा व नुटा बुलेटीनची परंपरा जोपासत आहेत. भाऊंनी ठेवलेल्या विश्वासाला व संस्काराला त्यांनी कुठेही तडा जाऊ दिला नाही.

श्री शिवाजी महाविद्यालय अकोट येथे इंग्रजी विषयाची जागा एस.टी. संवर्गातील उमेदवाराकरिता १९८८ पासून राखीव होती. परंतु उमेदवार न मिळाल्यामुळे त्यांनी पुन्हा १९९० मध्ये जाहिरात देऊन मुलाखतीसाठी उमेदवार बोलाविले. परंतु त्या वर्गातील एकही उमेदवार आला नाही. त्यामुळे त्या जागेवर माझी निवड करण्यात आली. सन १९९२-९३ पर्यंत सतत पाच भारती वर्षे वर्तमानपत्रातून जाहिराती देऊन अर्ज मागविण्यात आले, परंतु या सवर्गातील एकाही उमेदवाराचा अर्ज आला नाही व तो उमेदवार मुलाखतीसही आला नाही. तसेच विविध सेवायोजन कार्यालयाला सुद्धा पत्रे पाठवून या संवर्गातील उमेदवाराची मागणी केली, परंतु त्यांच्याकडूनही नावे आली नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून या पदावर माझी नियुक्ती करण्यात आली.

या जागेला शासनाच्या नियमानुसार पाच भरती वर्षे पूर्ण झाल्यानंतर वरील जमातीमधील उमेदवार न मिळाल्यामुळे ते पद बिनराखीव करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाने कार्यवाही केली. विद्यापीठाच्या निर्देशानुसार सर्व कागदपत्रे व प्रस्ताव विद्यापीठाला व शासनाला पाठविण्यात आले. तसेच कायमस्वरूपी मान्यता मिळण्यासाठी विद्यापीठाला प्रस्ताव पाठविण्यात आले. विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या दिनांक ७.८.१९९३ रोजी झालेल्या सभेमध्ये मला सन १९९३-९४ या सत्रापासून पुढे अशी मा.कुलगुरूंनी मान्यता प्रदान केली. महाविद्यालयाने मला नोकरीमध्ये कायम केले.

त्यानंतर अतिशय सुरळीतपणे, आनंदाने व स्वप्ने उराशी बाळगून १३ वर्षे मी नोकरी केली. त्या दरम्यान एक उद्बोधन व तीन उजळणी वर्ग पूर्ण केले. विद्यापीठाने पाठविलेल्या समितीने वरिष्ठ श्रेणी करीता व निवड श्रेणी करीता दोनदा स्थाननिश्चिती केली व त्यानुसार पगारही देण्यात आला.

एक दिवस अमरावतीचे सीनियर ऑडिटर महाविद्यालयाची तपासणी करण्यासाठी आले. त्यांनी राखीव जागेच्या पदभरतीची तपासणी सुद्धा केली. प्रा.हिवरे यांची ज्या संवर्गातील उमेदवाराच्या जागेवर नियुक्ती झाली ते पद बिनराखीव झाल्याचे प्रमाणपत्र शासनाकडून प्राप्त झाले आहे का? अशी विचारणा केली. तसे प्रमाणापत्र प्राप्त झाले नाही असे सांगितल्यानंतर त्यांनी प्रमाणपत्र नसल्यामुळे ती जागा बिनराखीव झाली नाही असे सांगितले. शासनाचे प्रमाणपत्र नाही या आधारावर प्रा.हिवरे यांची स्थाननिश्चिती रद्द करावी व त्यांना मूळ वेतनावर आणून त्यांना दिलेला आर्थिक लाभ वसूल करावा असे महाविद्यालयाला निर्देश दिले व तसे लेखी पत्र सुद्धा पाठविले.

विद्यापीठात अशा प्रकारे राखीव जागेवर काम करणारे आम्ही १५ प्राध्यापक होतो. त्यापैकी इंग्रजी विषयाचे प्रा.एस.आर.ठाकरे (नेर), प्रा.जी.एस.खळतकर (दिग्रस), प्रा.एस.एस.खरबडे (पुसद), प्रा.व्ही.एच.हिवरे (अकोट), प्रा.के.एस.खंडारे (पातूर), प्रा.ए.एल.कुलट (नांदूरा) इत्यादी आम्ही परिचित मित्र होतो.

सर्वांनाच वरील प्रमाणे कार्यवाही करून निर्देश दिले व पत्र पाठविले. या पत्रामुळे आम्ही सर्व घाबरून गेलो व अतिशय चिंतातुर झालो. भविष्य अंधकारमय वाटायला लागले. काय करावे कळेना? शेवटी आम्ही वरील सर्व मित्र एकत्र आलो व चर्चा करून आदरणीय बी.टी. सरच आपल्याला योग्य मार्गदर्शन करू शकतात असा विश्वास असल्यामुळे आम्ही त्यांची भेट घेण्याचे ठरविले.

ठरल्याप्रमाणे आदरणीय बी.टी.सरांची भेट घेतली व त्यांना सविस्तर आमच्या राखीव जागेबद्दल माहिती सांगितली व सीनियर ऑडिटरने दिलेले पत्र त्यांच्या निदर्शनास आणून दिले. सीनियर ऑडिटरच्या या हलकट प्रवृत्तीवर भाऊंनी खूप संताप व्यक्त केला व नुटाचे त्यावेळचे सचिव प्रा.सोमवंशी सर यांची भेट घेऊन उच्च न्यायालयात दावा दाखल करा असे सांगितले. नागपूर येथील उच्च न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर काही महिन्यातच आमच्या बाजूने निकाल लागला परंतु निकाल लागल्या नंतरही शासन दखल घेण्यास तयार नव्हते. त्यामुळे परत आम्ही भाऊंच्या मार्गदर्शनानुसार अवमान याचिका दाखल केली. तरीसुद्धा शासनाने दखल घेतली नाही. त्यामुळे आदरणीय भाऊंनी विधानपरिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला व गांभीर्याने आमचा प्रश्न मांडला. त्यानंतर तातडीने शासनाने कार्यवाही करून संचालक व सहसंचालक उच्च शिक्षण, विद्यापीठ व महाविद्यालयाला आमची पदे बिनराखीव करण्याच्या दृष्टीने निर्देश दिले. आमची पदे बिनराखीव झाल्याचे पत्र प्राप्त झाले व उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सात दिवसात सर्व थकबाकी देण्यात येऊन तसा अहवाल शासनाला सादर करावा लागला. यासंदर्भात संपूर्ण माहिती त्यादरम्यान मुद्रित झालेल्या नुटा बुलेटीनमध्ये प्रसिद्ध करण्यात आली व त्याचा लाभ तर सर्व राखीव जागेवर काम करणाऱ्या प्राध्यापकांना सुद्धा मिळाला.

नुटाच्या माध्यमातून आदरणीय बी.टी. भाऊंनी आम्हाला जे सहकार्य केले ते अनमोल होते. अन्यथा हा प्रश्न सुटला नसता.

आदरणीय भाऊंनी प्राध्यापकांच्या व शिक्षकांच्या हितार्थ कुठल्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता निस्वार्थपणे अनेक प्रश्न त्यांच्या आमदारकीच्या काळात मांडले व प्राध्यापक व शिक्षकांना न्याय मिळवून दिला.

आमदार म्हणून निवडून आल्यानंतर अतिशय अभ्यासपूर्ण प्रश्न मांडणारे, निस्वार्थ सुशिक्षित सुसंस्कृत व संस्कारीत राजकीय नेते आज दुर्मिळच झाले आहेत व भविष्यात होतील की नाही याबद्दल शंकाच आहे.

केवळ नुटा या संघटनेमुळे आम्हा प्राध्यापकांच्या नोकऱ्या टिकून राहिल्या. संसार थाटल्या गेले व स्वप्नपूर्ती झाली.

अकोट येथील श्री शिवाजी महाविद्यालयात कार्यरत असताना प्राचार्य डॉ.देवानंद अतकरे हे नुटाचे अकोट शाखेचे अध्यक्ष होते व ते प्राचार्य झाल्यानंतर प्रा.डॉ.सुभाष भडांगे सर हे नुटाचे अध्यक्ष होते. मी सचिव होतो. आदरणीय बी.टी. सरांची सभा जेव्हा अकोटला उर्दू शाळेत राहत असे तेव्हा सर्व प्राध्यापक व उर्दू शाळेतील सर्व शिक्षक अतिशय आतुरतेने बी.टी. सरांच्या आगमनाची वाट पाहत व त्यांचे अभ्यासपूर्ण भाषण शांतपणे ऐकत.

१ जानेवारी २००५ मध्ये माझी अकोला येथील श्री शिवाजी महाविद्यालयात बदली झाल्यानंतर प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे हे प्राचार्य म्हणून रुजू झाले. नंतर त्यांनी अकोला जिल्हा नुटाचे अध्यक्षपद सुद्धा भूषविले. त्यानंतर अकोला जिल्हा नुटाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे प्रा.डॉ.अनिल राऊत यांनी हे पद भूषवून आपले योगदान दिले. त्यांच्यासोबत सक्रियपणे कार्य करण्याची संधी सुद्धा मला मिळाली.

नुटाचे अध्यक्ष आदरणीय प्रा.डॉ.प्रवीणभाऊ रघुवंशी यांच्या मार्गदर्शनात नुटाच्या केंद्रीय कार्यकारणीमध्ये प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे नंतर मला कार्य करण्याची संधी मिळाली. या कार्यकारिणीमध्ये आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सर, प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी सर अध्यक्ष नुटा, तसेच प्रा.डॉ.विवेक देशमुख सर, प्रा.एन.सी.कोंगरे, प्रा.व्ही.बी.ढोणे डॉ.पी.एम.तायडे, डॉ.अजित जाचक, प्रा.व्ही.आर.ठाकरे, प्रा.पी.एम.बोरकर, डॉ.ए.डब्ल्यू.ढगे, प्रा.के.व्ही.बऱ्हाटे, डॉ.पी.आर.भनसे या सर्व सन्माननीय मंडळी सोबत कार्य करण्याची संधी मिळाली. त्यांनी मला जे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

मी नियमितपणे विद्यापीठात संपन्न होणाऱ्या या सभेला उपस्थित राहून सहभाग घेत होतो. आदरणीय बी.टी.भाऊ यांच्या मार्गदर्शनात मा.प्रवीणभाऊ यांची कार्य करण्याची प्रणाली अतिशय प्रभावित करणारी होती व यामधून अनेक गोष्टी शिकायला मिळत असत.

नुटा बुलेटीन प्रकाशित करण्यापूर्वी या सभांमध्ये अतिशय सूक्ष्मपणे कायदा, शासकीय व शैक्षणिक जी.आर.यांचा अभ्यास करून रस्व, दीर्घ तपासून नुटा बुलेटीन मुद्रित करण्यासाठी पाठविले जात असे. मुद्रित झाल्यानंतर प्रत्येक सभासदांपर्यंत हे बुलेटीन गेले पाहिजे याची दक्षता घेतली जात असे.

नुटाचे अध्यक्षपद नवीन पिढीकडे सोपविण्याच्या दृष्टीने आदरणीय बी.टी.भाऊंना त्यांच्या प्रमाणेच नुटाला सर्वस्व मानणारा, प्रामाणिक, त्यागी, निरपेक्ष, अभ्यासू व सहकार्याची भावना असणारा असा अध्यक्ष असावा असे वाटले असावे. विद्यमान अध्यक्ष आदरणीय प्रा.प्रवीणभाऊ रघुवंशी त्यांच्या कसोटीमध्ये पूर्णपणे बसले व नुटाच्या अध्यक्षपदी विराजमान झाले. भाऊंच्या ध्येय धोरणानुसार तसेच आदर्शानुसारच चालण्याचे जणू बचनच घेऊन अतिशय समर्थपणे प्रवीणभाऊ कार्य करीत आहे, प्राध्यापकांच्या हितार्थ शासनासोबत संघर्ष करीत आहेत. एवढेच नव्हे तर राज्यस्तरावरील महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफुक्टो) मध्ये आपले खूप मोठे योगदान त्यांनी दिले. त्यांच्यासोबत तेथे काम करण्याची संधी सुद्धा मला आदरणीय बी.टी.भाऊ व मा.प्रवीणभाऊंनी दिली. अनेकदा सभेला उपस्थित राहिलो. त्या ठिकाणी सुद्धा नुटा बुलेटीनच्या संदर्भात अतिशय चांगले गौरवोद्‌गार काढल्या जातात.

मा.प्रवीणभाऊंनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफुक्टो) चे सरचिटणीस म्हणून सुद्धा उत्कृष्ट कार्य केले व आज अध्यक्षपदी विराजमान होऊन कार्य करीत आहेत याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्यांच्यासोबत मा.प्रा.विलास ठाकरे (उपाध्यक्ष), सदस्य म्हणून मा.प्रा.डॉ.रवींद्र मुंद्रे, मा.प्राचार्य डॉ.नितीन चांगोले, मा.प्रा.सुबोध चिंचोले कार्य करीत आहेत त्यांचेही मनस्वी अभिनंदन व शुभेच्छा.

मा.प्रवीणभाऊ अतिशय समर्थपणे प्राध्यापकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा देत आहेत.

मा.प्रवीणभाऊ व त्यांचे नुटाचे सर्व सहकारी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची अभ्यास मंडळे, सिनेट, व्यवस्थापन समिती व इतर अनेक समित्यांवर कार्य करून विद्यापीठाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देत आहेत. अर्थातच त्यांच्या या सर्व कार्यात नुटाच्या केंद्रीय कार्यकारणीचे सर्व सदस्य यांचे सहकार्य व मार्गदर्शन आहेच याबद्दल मुळीच शंका नाही.

प्राध्यापकांना भूतकाळातही अनेक समस्या होत्या व भविष्यकाळातही अनेक समस्या निर्माण होणार आहेत. शासनाचा प्राध्यापकांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदललेला आहे, शिक्षणक्षेत्र हे त्यांना दुय्यम वाटत आहे. जो देश किंवा राज्य आपल्या जनतेच्या शिक्षणाच्या प्रति दुर्लक्ष करतो, दुय्यम दर्जा देतो, शिक्षकांवर अन्याय करतो त्या देशाची किंवा राज्याची प्रगती खुंटल्याशिवाय राहत नाही. असे शिक्षण उदासीन सरकार साहजिकच शिक्षक व प्राध्यापकांवर अन्याय करणारच.

प्राध्यापकांनी आपल्या कर्तव्यांसंदर्भात प्रामाणिक व सतर्क राहणे, नैतिकता पाळणे तसेच चारित्र्यसंपन्न राहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना या देशाचे सुजाण, सुशिक्षित व संस्कारक्षम नागरिक बनविणे, आदर्श नेतृत्त्व निर्माण करणे, समाजाचा व देशाचा विकास करण्याच्या दृष्टीने त्यांच्यामध्ये पात्रता निर्माण करण्याचे पुण्यकार्य हे आपल्या शिक्षकांचे व प्राध्यापकांचे आहे असे विचारवंत सांगतात. शिक्षक व प्राध्यापकांच्या माध्यमातून घडणारे विद्यार्थी समाज व देश विकासासाठी किती महत्त्वाचे आहेत तसेच शिक्षकांशिवाय समाज उन्नती अशक्य आहे याची विवेकशून्य संचालक, सचिव, अधिकारी व नेते यांना जाणीव राहिलेली नाही. आपणही शाळा व महाविद्यालयातूनच शिक्षण घेऊन या पदांवर पोहोचलो आहोत हे त्यांच्या लक्षात यायला पाहिजे.

जुन्या काळातील शिक्षक व प्राध्यापकांकडे ज्याप्रमाणे विद्यार्थी आदराने पाहत असत तोच आदर सदैव कायम राहणे आवश्यक आहे.

आज नुटाच्या माध्यमातून प्रसिद्ध होणारे नुटा बुलेटीनने प्राध्यापक, शिक्षक संघटनेमध्ये तसेच राज्यशासन व केंद्रशासन दोन्ही ठिकाणी आपली मार्गदर्शक व विश्वासमक्ता निर्माण केली आहे.

आदरणीय बी.टी.भाऊ व मा.प्रवीण भाऊंच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या सभांमधून सामाजिक व सहकार क्षेत्रात कार्य करण्याच्या दृष्टीने अनेक आदर्श प्रेरणा मला मिळाली आहे.

आंदोलनामध्ये अंतर्भूत असलेले मुद्दे व संघटनेची बाजू समाजासमोर व शिक्षकांसमोर मांडण्यासाठी नुटा बुलेटीनचा पहिला मुद्रित अंक दिनांक १५ ऑगस्ट १९७७ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. या नुटा बुलेटीनच्या पहिल्या अंकात संघटनेचे अध्यक्ष आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सर व सचिव प्रा.अरविंद बारहाते यांनी शब्दबद्ध केले व प्राध्यापकांच्या अनियमित वेतन व्यवस्थेवर प्रकाश टाकून सरकारवर प्रखर टिका केली.

आज नुटा बुलेटीनला पन्नास वर्षे पूर्ण झालेली आहेत. सुरुवातीच्या काळातील संघर्ष, नुटा बुलेटीन मुद्रित करण्याच्या दृष्टीने येणाऱ्या आर्थिक अडचणी, त्यावर केलेली मात या सर्व गोष्टीतून मार्ग काढून आज नुटा बुलेटीन एक उत्कृष्ट बुलेटीन म्हणून मान्यता पावलेले आहे. नुटा बुलेटीनच्या माध्यमातून नुटाने केलेले सामाजिक कार्य, सामाजिक योगदान, सामाजिक बांधिलकी या दृष्टीने कार्य करून त्याचा तपशील नुटा बुलेटीनमध्ये मुद्रित केला आहे. संपूर्ण भारतात प्राध्यापक संघटना, शिक्षक संघटना व शासन सुद्धा या नुटा बुलेटीनची दखल घेतांना आपल्या लक्षात येते.

आजही असे अनेक प्राध्यापक आहेत की, जे नुटा बुलेटीनचे नियमित वाचक आहेत. नुटा बुलेटीन जर त्यांना प्राप्त झाले नाही तर ते अस्वस्थ होतात कारण या बुलेटीनच्या माध्यमातून संपूर्ण भारतातील शैक्षणिक परिस्थिती, उच्च शिक्षण, विद्यापीठ अनुदान आयोगाचे निर्णय, सरकारचे ध्येयधोरणे व शैक्षणिक क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन, उदासीनता, शासकीय सचिवांची मुजोरी, शाळांच्या व महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षण घेऊन जे नेते बनून राज्यकर्ते झाले त्यांची कृतघ्नता व उदासीनता या सर्व बाबींची इत्तभूत माहिती बुलेटीनमार्फत मिळते व देश शैक्षणिक दृष्ट्या परकीय देशांपेक्षा किती मागासलेला आहे हे कळते. एवढेच नव्हे तर या बुलेटीनच्या माध्यमातून लोकशाही व संविधानाचा पुरावा देऊन उपाय व मार्ग सुद्धा दाखविण्यात येतो.

नुटा बुलेटीनने प्राध्यापकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य पन्नास वर्षापासून केले आहे व करीत आहे. या माध्यमातून अनेक प्राध्यापक व शिक्षकांना न्याय मिळालेला आहे व शिक्षण क्षेत्राला दिशादर्शक ठरलेले आहे.

नुटाने वेतन आयोगांचे जे विशेषांक काढलेले आहेत ते सर्व विशेषांक, सिंचन अनुशेष विशेषांक तसेच २०२० मधील वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना विशेषांक, २०२४ मधील सुधारित निवृत्तिवेतन योजना निषेध विशेषांक इ. जे जे विशेषांक काढलेले आहेत ते अतिशय अभ्यासपूर्ण असे आहेत तसेच त्याची दखल प्राध्यापक संघटनेच्या राष्ट्रीय व राज्यस्तरावर तसेच शासनाने सुद्धा घेतली आहे.

नुटा व नुटा बुलेटिन आम्हा सर्व प्राध्यापक व शिक्षक वर्गांसाठी जगन्नाथाचा रथ आहे व तो रथ पुढे नेण्यासाठी सदैव हजारो हातांची आवश्यकता आहे व आवश्यकता राहणार आहे. नुटा बुलेटीन एका पवित्र शैक्षणिक संविधानाप्रमाणे आहे. त्याचा मान राखला गेला पाहिजे. आजपर्यंत आदरणीय बी.टी.भाऊ व प्रवीणभाऊ यांनी ज्या ज्या वेळेस संघटना व बुलेटिनची आर्थिक बाजू बळकट करण्याच्या दृष्टीने आव्हान केले त्या त्या वेळेस आपण सर्वांनी सहकार्य केले आहे व यापुढेही करत राहणार याबद्दल शंकाच नाही.

नुटा बुलेटीनने शैक्षणिक चळवळीची पाच दशके पूर्ण केलेली आहेत व बुलेटीन प्राध्यापक चळवळ, संघर्ष व प्रगतीचा साक्षीदार आहे. अजून पुढील पाच दशके पूर्ण करण्यासाठी नुटा बुलेटीनला व सर्व कार्यकारिणीला माझ्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा. तसेच माझ्या प्राध्यापक पेशामध्ये मी केवळ नुटामुळे प्राध्यापक म्हणून माझा ३३ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करून ३१ जानेवारी २०२३ मध्ये यशस्वीपणे सेवानिवृत्त झालो. याचे श्रेय आदरणीय बी.टी.देशमुख सर व त्यांचे सर्व जुने सहकारी तसेच विद्यमान नुटाचे अध्यक्ष मा.प्रा.डॉ.प्रवीणभाऊ रघुवंशी व त्यांचे सर्व सहकारी यांना देतो व सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

नुटा बुलेटीनने अखंडपणे शतकी वाटचाल करावी अशा शुभेच्छा देतो. धन्यवाद.

# नुटा संघटनेचे संघर्ष पर्व

- डॉ.बी.आर.वाघमारे,

*माजी परीक्षा नियंत्रक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती मो.नं. ९९२२०८८०९९*

एखादी संघटना स्थापन झाली असेल परंतु त्याची ध्येय, धोरणे व उद्देशच आपल्या सर्व सदस्यांना, ज्या शिक्षण क्षेत्रात आपण काम करत आहोत त्या क्षेत्रातील निर्णय घेणारे जे प्राधिकरण असतात त्यांनाच जर आपल्या प्रश्नांची, समस्यांची जाणीव नसेल आणि समाज देखील अनभिज्ञ असेल तर अशा संघटनेचा संघर्ष व लढा यशस्वी होत नाही तुमचे प्रश्न, तुमच्या समस्या व वेदना समाजाला समजल्या शिवाय समाजाची सुद्धा सहानुभूती मिळत नाही.

याच हेतूने नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (नुटा) स्थापन होऊन एक तप झाला परंतु त्या संघटनेबाबत, त्याच्या ध्येय धोरणाबाबत पदाधिकाऱ्यांशिवाय त्यांच्या सदस्यांना, सरकारला व संबंधित प्राधिकरणालासुद्धा माहिती होण्यासाठी व त्या प्रश्नांसाठी संघर्ष उभा करण्यास्तव नुटाने आपले 'नुटा बुलेटीन' या नावाने अधिकृत जर्नल सन १९७६ मध्ये सुरू केले. आज त्या बुलेटीनने सुवर्ण वर्ष पूर्ण केले आहे. नुटाचे हे बुलेटीन म्हणजे नागपूर विद्यापीठच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्वच संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या संघर्षाची 'बखर' होय, असे म्हणतात की "एखाद्या चळवळीला वृत्तपत्र किंवा बुलेटीन नसेल तर त्या चळवळीची अवस्था पंख नसलेल्या पक्ष्याची जी अवस्था होते तशी अवस्था चळवळीची होईल."

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेचे कार्य शिक्षण क्षेत्रातच नव्हे तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांमध्ये, महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष याबाबत क्रांतिकारक, पथदर्शक, पायाभूत व आदर्श असे आहे. संघटनेने प्रारंभीच्या काळात केलेला संघर्ष व त्यातून हजारो शिक्षकांच्या व कर्मचारी यांच्या जीवनात त्यांचे संसार फुलविण्याचे जे कार्य केले ते आजच्या पिढीला अवगत होणे आवश्यक आहे यामागे संघटनेच्या पदाधिकारी व सदस्य शिक्षकांचा किती मोठा त्याग व संघर्ष आहे याबाबत कल्पना असणे आवश्यक आहे.

"समाजाचे लक्ष नेहमी भव्य देवालयाच्या शिखराकडे जाते परंतु ज्या पायावर या देवालयाची प्रचंड इमारत उभी आहे त्याकडे फारसे लक्ष कोणी देत नाही ही समाजाची आजची रीत आहे. या संघटनेबाबत असे होऊ नये असे मला वाटते कारण मी या संघर्षाचे बऱ्याच प्रमाणात साक्षीदार आहे. नुटा या संघटनेने केवळ महाविद्यालयाच्या शिक्षकांच्या प्रश्नासाठी संघर्ष केला नसून विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शाळेतील व जुनिअर कॉलेज मधील तसेच आयटीआय मधील शिक्षक व कर्मचारी यांच्या जीवनात सुद्धा आनंद फुलविण्याचे महत्त्वाचे काम केले.

आपण शिक्षित आहोत आपण समजाचे दुःख व प्रश्न समजतात गरीब अज्ञानी दारिद्र्यात जीवन जगणारे शेतकरी यांना सरकारचे धोरण व वस्तुस्थिती अवगत होत नाही म्हणून आपण शिक्षण क्षेत्रात असलेल्या लोकांनी या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही तर पुढची पिढी आपणावर दोषारोप करतील की, "आम्ही तर अज्ञानी व अशिक्षित होतो सरकारी धोरण व त्यांचे निर्णय आम्हा भावळ्यांना समजत नव्हते पण तुम्ही जिल्हास्तरावर, तालुका स्तरावर शिकलेले सर्व विषयाचे तज्ज्ञ प्राध्यापक आहात तुम्ही आम्हास संघर्ष करण्यास प्रवृत्त का केले नाही, तुमचा संघर्ष फक्त तुमच्या शिक्षका पुरताच मर्यादित का ठेवला असा दोष आपले गरीब शेतकरी बांधव देतील तर त्यात त्यांचा काय दोष असणार? मानवाचे दुःख पाहून तथागत बुद्ध हळहळले व राजपाट सोडून मानवाच्या दुःखावर उपाय शोधण्यासाठी बाहेर पडले. कार्ल मार्क्स सुद्धा भांडवलदारांकडून होणाऱ्या कामगारांच्या शोषणाने दुःखी झाले त्यावर उपाय शोधण्यासाठी ते प्रयत्नरत झालेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुद्धा आपल्या समाजाच्या दारिद्र्य दौरबलय अज्ञान व त्यांचे दुःख पाहून हळहळले व त्यावर उपाय शोधण्यासाठी संघर्षरत झाले.

महात्मा जोतीराव फुले व त्यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे हे मुंबईतील गिरणी कामगारांचे मनाला भिडणारे दुःख पाहून दुःखी झाले. "आई आई मेलो, साहेब मला मारू नका, तुमच्या पाया पडतो" या आर्त किंकाळ्या एका कामाने थकलेल्या कामगाराला जमिनीवर पाडून एक गोरा अधिकारी निर्दयपणे बुटांच्या लाथा मारत होता ते हृदयद्रावक दृश्य पाहून एक या अन्याय अत्याचाराविरुद्ध तडफदार तरूण नारायण मेघाजी लोखंडे पुढे आला. कशाची परवा न करता त्याने गिरणी कामगारांच्या संघटनेची बांधणी केली, संघटित शक्तीचे काय बळ असते ते पाहण्यासारखे आहे. १०० ते १५० वर्षापासून कामगारांच्या होणाऱ्या शोषणाला वाचा फुटली. संघटीत कामगार संघटनेने दिलेले निवेदन व संघटनेच्या बळावर गिरणी मालक व कामगार आयोगासमोर निवेदन दिले त्यातूनच १० जून १८९० रोजी कामगारांना आठवड्याची पगारी रजा मंजूर झाली. कामाचे तास ठरले, कामाच्या ठिकाणी दररोज अर्धा तास विश्रांतीची वेळ ठरली.

मी स्वतः अगदी शिकत असतांना प्राध्यापकांचा संघर्ष पाहिला आहे त्या वेळच्या विदर्भ महाविद्यालयात एम.ए. अंतिम वर्षाला शिकत होतो, आम्हाला शिकवणारे गुरुवर्य प्रा.पी.एन.देशमुख सर या संघटनेशी जुडलेले होते, या वर्षात म्हणजे १९७७ ला एक प्राध्यापकांचा मोर्चा आला होता त्यावेळी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इमारतीचे व कंपाऊंडचे काम सुरू होते. त्या कंपाऊंडच्या प्लींथवर उभा राहून एक प्राध्यापक भाषण देत होता. त्यावेळीच्या प्राध्यापकांची तो स्थिती समजून सांगत होता त्याचे नाव होते प्रा.उदयन शर्मा. त्यांच्या बाजूला प्रा.बी.टी.देशमुख व अनेक प्राध्यापक समोर ते भाषण ऐकत होते. असाच एक प्रसंग आदरणीय नलिनीताई लढके यांनी त्यांच्या "सत्यशोधकाची वारस' या आत्मचरित्रामध्ये कथित केला आहे. "१८ नोव्हेंबर १९७७ ला राष्ट्रपती शिक्षक पुरस्कार सत्कार सोहळा वनिता समाज राजकमल चौक अमरावती येथे आयोजित होता. त्यावेळचे मंत्री ना.माहुलकर होते. तेवढ्यात वनिता समाजाच्या दारासमोर प्राध्यापक मंडळींचा मोर्चा आला. सर्व मोर्च्यातील प्राध्यापक त्या हॉलमध्ये आले. घोषणा देऊ लागले. व त्यांनी माईकचा ताबा घेतला. नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख निवेदन वाचू लागले. मंत्री महोदय उडवाउडवीची उत्तरे देऊ लागली. त्यावेळी प्राध्यापकांचा सहा महिन्यांचा पगार झाला नव्हता हे ऐकून सत्कारमूर्ती नलिनीताई लढके उठल्या त्यांनी माईक हातात घेतला. जोपर्यंत प्राध्यापकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटत नाही, माझे शेकडो प्राध्यापक बंधू भगिनी उपाशी असताना मी राष्ट्रपती शिक्षक पुरस्कार स्वीकारणार नाही अशी घोषणा केली." काय संवेदनशील पिढी त्यावेळची होती याची कल्पना करावीशी वाटते.

मित्रहो! नुटा ही संघटना व त्यांचे तत्कालीन अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांचा संघर्ष मी स्वतः पाहिला आहे. आपले शिकविण्याचे काम प्रामाणिकपणे करून उर्वरित वेळात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी ते संघर्षात उतरले. घरावर तुळशीपत्र ठेऊनच संघर्षरथ व्हावे लागते. कॉलेजच्या मॅनेजमेंटकडे सर्व कारभार त्यांना मिळणारे मोजके अनुदान व त्यातून कॉलेज मॅनेजमेंटच्या मर्जीवर होणारे पगार एकवर्ष तर वर्षभर प्राध्यापकांना पगारच मिळाले नाही. त्यात अनेक प्राध्यापकांचे संसार उद्ध्वस्त होण्याची वेळ आली. प्राध्यापकास कुणी किराणा दुकानदार किराणा उधारित देण्यास तयार नाही, ज्या घरात भाड्याने राहत होते त्या घराचे भाडे देता न आल्याने काही घर मालकांनी त्यांचे समान रस्त्यावर फेकून देऊन घर सोडण्यास भाग पाडले. या प्रश्नातून मुक्तता करण्यासाठी नुटा ही संघटना पुढे आली मोठा संघर्ष उभा केला, त्याचा संघर्ष फक्त पगारा पुरताच मर्यादित राहिला नाही तर शासकीय महाविद्यालयातील प्राध्यापक जे विषय व अभ्यासक्रम शिकवितात तेच विषय व अभ्यासक्रम खाजगी महाविद्यालयातील प्राध्यापक देखील शिकवितात असे असताना ही विषमता का? ही विषमय व्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी आणि समान काम समान वेतन मिळविण्यासाठी 'नुटा संघर्षरथ झाली.' वैद्यकीय पगारी रजा, आजारातील खर्चाची प्रतिपूर्ती इत्यादी सवलती मिळविण्यासाठी सरकारशी संघर्ष उभा केला. सदर क्रांतिकारक कार्य फक्त संघटीत असणाऱ्या व मूलभूत प्रश्नाचा अभ्यास असणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाशी संबधित नसणाऱ्या संघटनाच करू शकतात. अशा या निपक्ष व आपल्या प्रश्नांशी प्रमाणिक राहून काम करणाऱ्या या संघटनेच्या पाठीमागे राहून त्यांचे आत्मबल, त्यांचा उत्साह वाढवित राहणे हेच आपले कर्तव्य समजावे.

मी नुटाच्या अनेक त्यांनी केलेल्या संघर्षमय चळवळीचा साक्षीदार आहे. विद्यार्थी म्हणून ऐकले व मी पुढे डिग्री कॉलेजला प्राध्यापक लागतो व त्यानंतर १९८३ ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामध्ये साहाय्यक कुलसचिव म्हणून रुजू झालो त्यानंतर अनेक संघर्षाचा मी स्वतः साक्षीदार आहे. मी माझ्या स्वतःच्या लहान भावास हृदय शस्त्रक्रियेसाठी मुंबईला घेऊन जात होतो त्याच वेळी बडनेरा रेल्वे स्टेशनवर मला प्रा.बी.टी.देशमुख दिसलेत. त्याची भेट झाली

# ‘नुटा बुलेटीन’ चा आत्मा जतन करायला हवा!

## - न.मा.जोशी, यवतमाळ

यूंही नाव को समंदर का किनारा नहीं मिलता,
तुफान से टकराना पडता है,
जिंदगी मे सफलता युंही नही मिलती
चुनौतियों से लडना पडता है!

‘नुटा’चे अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी आणि यवतमाळच्या बाबाजी दाते महाविद्यालयातील माझे सहकारी अमरावती विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ.विवेक देशमुख यांनी मला ‘नुटा बुलेटीन’ च्या सुवर्ण महोत्सवी विशेषकांसाठी लेख लिहून देण्याची आग्रहाची विनंती केली. मी लगेच मान्य केली आणि काही तासातच माझ्या डोळ्यासमोरून यवतमाळच्या महाविद्यालयात ज्या दिवशी अर्थात २० जुलै १९७४ ला राज्यशास्त्राचा प्राध्यापक लागलो त्या दिवसापासून आज पर्यंतच्या रोमांचकारी संघर्षमय अविस्मरणीय आठवणींच्या चित्रपटांच्या रिल्स भराभर सरकू लागल्या.

मला आठवतं, त्याच वर्षी यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयात प्राध्यापकांच्या सामूहिक सेवा मुक्तीची कारवाई महाराष्ट्रात गाजली होती. त्यातूनच ’नुटा’चे अनेक नेते तयार झाले.

मी अमरावतीला शिवाजी महाविद्यालयात शिकत असताना राज्यशास्त्राचे प्रा.बी.टी.देशमुख यांचा जबरदस्त प्रभाव आणि पत्रकार महर्षी बाळासाहेब मराठे यांच्या हाताखाली केलेली पत्रकारिता यामुळे आयुष्यात ‘प्राध्यापक- पत्रकार’ होण्याचे पूर्ण न होणारे स्वप्न पहिले होते. मात्र नियतीच्या मनात माझी इच्छा पूर्ण करण्याचा संकल्प असावा आणि तो पूर्णत्वास गेला. परंतु हा आनंद फार काळ टिकला नाही. प्राध्यापकीचे एक वर्षही पूर्ण होत नाही तोच सेवा मुक्तीची कुऱ्हाड कोसळली. दौलत सिंह कोठारी आयोगाच्या शिफारशी स्वीकारून १९७५ मध्ये महाराष्ट्र शासनाने ‘दहा+दोन+तीन’ चा पॅटर्न लागू केला. कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय असे विभाजन झाले. महाराष्ट्रातील प्राध्यापकांच्या जीवनात १९७५ हे वर्ष म्हणजे रात्री पडलेले भयानक स्वप्न होते. ७ फेब्रुवारी १९७५ नंतर ‘कन्फर्म’ नसलेले आणि अतिरिक्त ठरलेल्या प्राध्यापकांना कोणतेही संरक्षण नव्हते. शेकडो प्राध्यापक अतिरिक्त ठरले. पी-१ ,पी-२, पी-३, पी-४, पी-५ अशा त्यांच्या श्रेणी करण्यात आल्या. अनेकांना सेवा मुक्तीचे आदेश मिळाले. आमच्या संस्थेने कनिष्ठ महाविद्यालय बंद केले होते. त्यामुळे पाच तासिका कमी झाल्या. वरिष्ठ महाविद्यालयात मला पंधरा तासिका होत्या. वीस तासिका नाहीत हे कारण देत ‘शासन निर्णया’चा मनमानी अर्थ लावून बाबाजी दाते कॉलेजने मला देखील अतिरिक्त ठरवून सेवा मुक्त केले होते. राज्यशास्त्र विषयाचा मी एकच प्राध्यापक होतो. मला अतिरिक्त ठरवण्याची गरज नव्हती. पण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही.

अठरा विश्व दारिद्र्याच्या भोवऱ्यातून निघून प्राध्यापकीच्या प्रतिष्ठित व्यवसायात आल्याचा माझा आनंद जमीन दोस्त झाला. भविष्याचा काळोख पसरला असताना ‘नुटा’ संघटनेने अशा अगणित अतिरिक्त ठरलेल्या प्राध्यापकांना न्याय मिळवून देण्यासाठी खाल्लेल्या खस्ता विसरणे म्हणजे कृतघ्नतेची परिसीमा होईल.

सुदैवाने ‘नुटा’ संघटनेचे नेतृत्व कठोर परिश्रमी, अत्यंत बुद्धिमान आणि कणखर व्यक्तित्व असलेल्या प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडे आले होते. ‘नुटा’साठी देखील कमालीच्या संघर्षाचा तो काळ होता. प्राध्यापकांच्या सेवाशर्ती, संरक्षण, वेतन आयोग, पूर्ण पगार, बँकांमार्फत पगार, कामाचे तास, विद्यापीठ कायदा, अध्यादेश इत्यादी संदर्भात ‘नुटा’ने कमालीच्या खस्ता खाल्ल्या. आज त्यांची आठवण झाली की, डोळ्यातून येणारा अश्रूंचा पूर पापण्यांच्या इवल्याच्या बांधांनी अडवणे कठीण जाते. नुटाच्या पदाधिकाऱ्यांनी असे काही आदर्श निर्माण केले आहेत की, या संघटनेची बरोबरी करणाऱ्या देशात क्वचितच काही संघटना असतील.

अत्यंत हुशारकीने ‘नुटा’आणि ‘विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ’ यांची युती घडवून प्रा.बी.टी.देशमुख पदवीधर संघातून आणि विमाशीसचे उमेदवार शिक्षक मतदार संघातून विधान परिषदेवर सतत सहा टर्म आमदार झाले. विद्यापीठाची सारी प्राधिकरणे, ‘नुटा’ने काबीज केली होती. विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर ‘नुटा’ पॅनलचेच उमेदवार निवडून येत होते. प्राध्यापकांच्या हिताला सन्मानाला नुकसान पोहोचवेल असा कोणताही निर्णय विद्यापीठात होऊ शकला नाही. ‘नुटा’च्या संमतीशिवाय कुलगुरुंना निर्णय घेणे अशक्य होते. ज्यांनी असा प्रयत्न केला त्यांना त्याची किंमतही मोजावी लागली.

बीटी नुटाचे अध्यक्ष, मी बीटींचा विद्यार्थी ‘दहा+ दोन+ तीन’ चा पॅटर्न लागू, माझ्यासकट असंख्य प्राध्यापकांवर सेवामुक्तीची कुऱ्हाड, ‘नुटा’मध्ये तर चैतन्याचा महासागर उसळला होता. ‘बचेंगे तो लढेंगे’, ‘करेंगे या मरेंगे’ च्या जोशात ‘नुटा’ने सरकारविरुद्धच नव्हे तर जिथे जिथे अन्याय त्या विरोधात विधिमंडळात संसदीय आयुधांचा वापर करीत आणि विधिमंडळाबाहेर आंदोलनाचे शस्त्र परजून लढे उभारलेत, आंदोलने केली. मला अतिरिक्त ठरवून सेवामुक्त करण्यात आल्यामुळे माझ्यासमोर भविष्य अक्षरशः अंधकारमय झाले होते. मदतीच्या आशेचा कुठेही किरण दिसत नव्हता. नुटाच्या प्रयत्नामुळे अतिरिक्त प्राध्यापकांना न्याय देण्यासाठी न्यायमूर्ती अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली तदर्थ समिती शासनाला गठीत करावी लागली. या समितीसमोर मी माझी याचिका मांडली, युक्तिवाद केला. प्रा.बी.टी.देशमुख समितीचे सदस्य होते. त्यांनी सुद्धा अत्यंत ताकदीने माझी बाजू मांडली, मला न्याय मिळाला आणि मी प्राध्यापक म्हणून पूर्ववत महाविद्यालयात रुजू झालो.

आश्चर्याची बाब म्हणजे ‘नुटा’च्या एका सभेत अभ्यंकर समिती समोर मी केलेल्या युक्तिवादाच्या कागदपत्रांची आणि समितीने दिलेल्या निर्णयाच्या आदेशांची फाईलच बीटी देशमुख यांनी सभागृहात दाखवली होती. कागदपत्रे कशी सांभाळून ठेवावीत याचा सर्वोत्तम आदर्श म्हणजे प्रा.बी.टी.देशमुख होय.

आज नव्या पिढीतील प्राध्यापकांना भूतकाळातील प्राध्यापकांच्या स्थितीची कल्पनाही येणार नाही. व्यवस्थापनाच्या मर्जीत आयुष्य घालवण्याचा, पूर्ण पगाराची अपेक्षा नसलेला, सहा सहा महिने पगार नसलेला, सेवेची शाश्वती नसलेला तो कालखंड होता. आपल्या आधीच्या पिढीने उपसलेल्या अपार

---

ते म्हणाले कुठे निघाला? मग मी ही सर्व हकीकत सांगितली. प्रा.बी.टी.देशमुख म्हणाले, अरे आताच मागच्या अधिवेशनामध्ये मी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची परिपूर्ती मिळावी म्हणून प्रश्न लावला होता. त्याचा अद्याप शासकीय निर्णय निघाला नाही परंतु तो अधिकृतपणे निघाला असेल आणि तू जर रा.सु.गवई यांच्या घरी थांबणार असेल तर त्यांनी जर म्हटले तर तो शासकीय निर्णय तुला मिळू शकतो. तो प्राप्त कर व त्याची एक प्रत माझ्याकडे आणून देशील. तो शासकीय निर्णय ऑगस्ट १९८५ चा होता. पुढे विद्यापीठात असे अनेक प्रश्न नुटा या संघटनेचे अध्यक्ष व त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गी लावले आहे. वैद्यकीय खर्चाची परिपूर्ती व्हावी यामागे एका प्राध्यापकाचे केवळ त्याच्याजवळ आजारावर खर्च करण्याकरिता रक्कम नसल्यामुळे त्यांचे निधन झाले ही बाब प्रा.बी.टी.देशमुख यांच्या मनाला एवढी भिडली की प्राध्यापकाचे उत्पन्न का? पगाराशिवाय दुसरे काही नाही त्यामुळे असे प्रसंग इतरही आपल्या प्राध्यापक बांधवावर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यावर येऊ नये यासाठी त्यांनी दिलेला लढा अतुलनीय आहे.

एवढेच नव्हे तर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहून व होणाऱ्या त्यांच्या आत्महत्त्या पाहून त्यांचे मन हळहळले. त्यांनी खोलात जाऊन या प्रश्नाचा अभ्यास केला. आपलयाकडची स्थिती ही जलसिंचनाचा अनुशेष असल्यामुळे निर्माण झाली हे त्यांच्या लक्षात आले व त्यासाठी त्यांनी संसदीय पद्धतीचा व आयुधांचा वापर करून महाराष्ट्राच्या असेम्ब्लीमध्ये व इतर मार्गांनी लढाई सुरू केली. त्यातून अनेक विदर्भातील जलसिंचनाचे प्रकल्प मंजूर झाले. यामध्ये कोणाच्या वैयक्तिक प्रशंसेचा प्रश्न नाही. त्यांनी केलेल्या कर्तृत्वाचा तो आलेख असतो आणि पुढच्या पिढी पासून तो लपून राहू नये म्हणून ही उदाहरणे मी दिली आहेत. सातत्याने ५० वर्षे एखादे बुलेटीन चालविणे त्यातील वृत्त, माहिती आणि सरकारचे शासननिर्णय सुद्धा उच्च न्यायालयाने अधिकृत मानावे हेच या बुलेटीनचे यश आहे. नुटा संघटनेच्या पुढील प्रवासाला माझ्या शुभेच्छा.

कष्टांमुळे आणि खाल्लेल्या हेलपाट्यांमुळे आपल्याला आज सुगीचे दिवस आलेले आहेत हे या पिढीतील प्राध्यापकांनी कधीही विसरू नये. मला वाटतं संघर्ष माझ्या पाचवीला पुजलेला होता की काय. महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापकांच्या संप काळात आमच्या वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टचे अध्यक्ष बाबाजी दाते यांनी प्राध्यापकांनी संपावर जाऊ नये असा आदेश काढला होता, मात्र सारे प्राध्यापक संपावर गेले तेव्हा सामूहिक सेवा मुक्तीची कारवाई करण्यात आली, पण ती झुगारून आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करूनही प्राध्यापकांची एकजूट कायम राहिली.

नुटाची सारी फौज महाविद्यालयात आली होती. यवतमाळ शहरातून प्रचंड मोर्चा निघाला होता. या मोर्चातूनच भविष्यातील अन्याया विरुद्ध लढण्याची ताकद प्राध्यापकांना मिळाली होती. नुटाचे हे मोठे यश होते. संप मिटला तेव्हा कोणत्याही प्राध्यापकांचे 'व्हिक्टिमायझेशन' होणार नाही अशा प्रकारची तरतूद शासन निर्णयात केली नाही तर आमच्या छळाला सीमा राहणार नाही असे मी स्वतः प्रा.बी.टी.देशमुख यांना फोनवरून मुंबईला कळवले होते. त्यावेळी ते सरकारशी वाटाघाटी करत होते आणि त्यांच्याच प्रयत्नांनी अखेर कोणत्याही 'प्राध्यापकांचे व्हिक्टिमायझेशन होणार नाही' हे वाक्य सरकार आणि संघटना यांच्यात झालेल्या मतैक्य मध्ये सरकारला टाकावे लागले.

आमच्या महाविद्यालयात काही अफलातून प्रकार घडत होते. भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे या हेतूने बाबाजी दाते यांनी दर शनिवारी प्राध्यापकांना धोतर नेसणे आणि श्री सूक्त म्हणणे सक्तीचे केले होते. महाविद्यालयातील काही प्राध्यापकांनी या 'धोतर संस्कृती'ला विरोध केला तेव्हा प्राध्यापक विरुद्ध बाबाजी दाते असा ऊभा संघर्ष पेटला. विदर्भ महाराष्ट्रभर प्रकरण गाजले. संघर्ष इतक्या टोकाला गेला की, बाबाजी दाते यांनी प्राचार्य सु.ल. देशपांडे यांना त्यांचा प्रोबेशन अर्थात परीविक्षाधिन कालावधी संपण्याच्या एक महिना आधी अक्षरशा कागदाच्या चिटोऱ्यावर दोन ओळीत 'तुम्हाला सेवा मुक्त करण्यात आले आहे' असा आदेश लिहून सेवामुक्त करून टाकले. स्थानिक व्यवस्थापन समितीची बैठक नाही, संस्थेची बैठक नाही, ठराव नाही, बचावाची संधी नाही, कारणे दाखवा नोटीस नाही अशी ही सेवामुक्ती लहरीपणाची असून बेकायदेशीर आहे असे आम्ही अमरावती विद्यापीठाला कळवले, पण दुर्दैवाने अमरावती विद्यापीठानेही तो चिटोरा मान्य करून प्राचार्यांनी न्यायाधीकरणाकडून सेवामुक्तीचा आदेश रद्द करून आणावा असे आम्हाला सांगितले.

त्यावेळी महाविद्यालय न्यायाधीकरण औरंगाबादला आहे हे सुद्धा आम्हाला माहित नव्हते. न्यायाधिकरणाचे पीठासीन अधिकारी न्या.एन.बी.चव्हाण यांच्यासमोर वकील न लावता प्राचार्य सु.ल.देशपांडे यांच्या सेवामुक्तीची केस मी लढलो. पहिल्याच तारखेला स्थगनादेश मिळवला. दोन वर्षांच्या लढाईनंतर केस जिंकली, निकाल आमच्या बाजूला लागला. महाविद्यालय न्यायाधीकरणासमोर सेवामुक्तीची केस लढण्याच्या अनुभवामुळे मी बऱ्याच प्राध्यापकांच्यावतीने केसेस लढलो आणि जिंकलो.

इथे एका गोष्टीची आवर्जून नोंद करावीशी वाटते ती म्हणजे विद्यापीठाच्या ज्या स्टॅच्यूट अर्थात परिनियमन-५३ने अनेक प्राध्यापकांना 'जीवनदान' दिले तो 'स्टॅच्यूट-५३' बनविण्यात, मसुदा तयार करण्यात प्रा.बी.टी.देशमुख यांचा सिंहाचा वाटा आहे. भाऊ मांडवकर, बाबासाहेब घारफळकर, सुधाकरराव नाईक, जस्टिस अभ्यंकर आदींची साथ बीटी सरांना मिळाली.

'स्टॅच्यूट-५३' ची सर्वात महत्त्वाची एक तरतूद अशी की प्राध्यापकांचा प्रोबेशन कालावधी दोन वर्षांचा केला. दुसरी सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे कोणत्याही कायम (कन्फर्म) प्राध्यापकाला विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या पूर्व परवानगी शिवाय सेवामुक्त करता येणार नाही ही होती. स्टॅच्यूट-५३चा पहिल्यांदा फायदा झाला तो प्राचार्य डॉ.भाऊसाहेब मांडवकर यांना. अमरावतीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाने डॉ भाऊ मांडवकर यांना सेवामुक्त केले होते. भाऊ मांडवकरांनी महाविद्यालय न्यायाधीकरण्यात अपिल केले होते आणि स्टॅच्यूट-५३ मुळे त्यांना न्याय मिळाला. पुढे अनेक प्राध्यापकांचे उध्वस्त होणारे संसार स्टॅच्यूट-५३ मुळे वाचले. मुंबई उच्च न्यायालयाने सुद्धा स्टॅच्यूट-५३च्या संदर्भात अनेक विद्वान वकिलांचे युक्तिवाद ऐकून सविस्तर व्याख्या केली आहे. विद्यापीठ अध्यादेश क्रमांक २४आणि 'स्टॅच्यूट-५३' परस्पर विरोधी नसून एकमेकांना सुसंगत असल्याचे निकाल दिले आहेत. यावरून या परिनियमाचा मसुदा तयार करताना किती मेहनत घ्यावी लागली असेल याची, कल्पनाही करता येणार नाही.

ज्या काळात आम्हाला विद्यापीठाची इमारत माहिती नव्हती, विद्यापीठ कायदा, अध्यादेश, स्टॅच्यूट काय असतात हे ९० टक्के प्राध्यापकांना माहित नव्हते त्या काळात विद्यापीठाच्या प्राधिकरणांवर निवडणुकीच्या माध्यमातून निवडून येऊन जे काम बीटी सरांनी केले त्याला तोड नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने लागू केलेल्या सहाव्या आणि सातव्या वेतनश्रेणी प्राध्यापकांना लागू करण्यासाठी 'नुटा'संघटनेने घेतलेल्या अपार कष्टांची यादी फार मोठी आहे. कॉलेज ट्रिब्युनलसमोर काही प्राध्यापकांच्या केसेस मी लढलो त्यामुळे कायद्याच्या अभ्यासाची आवड निर्माण झाली इतकी की पुढे वकील न लावता मी धर्मदाय आयुक्तांसमोर आणि जिल्हा सत्र न्यायालयात सुद्धा वकील न लावता प्राध्यापकांच्या केसेस लढलो आणि जिंकलो.

उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्याची पात्रता असलेल्या व्यक्तीचीच नियुक्ती विद्यापीठ न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकारी पदावर करावी अशी विद्यापीठ कायद्यात दुरुस्ती करण्यासंबंधीचे लेख मी लोकसत्ता मध्ये लिहिले होते. त्या आधारे प्रा.बी.टी.देशमुख यांनी आमदार असताना विद्यापीठ कायद्यामध्ये ही तरतूद केली आहे. यासंबंधीचे प्रकरण फार मजेदार आणि तितकेच संताप जनक सुद्धा आहे.

न्यायाधिकरणाच्या पीठासिन अधिकारी पदासाठी दिलेल्या पात्रतांमध्ये प्राचार्य पदाचा दहा वर्षाचा अनुभव असावा अशी एक पात्रता होती. त्या आधारे काटोल येथील नबीरा महाविद्यालयाचे प्राचार्य घनश्यामदास चांडक पीठासीन अधिकारी होते. अँटी करप्शन ब्युरो ने त्यांना पकडले होते. परिणामतः संस्थेने त्यांना सेवामुक्त केले. पीठासीन अधिकारी असलेल्या घनश्याम चांडक यांना आपली केस वकिलामार्फत लढवावी लागली. त्यावेळी 'दै.लोकसत्ता' मध्ये मी लेख लिहून कायद्यात दुरुस्ती सुचवली होती. कारण न्यायाधिकरणाचे कामकाज सिव्हिल प्रोसिजर कोड १९०८ च्या तरतुदी नुसार चालेल अशी विद्यापीठ कायद्यात तरतूद आहे. प्राचार्यांना या कायद्याचे, वकिलीचे ज्ञान असेलच असे नाही. उच्च न्यायालयाने सुद्धा ही बाब अधोरेखित केली होती.

ही सर्व संघर्ष गाथा प्राध्यापकांपर्यंत पोहोचली पाहिजे, संघटना प्राध्यापकांसाठी काय करत आहे याची माहिती व्हावी म्हणून नुटा बुलेटीन चे प्रकाशन सुरू करण्यात आले. बुलेटीन मध्ये प्राध्यापक आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित शासन निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोगाची परिपत्रके, वेतन आयोग, इथपासून तर शिक्षण संचालकांची पत्रे, शासन निर्णय, संघटनेचा विविध घटकांशी झालेला पत्र व्यवहार, उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील महत्त्वाचे निर्णय असा अद्‌भुत माहितीचा प्रचंड खजिना बुलेटीन मध्ये सुरू झाला. मला सांगताना आनंद होतो की या बुलेटिनच्या आधारे 'लोकसत्ता' मध्ये प्राध्यापकांशी संबंधित अनेक लेख मी लिहिले. विशेष हे की माझ्या लेखांची दखल सुद्धा बुलेटीन मध्ये घेण्यात आली. यवतमाळला झालेल्या विदर्भ स्तरीय पाणी परिषदेच्या संदर्भातील माझ्या लेखांची विशेष दखल नुटा बुलेटिनने घेतली होती. नुटा बुलेटीन आणि 'स्टॅच्यूट-५३' या दोन गोष्टी प्राध्यापकांचा आत्मा आहे असे माझे मत आहे. अनेकांना वाईट वाटेल पण मी हे जाहीर रित्या नुटा च्या आम सभेत सुद्धा सांगितले आहे की नुटा बुलेटीन काढताना अपार मेहनत घ्यावी लागते, त्यातील मजकुराचा प्राध्यापकांनी अभ्यास केला पाहिजे अशी अपेक्षा असते मात्र पूर्वी इतकी दखल घेतली जात नाही याचे वाईट वाटते. नुटा बुलेटीन ने केवळ प्राध्यापकांसाठीच नव्हे तर विदर्भाच्या विकासात सुद्धा फार मोठे योगदान दिलेले आहे. विदर्भातील जलसिंचनाचे प्रश्न विदर्भाच्या मागासलेपणाचा अनुशेष इत्यादी विविध प्रकारच्या अनेक विषयांच्या संदर्भात नुटा बुलेटीन म्हणजे एक 'गाथा'च आहे. नुटाच्या निर्मितीपासून आणि प्राध्यापक बी.टी.देशमुख यांच्या कडे नुटाचे नेतृत्व आल्यापासूनचा इतिहास आणि आता डॉ.प्रवीण रघुवंशी सारखे अत्यंत संयमी, अभ्यासू सर्वांना घेऊन चालणारे दिलदार व्यक्तिमत्त्व 'नुटा' चे नेतृत्व करीत आहेत. नुटाच्या संदर्भात मला नेहमी वाटायचे की बीटी नंतर कोण? मात्र आता हा प्रश्न निकाली निघाला आहे. तुलना करणे योग्य नाही पण बीटी सरांची जागा कोणी घेऊ शकत नसले तरी डॉ. प्रवीण रघुवंशी यांच्या ठिकाणी प्रा.बी.टी.देशमुख यांचे ७०/८० टक्के गुण अनुभवायला येत आहेत. नुटाचा संघर्ष हा प्रचंड ग्रंथाचा स्वतंत्र विषय आहे. या संघर्षाच्या महासागरात एका लेखाच्या स्वरूपातील माझाही एक गडवा असावा हे माझे भाग्य आहे. सर्व आजी माजी प्राध्यापकांना विनंती की 'नुटा बुलेटीन' चा आत्मा जतन करायला हवा.

'नुटा' संघटनेत कमालीचा त्याग आणि निःस्वार्थ भावनेने कठोर परिश्रम करणाऱ्यांची यादी फार मोठी आहे. म्हणून नामोल्लेख टाळला आहे. सर्व ज्ञात अज्ञात शूरवीर लढवय्यांना विनम्र अभिवादन. 'नुटा बुलेटीन'च्या विशेष अंकास हार्दिक शुभेच्छा.

# ''फाईलरूपी धनुष्य'' आणि ''रेफरन्सरूपी बाण''अविरत संघर्षाची पन्नास वर्षे..

- **डॉ. प्रवीण श्रीकृष्ण बनसोड,** *नेहरू महाविद्यालय, नेर परसोपंत जि. यवतमाळ*

समाज प्रबोधनासाठी शिक्षण आणि वृत्तपत्र ही महत्त्वाची साधने आहेत. एकोणविसाव्या शतकापासून शिक्षणाचे महत्त्व वाढल्यावर वृत्तपत्रांनांही तेवढेच सन्मानाचे स्थान निर्माण झाले. महाराष्ट्राच्या प्रबोधनाच्या कालखंडात राजकीय व सामाजिक चळवळींनी स्वतःचे स्वतंत्र वृत्तपत्र चालवून समाज प्रबोधन आणि सामाजिक जागृती केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी "ज्या चळवळीला स्वतःचे वृत्तपत्र नसते, त्या चळवळीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते असे म्हटले, ते यामुळेच. "शिक्षण आणि वृत्तपत्र" एकाच नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे समाजात कार्यरत राहतात, त्यामुळेच सत्ताधाऱ्यांचा 'शिक्षण आणि वृत्तपत्र' यावर सतत अंकुश असतो.

शिक्षणामुळे केवळ सामाजिक नव्हे, तर नैतिक आणि वैचारिक विकास घडून येतो, त्यासाठी शिक्षकांची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. शिक्षक ज्या जाणिवेचा असतो त्या जाणिवेचे विद्यार्थी घडत असतात. एका अर्थाने शिक्षक केवळ विद्यार्थी घडवित नसतो तर तो समाज घडवीत असतो त्या अर्थाने तो "सोशल बिल्डर" असतो. परंतु विषम शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षकांनाही आपल्या हक्क आणि अधिकारासाठी संघर्ष करावा लागतो. संघर्षासाठी एकजूट आणि एकजुटीसाठी संघटनेची गरज असते. उच्च शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ आणि नुटा ने ही गरज भरून काढली आहे.

"नुटा बुलेटीन" हे तर या संघटनेचे मुखपत्र. ज्या संघटनेला स्वतंत्र मुखपत्र असते ती संघटना वैचारिक पातळीवर सक्षमपणे उभी राहत असते. नुटा संघटनेच्या प्रवासात "नुटा बुलेटीन" मैलाचा दगड ठरावा, इतके महत्कार्य शिक्षणव्यवस्थेत झाले आहे.

नुटा बुलेटिन च्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विशेषांक मालिका प्रकाशित करण्यात आली. त्यामध्ये १५ ऑक्टोबर २००१ रोजी पहिला विशेषांक प्रकाशित करण्यात आला. १५ सप्टेंबर २००३ पर्यंत एकूण ११ विशेषांक प्रकाशित करण्यात आले.

१५ नोव्हेंबर २००१ रोजी "शिक्षणाचे वाटोळेकरण" हा स्वतंत्र विशेषांक प्रकाशित करण्यात आला. संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे कशा पद्धतीने शोषण आणि दमन केले जाते, त्याचा सविस्तर वृत्तांत 'बिर्ला-अंबानी' रिपोर्टच्या अनुषंगाने या अंकात करण्यात आले आहे. शिक्षणाचे भगवेकरण, शिक्षणाचे खाजगीकरण, शिक्षणाचे बाजारीकरण असे मथळे यापूर्वी आपण अनेकदा वाचले आहेत, परंतु "शिक्षणाचे वाटोळेकरण" हा नवीन संकल्पना मांडणारा डॉ. ना.य.डोळे यांचा लेख मुळातून अभ्यासण्यासारखा आहे.

आज आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने आलेल्या अडचणींचा सामना करीत आहोत. अनेक प्राध्यापक येणाऱ्या काळात सरप्लस होण्याची भीती निर्माण झाली आहे. शासन महाविद्यालयांचे समूह विद्यापीठ स्थापन करण्याच्या हालचाली राबवत आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात नव्हे तर एकूणच सर्वच शिक्षण क्षेत्रामध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. याची सुरुवात आजपासून ३५ वर्षांपूर्वी १९९१ च्या खाजगीकरणाच्या धोरणात आहे, तेव्हा आलेला "बिर्ला अंबानी रिपोर्ट" हा या सर्व प्रक्रियेच्या मुळाशी आहे हे समजून घेतले पाहिजे. १५ नोव्हेंबर २००१ च्या नुटा बुलेटिनच्या अंकात हा संपूर्ण अहवाल छापण्यात आला आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत प्राध्यापकांना नुटाबुलेटीनच्या माध्यमातून हा संपूर्ण अहवाल आणि त्यावरील प्रतिक्रिया सहजपणे प्राप्त झाल्यात. पण आपल्या शिक्षकांनी त्याला फारसे गंभीरपणे घेतले नाही, असे म्हटल्यास काहींना अस्वस्थ वाटण्याचा संभव आहे पण ते सत्य आहे.

नुटा बुलेटिन च्या विशेष अंकातील पान क्रमांक २०७ वर डॉ. डोळे लिहितात,

"आता कॉलेज, विद्यापीठे यांना स्वायत्तता सक्तीने देण्याचा शासनाचा विचार आहे. म्हणजे फिया वाढणार, आणि वेतन कमी होणार, पदव्यांना बाजारात किंमत उरणार नाही. पैसेवाले विद्यार्थी परदेशी विद्यापीठांच्या भारतीय शाखात शिक्षण घेतील. परदेशी खाजगी विद्यापीठांना येथे शिक्षणसंस्था चालविण्यास केंद्र सरकार परवानगी देत आहे, स्वायत्त महाविद्यालये म्हणजे संस्थाचालकांचे साम्राज्य होणार हे लक्षात घेतले पाहिजे.

किती लिहावे तितके थोडेच आहे! शिक्षणाचे वाटोळेकरण होत आहे अगदी आपल्या डोळ्यादेखत आणि आपण हतबल आहोत. एका बाजूने भगवीकरणाचे आक्रमण, दुसऱ्या बाजूने वाटोळेकरणाचे संकट, शिक्षणक्षेत्रातील सज्जनशक्ती संघटीत झाली पाहिजे. राज्यकर्त्यांवर सोपवून द्यावे अशी शिक्षणपद्धती ही क्षुल्लक बाब नाही. आज जे वाटोळेकरण होत आहे. त्याची कटूफळे आपल्या मुलानातवंडांना भोगावी लागणार आहेत. म्हणून कमालीचे अस्वस्थ वाटते. ज्यांना काळजी वाटते त्यांनी संघटीत सक्रीय व्हावे. स्वस्थ पाहत बसू नये."
२००१ च्या अंकातील वरील परिच्छेदातील भीती २०२६ मध्ये आज आपण प्रत्यक्ष अनुभवत आहोत.

आजही समाजाच्या मुख्य अजेंड्यावर शिक्षण हा विषय नाही. कोणत्याही प्रस्थापित राजकीय पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात शिक्षणाला प्राधान्य दिले जात नाही. समाजाचा आणि इतर सामाजिक-राजकीय संघटनांचा शिक्षण व्यवस्थेकडे पाहण्याचा उदासीन दृष्टिकोन शिक्षण क्षेत्राचे वाटोळेकरण करण्यास कारणीभूत ठरला आहे. शिक्षण क्षेत्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीसुद्धा त्यास अपवाद नाहीत.

"अगोदरच शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर चाललेल्या दुकानदारीला व भ्रष्टाचाराला 'युरिया, सुफला व सुपर फॉस्फेट' या दर्जाचे तदर्थ नेमणुकांचे रासायनिक खत पुरविण्याच्या या निंद्य प्रकाराची जेवढी करावी तेवढी निर्भत्सना थोडीच आहे."

१ फेब्रुवारी १९९६ च्या अंकातील वरील उतारा शिक्षण क्षेत्रातील एकूण कार्यप्रणालीचे निदर्शक ठरावा असाच आहे.

"शिक्षण व्यवस्थेमध्ये विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना अपमानजनक वागणूक देणारी व मानसिकदृष्ट्या डिवचणारी स्थिती निर्माण झाली आहे. शासनाच्या अनिर्णयामुळे उद्भवलेल्या या स्थितीबाबतची कैफियत लोकांच्यासमोर नेण्याशिवाय दुसरा कोणताही उपाय आमच्यासमोर उरलेला नाही." (१ जुलै १९९९)

शिक्षण व्यवस्थेमध्ये घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनांचा पहिला बळी शिक्षक ठरत असतो, अशावेळी शिक्षकांच्या बाजूने लढण्यासाठी 'नुटा बुलेटीन' आपले शब्दांचे शस्त्र घेऊन सदैव तत्पर असते.

"ऐन 'रात्रीच्या गर्भात' निर्गमित झालेल्या शासन निर्णयाच्या अनेक 'डिलिव्हरीज' मंत्रालयाच्या भिंतींनी पाहिलेल्या आहेत. पण एवढ्या वेगाने शासन निर्णय निर्गमित होण्यासाठी लागणारी आवश्यक ती 'शक्ती' महाराष्ट्रातील शिक्षक चळवळीमध्ये नाही हे नम्रपणे कबूल करण्यास आम्हाला कोणताही संकोच वाटत नाही"...

१ (डिसेंबर १९९९ संदर्भ- पाचवा वेतन आयोग अंमलबजावणी )

मलिदा दिल्याशिवाय कोणतेही शासन स्तरावरील काम करायचे नाही, असा अलिखित नियम असणाऱ्या कारकूनी व्यवस्थेला सणसणीत चपराक देण्यासाठी नुटा बुलेटीन सदैव सज्ज असते, त्याचाच हा नमुना आहे.

शिक्षणातील हा बदल १९९१ नंतर खाऊजा धोरण स्वीकारल्यामुळे फार झपाट्याने झालेला आहे. याची जाणीव शिक्षण क्षेत्राला आपले जीवन अर्पण करणाऱ्या ५७ लाख अध्यापक वर्गाला नाही तर जे २५ कोटी विद्यार्थी शिक्षण व्यवस्थेत आहेत त्यांना व त्यांच्या पालकांना कोठून असणार? जॉन ग्रे या ब्रिटिश तत्त्ववेत्त्याने असे सांगितले आहे की, "जागतिकीकरणात केवळ अर्थव्यवस्था बाजाराधिष्ठीत होते असे नाही तर सबंध समाजव्यवस्थाच बाजाराधिष्ठित होत असते." आपल्या देशातील शिक्षणव्यवस्था ही त्यामुळेच बाजारू व विषमग्रस्त बनली असून त्याचे कारण शासन झपाट्याने शिक्षण व्यवस्थेतून आपले अंग काढून घेत असून शिक्षणावर राष्ट्रीय तिजोरीतून कमीत कमी खर्च करीत आहे. शिक्षण ही पालकांची जबाबदारी आहे आणि त्यासाठी संस्काराऐवजी कंपन्यांनी आपला पैसा शिक्षणात गुंतवून उद्योगधंद्यापेक्षा अधिक नफा कमवावा असे शासनाचे स्पष्ट मत आहे. 'खाजगी व सार्वजनिक सहभाग' असे रूपांतर करून शासन शिक्षणाचा खेळखंडोबा तर करीतच आहे, पण शिक्षणाचे कंपनीकरण करून बालवाडी ते उच्चशिक्षण यातून सर्व बहुजनसमाजाची हकालपट्टी शिक्षण व्यवस्थेतून करण्याचे कारस्थान सत्ताधारी वर्ग करीत आहे. आपल्या सोयी सवलती यांच्यासाठी अट्टहास धरणाऱ्या अध्यापक वर्गाला आणि गुणवत्तेचा आग्रह धरणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील विचारवंतांना सरकार खिजगिनतीतही धरत नाही. अशा परिस्थितीत नुटा बुलेटिन सलग ५० वर्षांपासून "फाईलरूपी धनुष्य" आणि "रेफरन्सरूपी बाण" वापरून सरकारशी धोरणात्मक पातळीवर संघर्ष करीत आहे आणि शिक्षण व शिक्षक विषयक वैचारिक जाणीव समाजापर्यंत पोहोचवत आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

# Golden Jubilee of NUTA Bulletin: A Saga of Patience, Penance and Perseverance

**- *Dr. N.G. Belsare,***
*Retired Principal, Brijlal Biyani Science College, Amravati. Mob.No. 9422949550*

The celebration of the Golden Jubilee of the NUTA Bulletin marks a moment of immense pride and joy for every member of the Nagpur University Teachers' Association. What began as a modest publication dedicated to documenting the struggles and achievements of senior college and university teachers under the Nagpur and Amravati Universities has, over the years, evolved into a powerful voice of social consciousness.

The NUTA Bulletin has gone consistently beyond its primary mandate. While it chronicled the triumphs and tribulations of the teaching fraternity, it also broadened its scope to address pressing regional concerns such as water scarcity, irrigation backlog, farmers' suicides, and unemployment in Vidarbha. In doing so, it has successfully bridged the concerns of both the intelligentsia and the common people, emerging as a credible platform for informed discourse and public awakening.

The words of Saint Augustine—"Faith is to believe what you do not see; the reward of this faith is to see what you believe"—often come to my mind when I reflect on the journey of the NUTA Bulletin and the parallel struggles of the teachers' movement within and beyond the Maharashtra State Legislature, led by the visionary and resolute Prof. B. T. Deshmukh.

The long and determined efforts to secure the implementation of the 4th 5th, 6th, and 7th Pay Commissions, along with pensions and gratuity for university and college teachers, were marked by intense and often confrontational engagements. These battles were fought not only against ruling political establishments but also against a rigid, unyielding, and highly astute bureaucracy.

In this context, the NUTA Bulletin, conceived and developed under Prof. Deshmukh's leadership, emerged as an indispensable instrument. It proved to be remarkably effective and reliable in negotiations with political and bureaucratic authorities who were often indifferent or resistant. The organisation's many achievements can, to a great extent, be attributed to the Bulletin's intellectual rigor, clarity of purpose, and its commitment to principled, unbiased positions—values it consistently articulated, upheld, and practiced.

This remarkable journey of the NUTA Bulletin cannot be narrated without acknowledging the visionary leadership and tireless dedication of Prof. B.T. Deshmukh, popularly known as "Bhau" or "B. T. Sir". It was his brainchild—nurtured with patience, perseverance and panache with dedicated unflinching support and assistance of some of the most loyal co-workers such as - Late Prof. Arvind Barahate, Late Prof. Anil Somwanshi, Prof. Pravin Raghuwanshi , Prof.Vivek Deshmukh and Prof. Subhash Gawai to name a few.Their tenacious toil transformed the bulletin into an enduring institution of intellectual and social significance. The glorious journey of NUTA Bulletin can be well understood only by looking into the life - profile of its Chief Architect Prof.B. T. Deshmukh.

**Prof. B.T : A Truly Colossal Dnyanyogi**

When the Dr. Shrikant Jichkar Smruti Dnyanyogi Puraskar, instituted in memory of Dr. Shrikant Jichkar—one of India's most distinguished scholar-politicians—was conferred upon Prof. B.T. Deshmukh, the award itself gained radiance and stature. One can only imagine the sense of fulfillment that the late Dr. Jichkar would have experienced witnessing this honour bestowed on one of his own inspirations.

Prof. B.T.'s life has been a rare blend of scholarship, leadership, and selfless service. He was brilliant as a student, exemplary as a teacher, visionary as an organizer and unparalleled in intellectual depth and articulation as a legislator. His oratory has inspired, his debates have enlightened, and his leadership has transformed institutions.

"Vox populi vox dei." म्हणजे लोकवाणी हीच देववाणी असते. लोकशाहीत जनशक्तीचा रेटा सिंहासनांना हादरे देऊ शकतो. लोकसंघटन, लोकजागृती करायची असेल तर प्रसारमाध्यमं हाच एकमेव मार्ग ठरतो. स्वातंत्र्य आंदोलनात व स्वातंत्र्योत्तर काळातही त्याचे महत्त्व अबाधित राहिलेले आपण पाहतो. प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडे नुटाचे नेतृत्व आल्यानंतर त्यांनी संघटनेतील लोकशक्तीला जागृत केले. लोकसंघटन आणि लोकजागृतीसाठी नुटा बुलेटीन १९७६ साली सुरू केले. त्यापूर्वी संघटनेचा 'वार्षिक अहवाल' तयार केला जात असे पण त्याचे स्वरूप मर्यादित आणि काहीसे अनियमितही होते. संघटनेची गतिविधि शब्दबद्ध करणारे बुलेटिन असावे हा विचार प्रबळ झाला. विशेष म्हणजे २५ जून, १९७५ ला देशात आणीबाणी घोषित झाली होती. हा संवेदनशील काळ होता. प्रसारमाध्यमांवर निर्बंध होते. राज्यस्तरावर एमफुक्टोचे नेतृत्व करणारे प्रा.ठेकेदत्त आणि प्रा.केणी यांना मिसाखाली अटक झाली होती. या पार्श्वभूमीवर संघटनेचा विचार रुजविण्यासाठी १९७६ साली नुटा बुलेटीनचा प्रारंभ झाला. विचारांवर निर्बंध असताना संघटनेचा विचार रूजविण्यासाठी माध्यम निर्माण झाले. १९७६ ला सुरू झालेले नुटा बुलेटीन पन्नास वर्षे अव्याहतपणे आजतागायत सुरू आहे. लौकिकार्थाने हा नुटा बुलेटिनचा सुवर्ण महोत्सव असला तरी एखाद्या संघटनेने व तिच्या नेतृत्वाने पन्नास वर्षात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात दिलेल्या लढ्याचा इतिहास (History) आणि त्याच्या दस्तऐवजीकरणाचा (Documentation) हा सुवर्ण महोत्सव आहे.

**मूकनायकांची प्रखर वाणी :**

प्रा.बी.टी.देशमुख व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात गेल्या पन्नास वर्षातील या लढ्याने महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. त्यांचा आत्मसन्मान वाढविला. त्यांचे जीवनमान केवळ मानाने नव्हे, तर धनानेही उंचावले. हे परिवर्तन घडविण्यासाठी नुटा बुलेटीनचे व्यासपीठ हे जणू सॉक्रेटीसचे कोर्ट, लोकमान्यांचे 'केसरी', महात्मा गांधींचे 'यंग इंडिया' आणि डॉ. आंबेडकरांचे 'मूकनायक' ठरले. प्रतिष्ठेच्या बुरख्याआड स्वतःच्या हक्कांसाठी अन्यायविरुद्ध एल्गार पुकारण्यासाठी कचरणाऱ्या महाविद्यालयीन, विद्यापीठीय शिक्षकांना जनशक्तीचे महत्त्व अधोरेखित करून लोकशाहीत लोकशक्ती हा सर्वश्रेष्ठ युक्तिवाद कसा ठरतो याचे प्रत्यंतर नुटा बुलेटीनने दिले. संघटनेचे हे मुखपत्र मूकनायकांची प्रखर वाणी झाले.

**१९८० वर्ष मैलाचा दगड :**

१९८० हे वर्ष नुटा संघटना आणि नुटा बुलेटीन यांच्यासाठी मैलाचा दगड ठरले. कारण नुटा बुलेटीनच्या माध्यमातून व विविध प्रासंगिक आंदोलनातून व्यक्त होणाऱ्या आवाजाला, विचाराला महाराष्ट्र विधिमंडळाचे व्यासपीठ उपलब्ध झाले. नुटाचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख पदवीधर मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर निवडून आले. बुलेटिनच्या माध्यमातून झालेली लोकजागृती, संघटनेने केलेले लोकसंघटन आणि त्यातून निर्माण झालेली लोकशक्ती याचा हा विजय होता. प्रा.बी.टी.देशमुख विधान परिषदेत गेल्यावर आपल्या प्रश्नांची सांसदीय मार्गाने सोडवणूक करणारे विधीमान्य व्यासपीठ संघटनेला प्राप्त झाले. उपजत बुद्धिमत्ता, अंगभूत प्रतिभा, शालेय- महाविद्यालयीन जीवनापासून व्यक्तिमत्त्वात रूजलेले नेतृत्वगुण, मेधावी वक्तृत्व, सांसदीय आयुधांचा सुयोग्य उपयोग करण्याचे कौशल्य आणि ज्या मतदारांनी विश्वासाने विधानमंडळात पाठविले त्यांच्या प्रति असलेली बांधिलकी हे सतीचं वाण घेऊन आपल्या विधिमंडळातील कारकिर्दीचे नुटाच्या नेतृत्वाने सोने केले. संघटनेच्या शक्तीचा पट आणि बुलेटीनचे विचार विश्व शतपटीने विस्तारले. नुटाचे अध्यक्ष आता केवळ नुटाचे अध्यक्ष नव्हते; तर हजारो लोकांचे प्रतिनिधी होते. त्यामुळे हजारो लोकांच्या इच्छा-आकांक्षांचे, त्यांच्या जीवन मरणाच्या प्रश्नांचे प्रतिबिंब नुटा बुलेटीनमधे उमटू लागले. महाराष्ट्र विधान परिषदेच्या कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन नुटा बुलेटीनचा भाग झाले.

**सामाजिक जाणीव आणि विस्तारलेला परीघ :**

महाविद्यालयीन, विद्यापीठीय शिक्षकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी १९६३ साली स्थापन झालेली नुटा संघटना आणि १९७६ साली तिने या प्रश्नांसाठीच काढलेले नुटा बुलेटीन १९८० नंतर अनुशेषग्रस्त विदर्भाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय प्रश्नांचे व्यासपीठ झाले. महाविद्यालयीन किंवा विद्यापीठीय शिक्षक हा समाजाचाच एक जबाबदार घटक आहे, त्याने सामाजिक जाणीव ठेवून समाज प्रवाहाशी एकरूप झाले पाहिजे, आपल्या अवतीभवतीच्या अभावग्रस्तांचे दुःख जाणले पाहिजे, त्यासाठी प्रसंगी संघर्ष केला पाहिजे हा व्यापक विचार नुटा संघटनेत याकाळात नुटा नेतृत्वाने नुटा बुलेटीनच्या माध्यमातून आपल्या सदस्यांमध्ये रूजविला. त्यामुळे महाविद्यालयीन-विद्यापीठीय शिक्षकांसोबतच शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शैक्षणिक संस्था, बेरोजगार पदवीधर, विदर्भाचा अनुशेष, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जलसिंचनाचा अनुशेष, शेती, शेतकरी आणि शेतमजूर यांचे प्रश्न, कापूस एकाधिकार योजना, रोजगार हमी योजनेचा प्रश्न, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, विदर्भातील पायाभूत सुविधांचे प्रश्न, सेवानिवृत्तांचे व सेवानिवृत्ती योजनेचे प्रश्न, आरोग्य विषयक प्रश्न, वैधानिक विकास मंडळे, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न, वन जमिनीचे प्रश्न असे एकूणच विदर्भाच्या जिव्हाळ्याचे व लोकजीवनाशी निगडित प्रश्न लोकप्रतिनिधी म्हणून नुटाच्या नेतृत्वाने विधिमंडळात मांडले आणि त्याचा साद्यंत वृत्तांत, अधिकृत प्रतिवेदने नुटा बुलेटीनने प्रकाशित केली. इतकेच नव्हे तर या विविध प्रश्नांची सखोल जाण सर्वसामान्य जनतेला व्हावी, त्यातून जनमत जागृत व्हावे या उद्दिष्टाने नुटा बुलेटीनचे विविध विशेषांक काढण्यात आले. त्यामधे विदर्भाच्या अनुशेषाचा विशेषांक, जलसिंचनाच्या अनुशेषाचा विशेषांक, सेवानिवृत्ती योजनेचा विशेषांक, वेतन आयोगाच्या संघर्षाचे विशेषांक, नेटसेटग्रस्त शिक्षकांच्या प्रश्नांसाठी विशेषांक, शिक्षणाचे वाटोळेकरण विशेषांक असे विविध विशेषांक काढण्यात आले.

**शब्दयुद्ध विशेषांक :**

नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवी वर्षात २००१ साली इतर विशेषांकासह

# नुटा बुलेटीन : पन्नास वर्षांचा संघर्षशील, वैचारिक आणि ऐतिहासिक प्रवास

- प्राचार्य डॉ.काशीनाथ बऱ्हाटे

*स्व.छगनलाल मूलजीभाई कढी कला व विज्ञान महाविद्यालय, अचलपूर कॅम्प, परतवाडा जि.अमरावती*

महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या विद्यापीठीय शिक्षक चळवळीच्या इतिहासात ‘नुटा बुलेटीन’ हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रभावी प्रकाशन मानले जाते. हे केवळ शिक्षक संघटनेचे मुखपत्र नसून गेल्या पन्नास वर्षांत उच्च शिक्षण, शिक्षकांचे हक्क, विद्यापीठीय स्वायत्तता, सामाजिक न्याय, प्रादेशिक विकास, लोकशाही मूल्ये आणि शैक्षणिक धोरण यांवर सातत्याने भूमिका मांडणारे वैचारिक व्यासपीठ म्हणून विकसित झाले आहे.

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (Nagpur University Teachers' Association - NUTA) यांच्या कार्यातून निर्माण झालेले हे बुलेटीन महाराष्ट्रातील शिक्षक चळवळीचे “दस्तऐवजी अभिलेखागार” मानले जाते. शिक्षकांचे प्रश्न, शासनाचे निर्णय, न्यायालयीन लढे, वेतन आयोग, विद्यापीठीय धोरणे, शैक्षणिक बदल, सामाजिक प्रश्न आणि विदर्भाच्या विकासाचा अनुशेष यांचे तपशीलवार दस्तऐवजीकरण ही नुटा बुलेटीनची सामर्थ्यशाली ओळख आहे.

शिक्षक आणि शिक्षणाच्या संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्नरत असणाऱ्या नुटा संघटनेच्या चळवळीला एक मुखपत्र असावे, ज्या मुखपत्राच्या माध्यमातून शिक्षक व शिक्षणाच्या संदर्भातील बाबींचे दस्तऐवजीकरण तर करता येईलच पण शिक्षकांच्या हक्क आणि अधिकारांसंबंधी संघटनेच्या पातळीवरून चाललेल्या घडामोडींची माहिती सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचवणे या उद्देशाने गेल्या पन्नास वर्षांपूर्वी आदरणीय बी.टी.देशमुख आणि त्यांच्या समविचारी सहकाऱ्यांनी नुटा बुलेटीनची १९७७ मध्ये विधीवत सुरुवात केली. १९७० नंतर महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्र गंभीर समस्यांना सामोरे जात होते. शिक्षकांचे अपुरे वेतन, सेवाशर्तीतील असमानता, अनुदानातील विलंब, ग्रामीण भागातील शिक्षणाची दुरवस्था, विद्यापीठीय प्रशासनातील हस्तक्षेप, शिक्षकांच्या प्रश्नांकडे शासनाची उदासीनता या पार्श्वभूमीवर शिक्षकांना संघटित करण्यासाठी आणि त्यांना वैचारिक दिशा देण्यासाठी नुटा बुलेटीन सुरू झाले.

नुटा बुलेटीन हे पारंपरिक वृत्तपत्र नसून संघटनात्मक दस्तऐवज, कायदेशीर संदर्भग्रंथ, शिक्षक चळवळीचा इतिहास, आणि सामाजिक भाष्य या सर्वांचा संगम आहे. शासन निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोगाची परिपत्रके, न्यायालयीन आदेश, शिक्षक संघटनांचे निवेदन, आंदोलनांचे वृत्त, संपादकीय लेख, शिक्षणविषयक धोरण चर्चा, वेतन आयोग माहिती, विद्यापीठीय प्रश्नांचे विश्लेषण नुटा बुलेटीनच्या माध्यमातून शिक्षकांपर्यंत पोहचवले जाते.

पहिल्या ते सातव्या वेतन आयोगापर्यंत शिक्षकांच्या वेतनश्रेणी, पदोन्नती, निवृत्तीवेतन आणि थकीत रकमा मिळवून देण्यासाठी नुटा बुलेटीनने मोठी भूमिका बजावली. त्यासाठी शासनाशी केलेला पत्रव्यवहार, आंदोलनाचे कार्यक्रम, संपाच्या सूचना, न्यायालयीन लढ्यांची माहिती, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशींचे विश्लेषण, आंदोलनांची प्रमुख रूपे, राज्यव्यापी संप, मोर्चे, धरणे, निदर्शने, सामूहिक रजा, प्रतिनिधी मंडळे यांचे सविस्तर वृत्तांकन नुटाच्या अंकांमधून प्रसारित करण्यात आलेले आहे.

शिक्षकांच्या सेवाशर्तींचे संरक्षण करण्यासाठी नुटा बुलेटीनने कायमस्वरूपी नियुक्त्या, वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी, सहयोगी प्राध्यापक, सातव्या वेतन आयोगातील प्राध्यापक श्रेणी आणि निवृत्तीवेतन या मुद्द्यांवर सातत्याने आपली निर्णायक भूमिका स्पष्ट केली आहे. न्यायालयीन लढ्यांचे अचूक दस्तऐवजीकरण हे नुटा बुलेटीनचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणून नोंदवावे लागेल. Writ Petition, Civil Appeal, Interim Relief, Affidavit, Direction, Contempt Petition, SLP यामुळे शिक्षकांमध्ये कायदेविषयक साक्षरता निर्माण झाली.

शिक्षणाच्या संवर्धनासाठी नुटा बुलेटीनची भूमिका कायमच निर्णायक राहिलेली आहे. शिक्षण हा हक्क आहे आणि तो प्रत्येकाला मिळाला पाहिजे यासाठी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख, संत गाडगे बाबा यांनी घेतलेल्या भूमिकांचे वहन खऱ्या अर्थाने नुटा बुलेटीनच्या माध्यमातून केल्या गेले आहे. शिक्षण हा मानवी विकासाचा निर्देशांक ठरवणारा एक महत्त्वाचा घटक असल्याने शासनाने शिक्षणाकडे गुंतवणुकीचे क्षेत्र न पाहता ती देशाच्या विकासाची कायमस्वरूपी गुंतवणूक आहे. ज्यातून देशाच्या विविध यंत्रणा चालवण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध होत असते, हा विचार रुजवण्याचे प्रयत्न नुटा बुलेटीनच्या माध्यमातून सातत्याने होत आलेले आहेत. शिक्षणक्षेत्रातील खाजगीकरण आणि भांडवलीकरण रोखण्यासाठी नुटा बुलेटीनच्या माध्यमातून वेळोवेळी आपली भूमिका स्पष्ट करण्यात आलेली आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि लोकशाहीकरण करण्याच्या दृष्टीने नुटा बुलेटीनची

---

पंधरा भागात ‘शब्दयुद्ध विशेषांक’ काढण्यात आले. ‘शब्दयुद्ध विशेषांक’ हे विशेषांकाला दिलेले शीर्षक किती समर्पक होते याचा प्रत्यय हे विशेषांक वाचले की येतो. एखाद्या प्रश्नाची सांसदीय मार्गाने सोडवणूक करण्यासाठी एखाद्या लोकप्रतिनिधीला समाजाचे किती सजग प्रहरी व्हावे लागते, त्यासाठी किती सूक्ष्म अध्ययन व नियोजन करावे लागते आणि राजसत्तेच्या दबावाला भीक न घालता किंवा मोहाला बळी न पडता कसे व्रतस्थ राहावे लागते याचा वस्तुपाठ म्हणजे हे ‘शब्दयुद्ध विशेषांक’ होत. विधिमंडळात लोकप्रतिनिधित्व करणाऱ्यांसाठी नुटा बुलेटीनचे हे विशेषांक म्हणजे मार्गदर्शक संदर्भग्रंथच आहेत. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना आणि आपल्या प्रश्नांची मांडणी होत असतांना दररोज नुटा बुलेटीनचा अंक काढण्याचा अनोखा प्रयोगही नुटा बुलेटीनने व संघटनेने केला आहे.

**उत्तम साहित्याचा नमुना आणि विश्वासार्हता :**

या विविध विशेषांकाच्या वेळी व नुटा बुलेटीनच्या इतरही अंकात प्रा.बी.टी.देशमुखसरांनी मस्तवाल नोकरशाही, निद्रिस्त शासन यांच्याविरुद्ध लिहिलेली टिपणं म्हणजे तर उत्तम साहित्याचा एक नमुना आहेत. लोकभाषेतील व लोक व्यवहारातील अनेक प्रसंग, म्हणी, वाक्प्रचार वापरून केलेले हे भाष्य या अंकांचे विशेष आकर्षण ठरले आहे. उदा. सार्वजनिक समारंभातील पंगतीत मुदपाकखान्यातील जिलबी वाढण्यात चतुर वाढप्या कशी चतुराई करतो आणि पंक्तीतील लोकांच्या तोंडाला कशी पाने पुसतो हे विदर्भावरिल अन्यायाच्या संदर्भात दिलेले उदाहरण वाचकाला सर्वकाही सांगुन टाकते. पन्नास वर्षात नुटा बुलेटीनमधील प्रत्येक शब्द ताऊनसलाखून, विचारपूर्वक वापरला आहे. त्याची शहानिशा केली आहे. त्यामुळे त्यातील अचूकता व विश्वासार्हता वाढली आहे. ही विश्वासार्हता नुटा बुलेटीनने इतकी प्राप्त केली की नुटा बुलेटीनचा संदर्भ न्यायालयात न्यायमूर्तींनी ग्राह्य धरल्याची उदाहरणे आहेत.

**भाग्याचे क्षण :**

संघटनेच्या प्रवासातील हे ऐतिहासिक दस्तऐवज आहेत. प्रा.बी.टी.सरांच्या मार्गदर्शनात यातील काही ऐतिहासिक दस्तऐवजांचा साक्षीदार होण्याचे व त्यात खारीचा वाटा देण्याचे भाग्य मला लाभले ही माझ्या आयुष्यातील अक्षय पुंजी आहे. २९ सप्टेंबर, २०१३ रोजी विदर्भ महाविद्यालयाच्या संगीतसूर्य केशवराव भोसले सभागृहात नुटाचा सुवर्ण महोत्सवी सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याचे सूत्रसंचालन करण्याचे भाग्यही मला लाभले. त्याचाही मी साक्षीदार आहे. नुटा बुलेटीनच्या या प्रवासात विविध अंकांचे संपादक, प्रकाशक, वितरक या सर्वांचे कष्ट बहुमोलाचे आहेत. ‘शब्दांचं सामर्थ्य तलवारीहुनही मोठं असतं. सशस्त्र सैनिकांची दळे बाळगणाऱ्यांपेक्षाही अक्षरांच्या आणि शब्दांच्या सेना सांभाळणाऱ्या सारस्वताचं सामर्थ्य अपार आहे.’ सारस्वतांच्या अपार सामर्थ्याचं साक्षेपी दर्शन आपल्या पानापानातून घडविणाऱ्या आणि संघर्षाचा इतिहास शब्दबद्ध करणाऱ्या नुटा बुलेटीनच्या सुवर्ण महोत्सवी विशेषांकाला मनःपूर्वक शुभेच्छा!

भूमिका ही कायमच आग्रही राहिलेली आहे.

२०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणामधील उणिवांची सर्वप्रथम दखल घेऊन एमफुक्टो आणि आयफुक्टोच्या मार्फत नवीन शैक्षणिक धोरण रद्द करण्याचे निवेदन सरकारला देण्यात आले होते. शिक्षणाचे बाजारीकरण होऊ नये या उद्देशाने संघटनात्मक पातळीवरून घेतलेल्या भूमिकेला नुटा बुलेटीनच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील घटकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करण्यात आले.

विद्यापीठीय स्वायत्ततेसाठी नुटा बुलेटीनने शासन हस्तक्षेपाविरोधात नेहमीच ठाम भूमिका घेतलेली आहे. कुलगुरू नियुक्त्या, विद्यापीठ अधिनियम यातील राजकीय हस्तक्षेप हा "विद्यापीठीय स्वायत्ततेवरील आघात" असल्याचा शब्दप्रयोग आपल्याला अनेक अंकांत पाहायला मिळतो.

पराकोटीच्या संघर्ष आणि बलिदानातून संयुक्त महाराष्ट्र झाला पण समन्यायी महाराष्ट्र झाला नाही. महाराष्ट्रातील विविध विभागांचा समतोल विकास झालेला नाही, ही खंत आदरणीय बी.टी.देशमुख यांनी सातत्याने नुटा बुलेटीनमधून अधोरेखित केली आहे. १५ ऑक्टोबर १९९६ च्या अनुशेष विशेषांकात विविध क्षेत्रातील अनुशेषांची जी अभ्यासपूर्ण सांखिकीय माहिती देण्यात आली आहे. त्यावरून महाराष्ट्रातील विकासाचा असमतोल किती टोकाचा आहे याची अनुभूती आल्याशिवाय राहत नाही. अनुशेषाच्या संदर्भात सभागृहात आदरणीय बी.टी.देशमुख आणि त्यांचे समविचारी साक्षीदार सातत्याने आपली भूमिका मांडत होते. त्या चर्चांचे आणि त्या अनुषंगाने केलेल्या प्रयत्नांचे दस्तऐवजीकरण नुटा बुलेटीनच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे. सभागृहात अनुशेषच्या संदर्भात चर्चा करीत असताना १५ ऑक्टोबर १९९६ च्या अनुशेष विशेषांकात एके ठिकाणी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या संदर्भातील आलेला उल्लेख हा आपल्याला अनुशेषाच्या बाबतीतील चर्चेची गहणता लक्षात आणून देतो. सभागृहात चर्चेच्या वेळी समन्यायी वाटपाबद्दल मंत्रिमहोदया काहीच बोलत नव्हत्या म्हणून बी.टी.देशमुख सभापती महोदयांना म्हणतात "अध्यक्ष महाराज, न्यायालयाने जे कळविल्याचे आता नामदार मंत्री महोदया सांगत आहेत ते बरोबर आहे. पण समन्यायी वाटपाबद्दल काय? अध्यक्ष महाराज, मी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शाळेतील एक विद्यार्थी या नात्याने त्यावेळी भाग घेतला आहे. मराठी भाषिकांचे राज्य झाले ही त्या पिढीने अनेक पीढ्यांना दिलेली देण आहे आणि हा सारा अनुशेष जो आहे तो आमच्या एका पिढीचे पाप आहे." असे उद्‌गार काढले त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये एक जेष्ठ सेनानी म्हणून काम केलेल्या सभापतीस्थानी विराजमान असलेल्या जयंतरावजी टिळकांच्या तोंडून पुढील उद्‌गार बाहेर पडले "महाराष्ट्र आता फुटण्याची वेळ आलेली आहे" असे क्षण नुटा बुलेटीनने अत्यंत समर्थपणे शब्दबद्ध करून ठेवले आहे.

बुलेटीनमध्ये विदर्भातील विकासातील विषमता अधोरेखित केली गेली आहे. सिंचन अनुशेष, औद्योगिक मागासलेपण, शैक्षणिक सुविधांचा अभाव, बेरोजगारी यांचा 'प्रादेशिक अन्याय' या शब्दाद्वारे समाचार घेण्यात आलेला आहे. याशिवाय जलसिंचन प्रश्न, विदर्भातील दुष्काळ आणि सिंचनातील विषमता, गोसेखुर्द प्रकल्प, अपूर्ण सिंचन योजना, शेतकरी आत्महत्या, पिण्याचे जलव्यवस्थापन या विषयांवर बुलेटीनने वेळोवेळी निर्णायक भूमिका घेतली आहे. यामुळे संशोधक, शिक्षक आणि विद्यार्थी यांना संदर्भसाहित्य सहज उपलब्ध होत आहे. नुटा बुलेटीनने शिक्षकांना केवळ आर्थिक प्रश्नांपुरते मर्यादित ठेवले नाही तर लोकशाही, संविधान, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, शिक्षणाचे सामाजिक उद्दिष्ट या करिताही सजग केले आहे.

आपण या चळवळीचे सहप्रवासी आहोत याचा प्रत्येक शिक्षकाला सार्थ अभिमान वाटल्याशिवाय राहत नाही. संघटनेचा एक सामान्य शिपाई म्हणून मलाही ती कृतार्थता वाटत आहे. नुटा संघटनेचा आजीव सदस्य, तालुका प्रतिनिधी, जिल्हा सहसचिव, नुटा कार्यकारिणी सदस्य, एमफुक्टो कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्य करण्याची संधी मला संघटनेने दिली. ती जबाबदारी वेगवेगळ्या पातळीवर मला पार पाडता झाली याचा आनंद तर आहेच; पण त्याहीपेक्षा जेव्हा आदरणीय बी.टी.देशमुख साहेब आणि डॉ.प्रवीण रघुवंशी सर यांनी माझ्याकडे नुटा बुलेटीनचे मुद्रणशोधन करण्याची जबाबदारी दिली तो क्षण माझ्यासाठी सर्वाधिक कृतार्थतेचा होता. नुटाचे माजी सचिव प्रा.सतेश्वर मोरे सर यांच्या अकाली निधनानंतर ही जबाबदारी माझ्याकडे आली. या मुद्रितशोधनाच्या निमित्ताने मला भाऊंचा सहवास लाभला. त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करताना आपण एका विशाल ज्ञानप्रपातात न्हावून निघत आहोत ही अनुभूती घेता आली. नुटा बुलेटीनच्या वृत्तांकनातील, विशेष लेखांमधील भाऊंची शब्दसंपदा एखाद्या साहित्याच्या ज्ञानपंडितालाही लाजवण्यासारखी आहे. प्रशासकीय शब्दांसोबतच स्वनिर्मित सामासिक शब्दांचा चपखल वापर हा भाऊंच्या भाषाशैलीचा विशेष आहे. शिक्षण क्षेत्रातील उपप्रवृत्तीवर भाष्य करताना नवनिर्मित शब्दांच्या औपरोधिक आघाताने मर्माघात करण्याचे भाऊंचे कौशल्य जवळून न्याहाळता आले. मुद्रणशोधनाच्या निमित्ताने नुटा बुलेटीनच्या या दैदीप्यमान प्रवासाचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला मिळाले.

नुटा बुलेटीनचा पन्नास वर्षांचा प्रवास हा महाराष्ट्रातील शिक्षक चळवळीचा, उच्च शिक्षणाच्या संघर्षाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा इतिहास आहे. नुटा संघटनेने शिक्षकांचे हक्क जपले, शिक्षणाचे लोकशाहीकरण केले, विद्यापीठीय स्वायत्ततेसाठी संघर्ष केला, विदर्भाच्या विकास प्रश्नांना आवाज दिला, आणि शिक्षकांना वैचारिक दिशा दिली. त्याचे प्रतिबिंब म्हणजे नुटा बुलेटीन होय. म्हणूनच नुटा बुलेटीन हे केवळ संघटनेचे मुखपत्र नसून महाराष्ट्रातील प्रगतिशील शिक्षक चळवळीचा ऐतिहासिक अभिलेख आणि वैचारिक वारसा आहे. नुटाचे अध्वर्यु आदरणीय बी.टी.देशमुख आणि त्यांचे समविचारी साथी यांनी उदात्त दृष्टीने निर्माण केलेला वारसा तेवढ्याच समर्थपणे सांभाळण्याचे कार्य आज प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी करीत आहेत. नुटा बुलेटिनच्या या सुवर्ण महोत्सवी प्रवासाला शुभेच्छा देत असतानाच हा प्रवास असाच निरंतर चालत राहो ही शुभकामना !

## *नुटा बुलेटीनची रजत महोत्सवी विशेषांक मालिका*

'नुटा बुलेटीन'च्या प्रकाशनाला २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर नुटा बुलेटीन रजत जयंती विशेषांक मालिकेचे प्रकाशन त्यावेळेला करण्यात आले होते. व्यावसायिक जीवनाशी संबंधित २६ विशेषांक त्यावेळेला प्रकाशित करण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे:-

**(१)** विशेषांक पहिला, सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ **महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४** विशेषांक पृष्ठ ११३ ते १५२

**(२)** विशेषांक दुसरा, 'नुटा बुलेटीन' (१९७६ ते २०००) **अनुक्रमणिका - विशेषांक** पृष्ठ १५३ ते २०४

**(३)** विशेषांक तिसरा, **शिक्षणाचे वाटोळेकरण - विशेषांक** पृष्ठ २०५ ते २३२

**(४)** विशेषांक चौथा, **नेट/सेट - विशेषांक** पृष्ठ २३३ ते ३२४

**(५)** विशेषांक पाचवा, **'वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती सुविधा'** विशेषांक पृष्ठ ३२५ ते ३६४

**(६)** विशेषांक सहावा, **सेवा निवृत्तीवेतन व उपदान योजना** विशेषांक पृष्ठ ३६५ ते ४३२

**(७)** विशेषांक सातवा, **रजा प्रवास सवलत विशेषांक** पृष्ठ ४३३ ते ४८०

**(८)** विशेषांक आठवा, **वेतन अनुदान व्यवस्था विशेषांक** पृष्ठ ४८१ ते ५०८

**(९)** विशेषांक नववा, **संघटना - संस्थापना विशेषांक** पृष्ठ ५०९ ते ५३६

**(१०)** विशेषांक दहावा, **महत्वपूर्ण दस्तऐवज विशेषांक** पृष्ठ ५३७ ते ५७२

**(११)** विशेषांक अकरावा, **नेट/सेट (दुसरा) विशेषांक** पृष्ठ ५७३ ते ६००.

याशिवाय शिक्षक प्रतिनिधींनी सभागृहामध्ये उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची माहिती देणारे १५ विशेषांक 'शब्दयुद्ध विशेषांक' या मथळ्याने त्यावेळेला सन २००१ च्या नुटा बुलेटीन मालिकेमध्ये प्रकाशित करण्यात आले होते. हे सर्व अंक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. **- डॉ.प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष, नुटा**

# शिक्षण क्षेत्रातील ध्येयवेड्या प्राध्यापकांच्या संघर्षाचा आणि शैक्षणिक चळवळीचा ऐतिहासिक दस्तऐवज : नुटा बुलेटीन

**प्रा.डॉ.आर.के.चव्हाण**

*अध्यक्ष -शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), महासचिव- महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एम.फुक्टो.)*

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाची २५ वर्षे आणि एकविसाव्या शतकातील पुर्वार्धाची २५ असा द्विशतकीय कारकीर्दीचा शिक्षण क्षेत्राचा मागोवा घेणारा दस्तऐवज म्हणजे नुटा बुलेटीन. उच्च शिक्षण ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया नसून ती समाजपरिवर्तनाची एक सशक्त चळवळ आहे. या चळवळीच्या केंद्रस्थानी असलेला शिक्षक केवळ ज्ञानदाता नसून तो सामाजिक न्याय, समता आणि बौद्धिक स्वातंत्र्य यांचा वाहक असतो. अशा या शिक्षकांच्या हक्कांसाठी, त्यांच्या सेवा शर्तीसाठी आणि शिक्षणव्यवस्थेतील पारदर्शकतेसाठी गेल्या अनेक दशकांपासून सातत्याने संघर्ष सुरू आहे. या संघर्षाची नोंद, त्याचे दस्तऐवजीकरण आणि त्यातून उभ्या राहिलेल्या विचारप्रवाहांची जपणूक करणारे माध्यम म्हणजे 'नुटा बुलेटीन' होय.

'नुटा बुलेटीन' हे केवळ एक प्रकाशन नसून ते उच्च शिक्षण क्षेत्रातील चळवळीचा जिवंत दस्तऐवज आहे. शिक्षकांच्या हक्कलढ्यांपासून ते न्यायालयीन संघर्षांपर्यंत, शासकीय निर्णयांपासून ते शैक्षणिक धोरणांपर्यंत प्रत्येक महत्त्वाच्या घटनेची नोंद या बुलेटिनमध्ये आढळते. तसेच शिक्षण क्षेत्राला दिशा देण्यासाठी मा.आमदार बी.टी.देशमुख (भाऊ) यांनी विधानपरिषदेमध्ये ३० वर्षे शिक्षण आणि शिक्षक यांच्या कल्याणासाठी जो लढा दिला त्याच्या सविस्तर नोंदी नुटा बुलेटीनमध्ये आहेत. त्यामुळे हे बुलेटीन शिक्षण क्षेत्रातील बदलत्या प्रवाहांचे प्रतिबिंब तर आहेच, परंतु त्याचबरोबर ते संघर्ष, जिद्द आणि संघटनशक्ती यांचे प्रेरणादायी दर्शन घडवणारे साधनही आहे.

ज्ञानयज्ञातील या संघर्षकथांची जतन केलेली गाथा म्हणून नुटा बुलेटीन विशेष महत्त्वाचे ठरते. कारण ते केवळ माहिती देत नाही, तर विचार जागृत करते, प्रश्न उपस्थित करते आणि न्यायाच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देते. शिक्षक, संशोधक, कायदेविषयक अभ्यासक आणि समाजातील सजग नागरिक यांच्यासाठी हे बुलेटीन एक मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणून कार्य करते. म्हणूनच नुटा बुलेटीनकडे पाहताना आपण केवळ एका शैक्षणिक बुलेटिनकडे पाहत नाही, तर उच्च शिक्षणाच्या व्यापक चळवळीचा इतिहास, वर्तमान आणि भविष्य यांचा एकत्रित आलेख अनुभवत असतो.

नुटा बुलेटीनला ५० वर्षे पूर्ण होत आहेत त्यानिमित्ताने मी नुटा बुलेटीन च्या विशेषांकाचा आढावा घेतला आहे. नुटा बुलेटीन मधील प्रत्येक शब्द महत्वाचा आहे. सर्व अंकांवर लिहिणे शक्य नसल्याने अलीकडील महत्वाच्या विशेषांकावर लिहिणे क्रमप्राप्त आहे असे मी समजतो. या लेखात मी खालील विशेषांकावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

(१) वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना

(२) न्यायाधिकारणाची स्थापना

(३) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष

(४) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला चौथ्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष

(५) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला पाचव्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष

(६) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला सहाव्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष

(७) सुधारित निवृत्तीवेतन योजना निषेध विशेषांक

### (१)
### वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना

सुटाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रा.संभाजी जाधव शैक्षणिक चळवळीचा मानदंड या स्मृतिग्रंथातील काही घटनांचा वेगवेगळ्या अंकांमध्ये उल्लेख केलेला आहे. 'वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना' या अंकातील पान क्रमांक २११ अकरावर सुटाचे ज्येष्ठ नेते पुरुषोत्तम शेठ माजी प्राचार्य डी.आर.कोहिनूर सुटाचे ज्येष्ठ नेते कमलाकर दीक्षित यांच्या अनुभवाचे कथन आलेले आहे. सुरुवातीच्या काळात प्राध्यापकांना सहा महिने पगार नसायचे. पत्नीचे दागिने गहाण ठेवायचे गावाकडून धान्य आणायचे. वाण्याने उधारीचा तगादा मागे लावू नये म्हणून उघड्या छत्रीने वाण्याची नजर चुकवायची घरमालक थकलेले भाडे देण्यासाठी हंजीहंजी करायचे. त्या काळात बहुसंख्य प्राध्यापक सूट कोट घालायचे. कोल्हापूरच्या शिवाजी चौकातील कांबळे टेलर कडून हप्त्याने पैसे देईन या अटीवर सूट कोट आणायचा. नोकरीत संस्थाचालकांची दहशत होती आणि गावाकडच्या आई-वडिलांना मदत करू शकत नाही याची खंत होती. महावीर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सुनील कुमार लवटे यांनी त्यांच्या लेखांमधला तपशील पुढील प्रमाणे सांगितलेला आहे. संस्थाचालक देईल तो पगार, संस्थाचालक देईल त्या तारखेला पगार आणि संस्थाचालक म्हणेल तिथपर्यंत नोकरी आणि वेतनमान निश्चित झालं तरी मस्टरवर पगार एक आणि हातात पगार एक अशा प्रकारची व्यवस्था त्या काळामध्ये होती.

माजी प्राचार्य डी.आर. कुन्नूर यांच्याही लेखाचा या विशेषांकामध्ये उल्लेख आहे. त्या काळातील प्राध्यापकाची अवस्था ही वेठबिगारी सारखी होती. थकलेला पगार मागाल तर व्यवस्थापन नाराज, विद्यापीठात तक्रार करावी तर नोकरीवर गदा अशा काळात या प्रस्थापितांविरोधात दोन हात करणारे प्रा.संभाजीराव जाधव आणि त्यांचे सहकारी आणि राज्याचे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे नेतृत्व गेल्या पाच दशकामध्ये प्राध्यापकांच्या योग्य व न्याय हक्कासाठी लढत राहिले. त्यामुळेच आज प्राध्यापकांना बँकेमार्फत पगार, सेवा शाश्वती, शंभर टक्के वेतन अनुदान, महाविद्यालय विद्यापीठ स्तरावर न्यायाधीकरण, सेवानिवृत्ती योजना हे संघटनेचे यशोगातीतील दीपस्तंभ आपल्या वाट्याला आले.

सुटाचे ज्येष्ठ नेते प्रा. कमलाकर देसाई यांच्या लेखांमध्ये त्याकाळी सर्वांचाच आणि प्राध्यापकांचा पगारही तुटपुंजा होता. अनुदान ३३% होते. त्यामुळे पगार वेळेवर कधीच होत नव्हता. पूर्ण पगारही हाती पडत नसेल कोल्हापूर कॉलेज ऑफ कॉमर्स आणि कराडचे सायन्स कॉलेज या दोनच कॉलेजमध्ये पगार एक तारखेला होत असे. बाकीच्या महाविद्यालयामध्ये वेतन पगार ह्या फक्त संकल्पना कागदावर होत्या. त्या अस्तित्वात येण्यासाठी प्राध्यापकांना दीर्घकाळ संघर्ष करावा लागला. याची सविस्तर नोंद या विशेषांकात घेण्यात आली आहे.

या विशेषांकामध्ये महाराष्ट्रातील अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन वितरण व्यवस्थेच्या निर्मितीमागील ऐतिहासिक संघर्ष, शासन धोरणे, आर्थिक अडचणी आणि शिक्षक संघटनांच्या आंदोलनांचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे. हा विशेषांक केवळ वेतन व्यवस्थेचा इतिहास नसून उच्च शिक्षण क्षेत्रातील आर्थिक अन्यायाविरुद्धच्या संघटित लढ्याचे दस्तऐवजीकरण आहे.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर विविध भागांमध्ये महाविद्यालयांना मिळणाऱ्या अनुदानाच्या पद्धती वेगवेगळ्या होत्या. विदर्भ, मराठवाडा आणि मुंबई विभागात स्वतंत्र नियम लागू होते. १९६४-६५ नंतर राज्यभर एकसमान "Maintenance Grant" म्हणजेच "परिरक्षण अनुदान" योजना लागू करण्यात आली. या योजनेत महाविद्यालयांच्या खर्च आणि उत्पन्नातील तुटीच्या आधारावर शासन अनुदान देत असे. यालाच पुढे "Deficit Grant" पद्धती असेही संबोधले गेले.

या व्यवस्थेची मूलभूत कल्पना अशी होती की, महाविद्यालयांनी काही निधी

समाजाकडून उभारावा आणि उर्वरित तूट शासनाने भरून काढावी. परंतु प्रत्यक्षात ही योजना अनेक दोषांनी ग्रस्त होती. महाविद्यालयांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत विद्यार्थ्यांची संख्या आणि फी होती. विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली की संस्थांची आर्थिक परिस्थिती ढासळत असे आणि शिक्षकांचे वेतन महिनोन्महिने थकले जाई. अनेक महाविद्यालयांमध्ये शिक्षकांना ६ ते ११ महिन्यांपर्यंत वेतन मिळत नसे.

१९७५-७६ नंतर परिस्थिती अधिक गंभीर झाली. शैक्षणिक धोरणातील बदल, विद्यार्थ्यांची घटती संख्या आणि दोषपूर्ण अनुदान पद्धती यामुळे शिक्षकांचे जीवन अस्थिर झाले. महाविद्यालय व्यवस्थापनांकडे पुरेसा निधी नसल्याने शिक्षकांचे पगार थकू लागले. या काळात शिक्षक संघटनांनी नियमित वेतनासाठी तीव्र आंदोलन सुरू केले. नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन (NUTA) आणि महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन (MFUCTO) यांनी शासनावर दबाव आणला.

या संघर्षाचा परिणाम म्हणून २१ सप्टेंबर १९७७ रोजी शासनाने वेतन वितरण योजना लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. शासनाने स्पष्टपणे जाहीर केले की अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित व पूर्ण वेतन मिळावे यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यात येईल. गरज पडल्यास शासन तीन महिन्यांच्या वेतनाइतकी आगाऊ आर्थिक मदतही देईल, असे आश्वासन देण्यात आले. ही योजना शिक्षकांच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरली.

विशेषांकात या योजनेच्या स्थापनेमागील आंदोलनांचे वर्णन अत्यंत प्रभावीपणे केले आहे. शिक्षकांनी संप, निदर्शने, निवेदने आणि कायदेशीर लढ्यांच्या माध्यमातून शासनाला निर्णय घेण्यास भाग पाडले. शिक्षकांचे वेतन थकविणे म्हणजे शिक्षण व्यवस्थेचा अपमान असल्याचे संघटनांनी ठामपणे मांडले. या लढ्यात NUTA चे नेतृत्व, त्यांची संघटनशक्ती आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांचे विशेष महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

विशेषांकात शासनाच्या धोरणांवर टीकाही करण्यात आली आहे. अनुदान वितरणातील विलंब, अपुरी तरतूद, विद्यार्थ्यांच्या संख्येवर आधारित आर्थिक मोजमाप आणि संस्थांवरील अतिरिक्त आर्थिक भार यामुळे वेतन व्यवस्थेची अंमलबजावणी अनेकदा संकटात आली. काही वेळा शासनाने योजना जाहीर केली; परंतु प्रत्यक्ष निधी उपलब्ध न झाल्याने शिक्षकांचे प्रश्न कायम राहिले. त्यामुळे संघटनांना वारंवार आंदोलन करावे लागले.

या विशेषांकाचा मुख्य संदेश असा आहे की, शिक्षण क्षेत्र टिकवायचे असेल तर शिक्षकांना आर्थिक स्थैर्य आणि नियमित वेतन मिळणे अत्यावश्यक आहे. वेतन वितरण योजना ही केवळ आर्थिक योजना नव्हती, तर शिक्षकांच्या सन्मान, सुरक्षितता आणि शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेशी संबंधित सामाजिक चळवळ होती. शिक्षक संघटनांच्या एकजुटीमुळे आणि सातत्यपूर्ण संघर्षामुळेच ही व्यवस्था निर्माण झाली, असे या विशेषांकातून स्पष्ट होते.

या अंकामधील एक प्रसंग मनाला अतिशय भावनारा आहे. शासन नियंत्रित वेतन वितरण व्यवस्था स्थापित केल्याबद्दल व उरलेल्या प्रश्नांच्या बाबतीत सुद्धा शासनातर्फे सहकार्यच राहील या समाधानकारक आश्वासनाबद्दल राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील व शिक्षण मंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचा नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ (नुटा) मार्फत सत्कार करण्यात आला होता. नागपूर विद्यापीठांमध्ये दिनांक ०४ नोव्हेंबर १९७७ रोजी सकाळी सव्वा आठ वाजता हा सत्कार नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहामध्ये पार पडला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.डी.वाय.गोहोकार हे होते. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाने (नुटा) जाहीरपणे सत्कार केलेले वसंतदादा पाटील हे पहिले व एकमेव मुख्यमंत्री असून श्रीमती प्रतिभाताई पाटील या पहिल्या व एकमेव शिक्षण मंत्री होत.

(२)

### न्यायाधिकरणाची स्थापना

"**न्यायाधिकरणाची स्थापना**" या ४० पानी विशेषांकामध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवा, हक्क, न्याय आणि तक्रार निवारण यंत्रणेच्या स्थापनेचा संघर्ष मांडलेला आहे. हा विशेषांक मुख्यतः शिक्षकांना अन्यायाविरुद्ध कायदेशीर संरक्षण मिळावे, यासाठी झालेल्या दीर्घ चळवळीचा दस्तऐवज आहे.

या विशेषांकात १९७० च्या दशकापासून शिक्षकांना सेवासुरक्षा नसल्याने त्यांना होणाऱ्या त्रासाचे वर्णन करण्यात आले आहे. त्या काळात शिक्षकांना अन्यायकारक बदली, सेवामुक्ती, वेतन रोखणे किंवा निलंबन याविरोधात दाद मागण्यासाठी कोणतीही प्रभावी कायदेशीर यंत्रणा उपलब्ध नव्हती. त्यामुळे शिक्षक संघटनांना आंदोलन, मोर्चे, संप आणि न्यायालयीन लढे यांचा आधार घ्यावा लागत होता. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन (MFUCTO) आणि नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन (NUTA) यांनी शिक्षकांसाठी स्वतंत्र न्यायाधिकरण स्थापनेची मागणी सुरू केली.

विशेषांकात नमूद केल्याप्रमाणे, २३ एप्रिल १९७७ रोजी शासनाशी झालेल्या चर्चेत "There is no legally constituted machinery" असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. म्हणजेच शिक्षकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी कायदेशीर यंत्रणा अस्तित्वात नव्हती. शासनाने योग्य कायद्यात दुरुस्ती करून ही उणीव भरून काढण्याचे आश्वासन दिले. या चर्चेमुळे पुढे विद्यापीठ न्यायाधिकरणाच्या स्थापनेचा मार्ग मोकळा झाला.

विशेषांकात न्यायाधिकरण स्थापनेमागील संघर्षाचे विविध टप्पे दिले आहेत. सुरुवातीला शासनाने अशा न्यायाधिकरणात सरकारी अधिकारी आणि प्राचार्य यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद केली होती. मात्र शिक्षक संघटनांनी याला तीव्र विरोध केला. कारण अशा व्यक्ती निष्पक्ष न्याय देऊ शकणार नाहीत, असे मत होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानेही १९८७ च्या निर्णयात स्पष्ट केले की, अशा प्रकारच्या नियुक्त्या न्यायाधिकरणाच्या उद्देशालाच हरताळ फासणाऱ्या आहेत. न्यायाधिकरण हे स्वतंत्र व न्यायिक स्वरूपाचे असावे आणि त्याचे अध्यक्ष हे न्यायालयीन अनुभव असलेले व्यक्ती असावेत, असे न्यायालयाने सांगितले.

या विशेषांकात "Statute 53" चा उल्लेख महत्त्वाचा आहे. या तरतुदीमुळे संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांच्या कायम नियुक्तीचा प्रश्न मार्गी लागला. शिक्षकांना सेवासुरक्षा देण्यासाठी या नियमांची निर्मिती झाली. त्याचबरोबर अन्यायकारक सेवामुक्तीविरुद्ध शिक्षकांना न्यायालयीन संरक्षण मिळाले. विशेषांकात विविध न्यायालयीन निर्णय, शासन पत्रव्यवहार आणि समिती अहवालांचा समावेश करून या संघर्षाची कागदपत्रांसह मांडणी करण्यात आली आहे.

विशेषांकात शिक्षकांच्या वेतन, सातवा वेतन आयोग, सेवा अटी आणि शासनाच्या भूमिकेवरही टीका करण्यात आली आहे. सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीत राज्य शासनाने विलंब केल्यामुळे शिक्षकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले, असे नमूद केले आहे. शिक्षकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आंदोलनांची वेळ आली. न्यायालयाने २०१३ मध्ये शासनाला "Grievances Redressal Mechanism (GRM)" स्थापन करण्याचे निर्देश दिले. मात्र शासनाने स्थापन केलेली यंत्रणा प्रभावी नसून ती फक्त औपचारिकता असल्याची टीका विशेषांकात करण्यात आली आहे.

विशेषांकाचा मुख्य संदेश असा आहे की, शिक्षकांना न्याय देण्यासाठी स्वतंत्र, निष्पक्ष आणि प्रभावी न्यायव्यवस्था अत्यावश्यक आहे. शिक्षक संघटनांनी अनेक दशकांच्या संघर्षातून न्यायाधिकरणाची स्थापना घडवून आणली. हा संघर्ष केवळ वेतन किंवा सेवासुरक्षेसाठी नव्हता, तर शिक्षण क्षेत्रातील सन्मान, स्वायत्तता आणि न्याय टिकवण्यासाठी होता. विशेषांकात संघटनात्मक लढ्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले असून भविष्यातही शिक्षकांनी एकत्रितपणे आपल्या हक्कांसाठी सजग राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

(३)

### विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला तिसऱ्या वेतन आयोगापर्यंतचा संघर्ष

विद्यापीठ स्तरावरील भारतातील सर्वात पहिली संघटना म्हणजे पश्चिम बंगालमधील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघटना होय. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या कितीतरी अगोदरपासून ती संघटना कार्यरत होती. १९२६ साली ती संघटना स्थापन झाली. जगप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ आचार्य प्रफुल्लचंद्र रे (P.C.Ray) हे त्या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, दुसऱ्या वर्षीचे (१९२७) संघटनेचे अध्यक्ष म्हणजे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन (जे नंतर भारताचे उपराष्ट्रपती व राष्ट्रपती होते.) १९२८ मध्ये प्राचार्य गिरिशचंद्र बोस, १९३१ मध्ये नोबेल पारितोषक विजेते प्रा.सी.व्ही.रमण, १९३५ मध्ये प्रा.एच.के.सेन, १९४९ मध्ये प्रा.एस.पी.मुखर्जी व १९८१ मध्ये प्रा.इरफान हबीब अशी काही या संघटनेच्या नामांकीत अध्यक्षांची नावे नमूद करण्यासारखी आहेत.

१९६२ साली पश्चिम बंगाल व उत्तरप्रदेश या राज्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या प्राध्यापक संघटनांच्या नेत्यांनी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या (AIFUCTO) स्थापनेमध्ये पुढाकार घेतला. दिनांक २४ एप्रिल १९६२ रोजी वाराणशी येथे उदय प्रताप कॉलेजमध्ये अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाची स्थापना झाली (AIFUCTO). कलकत्त्याचे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.मनिंद्र मोहन चक्रवर्ती हे संघटनेचे पहिले अध्यक्ष व जोनपूरचे प्राचार्य हृदय नारायण सिंग हे

पहिले सरचिटणीस होते. या संघटनेचा रौप्यमहोत्सव १९८६ मध्ये व सुवर्ण महोत्सव २०१२ मध्ये संपन्न झाला. चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या काळात अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष म्हणून डॉ.ठेकेदत्त यांनी महत्वाची कामगिरी बजावली.

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची (MFUCTO) स्थापना :** नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाची (NUTA) स्थापना १७ मार्च १९६३ रोजी झाली. मुंबई विद्यापीठ शिक्षक संघटनेची (BUCTU) स्थापना ऑक्टोबर १९६६ मध्ये झाली. या दोन संघटनांनी आपले सुवर्णमहोत्सव नुकतेच संपन्न केलेले आहेत. १९७३ मध्ये मराठवाडा विद्यापीठ शिक्षक संघटना (MUCTA) व जानेवारी १९७४ मध्ये पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघटना (PUCTO) स्थापन झाली. ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७५ मध्ये शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाची (SUTA) स्थापना झाली. त्या त्या शहरापुरते काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या संघटना महाराष्ट्रातील काही शहरांमध्ये अस्तित्वात होत्या.

दिनांक ४ ऑक्टोबर १९७५ रोजी एम.फील. पदवी प्राप्त असणे ही नव्या भरतीसाठी ठरवण्यात आलेली पात्रता सेवेत असलेल्या प्राध्यापकांच्यावर लादण्याचा प्रयत्न शासनाने केला होता. “This qualifications are applicable to both existing teachers and the Teachers who may be recruited hereafter”

या शासनादेशात एम.फील. पदवी सर्व प्राध्यापकांना नवीन वेतन श्रेणी रुपये ७००-१६०० देताना आवश्यक केली होती. त्यावेळी केरळ सोडल्यास देशातील इतर कोणत्याही राज्यात एम.फील. ही पदवी दिली जात नव्हती. दि.४ ऑक्टोबर १९७५ चा शासन निर्णय राज्य शासनाने काढला त्यामुळे पात्रतेच्या अटीमध्ये बेकायदेशीरपणे बदल करण्यात आला होताच त्याशिवाय इतर अनेक निषेधार्ह बाबी या निर्णयांमध्ये नमूद करण्यात आल्या होत्या. त्या म्हणजे प्राध्यापकांचे आठवड्याचे काम २५ घड्याळीतास, शिक्षकांना मिळणारी उन्हाळ्याची व दिवाळीची सुट्टी लक्षात घेता प्राध्यापकांनी परीक्षेचे काम कोणताही मोबदला न घेता करावे, रुपये ७०० ते १६०० वेतनश्रेणीमध्ये रुपये १३०० च्या टप्प्यावर प्राध्यापकांचे कामाचे मूल्यमापन करावे इ. अनेक अनिष्ट बाबी शासन निर्णयामध्ये समाविष्ट करण्यात आल्या होत्या.

सन १९६० ते १९७५ या काळात विद्यापीठनिहाय शिक्षक संघटनांची स्थिती वरीलप्रमाणे होती. या सर्व संघटनांना एका सूत्रामध्ये बांधून महाराष्ट्र स्तरावर संघटनेचे छत्र अस्तित्वात येणे आवश्यक होते. नुटाचे अध्यक्ष मा.आमदार

# नुटा बुलेटीन - वार्तापत्र नव्हे एक चळवळ

## - प्रा.प्रकाश मा.तायडे, नुटाचे माजी कोषाध्यक्ष

नुटा या शिक्षक संघटनेद्वारे नियमित प्रकाशित होणाऱ्या वार्तापत्राला ५० वर्षे पूर्ण झालीत. एखाद्या व्यावसायिक संघटनेच्या नियमित वार्तापत्राला ५० वर्षे पूर्ण होणे हे विरळच आहे. हे कार्य सुरू करणारे आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख साहेब व त्यांना सहकार्य करणाऱ्या सर्व शिलेदारांचे मनःपूर्वक अभिनंदन. आम्ही ज्येष्ठ मंडळी कडून या वार्तापत्राचे तोंडभर कौतुक ऐकायचो. सुरुवातीला हस्तलिखिताच्या सायकोस्टाईल प्रति काढून सर्व सभासदांना पायी वा सायकल घेऊन त्या घरोघरी वितरित केल्या जात होत्या. काळाच्या ओघात विज्ञानाची प्रगती व संगणकशास्त्राच्या भरारीसोबत जुळवून घेत आजच्या डिजिटल युगातील अपेक्षेप्रमाणे हे वार्तापत्र आजही सात हजारपेक्षा अधिक सभासदांना वितरित केल्या जाते. पोस्टाने आपली वितरण व्यवस्था खाजगी केली त्यामुळे वार्तापत्राच्या वितरण प्रणालित दोष निर्माण झाले. नियमित वाचकाची गैरसोय लक्षात घेऊन हे बुलेटीन छपाईला गेल्याबरोबर ते नुटाच्या अधिकृत वेबसाईटवर अपलोड केले जाते. त्यामुळे केवळ भारतातीलच नव्हे तर जगाच्या कोणत्याही भागातून असलेल्या जिज्ञासू व्यक्तीला हे वार्तापत्र सहज वाचता येते. या प्रक्रियेमागे खूप कठोर परिश्रम आहेत. म्हणूनच तुम्हा-आम्हाला १००% सत्य, बिनचूक व निर्दोष वार्तापत्र वाचायला मिळते.

नुटा बुलेटीन या नावाप्रमाणे ते नुटा या विदर्भातील उच्च शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या संघटनेचे वार्तापत्र आहे. साहजिकच शिक्षकांचे प्रश्न, शिक्षकांच्या सेवा शर्ती, वेतन आयोगाच्या शिफारसी, भरतीप्रक्रिया नियुक्ती, पदोन्नती, निवृत्तिवेतन, करारावरील नियुक्त्या, शिक्षणाचे व्यापारीकरण, शिक्षणातील असमानता आणि शासनाच्या बदलत्या शैक्षणिक धोरणांचा शिक्षक व विद्यार्थी वर्गावर होणारा परिणाम या सर्व बाबी मांडणे, त्याचा ऊहापोह करणे, त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा समाचार घेणे व संबंधितांना न्याय मिळवून देणे हे या वार्तापत्रासाठी क्रमप्राप्तच आहे.

शिक्षकांप्रमाणेच सर्वच कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून घेण्यासाठी या वार्तापत्राची प्रचंड मदत होते हे अनेक कर्मचारी संघटनांच्या सभा-आंदोलनांमधून पाहायला मिळते. पुढे जाऊन आपल्या लक्षात येते की, या भागातील सामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे, त्याचे जीवन अधिक सुखी व्हायला पाहिजे ही तळमळ या वार्तापत्रातून दिसून येते. या भागातील सर्वात जास्त लोकसंख्येचा भार हा शेतीवर आहे. त्या कृषकाचे संपूर्ण जीवन आणि मरण याच शेतीवर अवलंबून आहे. सोन्यासारखी शेती असणाऱ्या याच विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्याही सर्वाधिक आहेत. या प्रश्नाचा सविस्तर ऊहापोह आपल्याला या वार्तापत्रात अनेकदा वाचायला मिळाला आहे. शेतीच्या बांधापर्यंत जोपर्यंत पाणी पोहचत नाही तोपर्यंत या समस्येचे निराकरण होऊ शकत नाही अशी अभ्यासपूर्ण भूमिका नुटाच्या शीर्ष नेतृत्त्वाने मांडली. त्यामुळेच जलसिंचन अनुशेष, जलसिंचन गरज, जलसिंचन व्यवस्थापन अशी विविध मांडणी या वार्तापत्राच्या अनेक विशेषांकातून आम्ही अनुभवली आहे. रस्ते अनुशेषाचे प्रश्न, ग्रामीण व शहरी पाणी पुरवठ्याचे प्रश्न असे कितीतरी समाज स्वास्थ्याशी निगडित प्रश्न या वार्तापत्राने हाताळले आहेत. एखादा गंभीर विषय मांडणे, त्याचे चिकित्सक अवलोकन करणे व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी ठोस उपाययोजना सांगणे, हे काम नुटा वार्तापत्राने केले आहे.

एखाद्या व्यावसायिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संघटनेची बांधणी कशी असावी, शिस्त कशी असावी, आर्थिक शिस्त किती महत्त्वाची असते, लोकवर्गणीचा पैसा खर्च करतांना, त्याची जपवणूक करतांना किती व कशी दक्षता घ्यावी याचे मार्गदर्शन याच नुटा वार्तापत्रातून मिळते. मी कोषाध्यक्ष म्हणून काम करतांना मला या बुलेटीनने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वाची खूप मदत झाली. शिक्षकाने पत्करलेली नोकरी ही फक्त वेतनापुरती मर्यादित नसून ते एक व्रत आहे म्हणून प्रमाणिकतेसोबत सेवाभाव तुमच्या व्यक्तीमत्त्वातून अधोरेखित झाला पाहिजे अशी कानउघाडणी करतांना या वार्तापत्राने अनेकदा समज दिली आहे. या वार्तापत्रामध्ये प्रसिद्ध होणारे अनेक शासननिर्णय, मा.न्यायालयाचे विविध खटल्यातील निकाल, शासनाची परिपत्रके, अनेक कर्मचाऱ्यांना न्याय प्राप्त करण्यासाठी उपयोगी पडत असतात.

या वार्तापत्राची दुसरी भक्कम बाजू म्हणजे अनेकदा प्रसिद्ध होणारे आदरणीय बी.टी.साहेबांचे लेख. लेखाचे शीर्षक वाचताना एक वेगळी अनुभूती मिळायला लागते. मी फक्त दोन शीर्षकांचा उल्लेख करेल. “Let the Era of love letter come to an end” या लेखात भाऊ एखादा प्रश्न साधेपणाने सुटणार नाही याची काळजी घेण्यासाठी विनाकारण अनेक पत्र देऊन शासकीय स्तरावर गोंधळ निर्माण करणाऱ्या व्यवस्थेचा समाचार घेतात. दुसऱ्या एका लेखात संस्कृत ऋचेचा उल्लेख करित अर्थ मांडतात “Repeated questioning is equally essential for without a keen spirit of inquiry, there is no knowledge” या लेखाचा आशय प्रश्न विचारणे चूक नाही, तर सतत प्रश्न विचारत राहिलात तर एक दिवस उत्तर मिळायला लागते. उपरोक्त लेखाप्रमाणे मा.भाऊंचे लेख म्हणजे दर्जेदार वृत्तपत्राच्या अग्रलेखाप्रमाणे मौलिक असतात. बरेचदा ते रंजकही असतात. एखाद्या साहित्यकृतीत हसवतांना रडवण्याचे सामर्थ्य असते अगदी तसेच चिमटा काढून रक्त निघणार नाही याची काळजी घेत भाऊ त्या लेखात प्रश्न मांडतात, प्रश्नाचा प्रवास सांगतात व शेवटी संबंधित रुग्णाला औषध का लागू पडत नाही याची कारणमीमांसा करतात.

म्हणूनच नुटा वार्तापत्र केवळ शिक्षक व कर्मचारी यांच्याशी संबंधित नसून सामाजिक सामाजिक न्यायाचे अधिष्ठान मजबूत करणारे व लोकहिताचे रक्षण करणाऱ्या लोकचळवळीचे व्यासपीठ आहे असे मला वाटते.

हेरॉल्ड लौस्की या प्रसिद्ध विचारवंताचे एक वाक्य संघटनात्मक प्रवासात फार उपयुक्त आहे “Where logic Ceases to be a Strength, then Strength is only logic”, मात्र आम्हा सर्वांना एकाचवेळी Strength आणि logic, तर्क आणि शक्ती यांचा संयोग असणारी मानसिकता या वार्तापत्रामुळे प्राप्त झाली.

या कार्यास समर्थपणे तडीस नेणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

प्रा.बी.टी.देशमुख (भाऊ) यांनी ऑक्टोबर १९७४ मध्ये नागपूर येथे बोलाविलेल्या महाराष्ट्रातील प्राध्यापक नेत्यांच्या बैठकीमध्ये याबाबतचा विचार मान्य करण्यात आला व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची (MFUCTO) प्रत्यक्ष स्थापना दि.२ एप्रिल १९७५ रोजी मुंबई येथे बोलाविलेल्या बैठकीमध्ये झाली.

दिनांक ४ ऑक्टोबर १९७५ च्या शासन निर्णयाचा धिक्कार करणारी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची सभा ऑक्टोबर १९७५ च्या शेवटच्या आठवड्यात किंमतराय बिल्डिंग या महर्षी कर्वे मार्गावरील मुंबई विद्यापीठाच्या इमारतीमधील मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या कार्यालयामध्ये झाली होती. आणीबाणीचा काळ असल्याने इमारतींना पोलिसांनी वेढा दिला होता. मोठा पोलीस फौजफाटा हजर होता. शासनाचा धिक्कार करणारा ठराव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.

धिक्काराच्या जाहीर सभेनंतर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ.एल.बी.केनी व सरचिटणीस प्रा. किशोर ठेकेदत्त यांना ०१ नोव्हेंबर १९७५ रोजी मिसा खाली अटक करून १५ महिने स्थानबद्धतेत ठेवण्यात आले. या उभयनेत्यांना ०१ नोव्हेंबर १९७५ रोजी अटक करण्यात आली होती. त्याच दिवशी डॉ.किशोर ठेकेदत्त यांच्या मुलाचा पहिला वाढदिवस होता व दिवाळीचा सण होता. ही नोंद हृदयस्पर्शी तर आहेच पण नेत्यांच्या त्याग, निष्ठा आणि समर्पणाचे ज्वलंत उदाहरण आहे.

आणीबाणी मध्ये अनेक संघटना शांत असताना त्यांचे कार्य व कार्यालय दोन्ही बंद केलेल्या असताना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ मात्र आणीबाणीच्या परिस्थितीत ही शासन निर्णयाला विरोध करण्याचे काम करत होता याबद्दल सर्वांना आश्चर्य वाटत होते.

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने केलेल्या ठरावानुसार महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापकांनी आमच्या नेत्यांना स्थानबद्धतीतून मुक्त करा असा मजकूर लिहिलेले बॅजेस लावून राज्यभर आंदोलन केले. तसेच दि.१७ नोव्हेंबर १९७५ रोजी महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना एक निवेदन देऊन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ऑक्टोबर १९७५ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचा तीव्र विरोध केला. आमच्या नेत्यांना ताबडतोब मुक्त करण्यात यावे, अशा प्रकारची पत्र भारताच्या माननीय राष्ट्रपतींना दि. २२ नोव्हेंबर, १९७५ या तारखेला महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी पाठवावी असाही एक आंदोलनाचा कार्यक्रम महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने राबवण्यात आला.

दिनांक ९ फेब्रुवारी १९७६ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी मुंबई येथे एक दिवसाच्या उपोषणाचा कार्यक्रम डॉ.एल.बी.केनी व प्रा.किशोर ठेकेदार यांची सुटका व्हावी यासाठी आयोजित केला होता. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने असा कार्यक्रम आयोजित केलेला आहे याची माहिती झाल्यामुळे त्याच वेळी येरवडा तुरुंगात अटक झालेल्या व स्थानबद्धतीत असलेल्या २० शिक्षकांनीही त्याच दिवशी उपोषण केले होते.

डॉ.किशोर ठेकेदत्त यांनी स्थानबद्धतेच्या या काळामध्ये कार्ल मार्क्सच्या 'दास कॅपिटल' चे खंड तपशीलवार वाचण्यामध्ये आपला वेळ कामी लावला. त्या काळात त्यांनी काही कवितेच्या रचनाही केल्या. त्यापैकी 'Dream' या मथळ्याची एक कविता त्यांच्या सहकाऱ्यांच्या हाती लागली व ती इकॉनॉमिक टाइम्स मध्ये त्यावेळी छापून आली होती. 'Quantum Theory' वर त्यांनी लिहिलेला एक लेख 'Social Scientist' या नियतकालिकामध्ये छापून आला होता.

**अटकेतून सुटका व पदाधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारला:** प्राध्यापक महासंघाने चे अध्यक्ष व सचिव या दोघांनाही ०१ नोव्हेंबर १९७५ रोजी अटक करण्यात आली होती व दि.२७ जानेवारी १९७७ मध्ये त्यांची मुक्तता करण्यात आली. जवळजवळ १५ महिने स्थानबद्धतेत राहिल्यानंतर मुक्तता झाल्यावर त्यांनी पुण्याहून मुंबईला व्ही.टी. स्टेशनवर उतरल्यानंतर पहिले काम काय केले असेल तर संघटनेच्या कार्यालयात जाऊन आपल्या पदाचा पदभार स्वीकारला.

विद्या व्यासंगाने ओतप्रोत भरलेल्या आपल्या यशस्वी व्यावसायिक जीवनामध्ये संघटनेचे नेतृत्वाचे हे जोखमीचे व कटकटीचे काम आपण कशासाठी स्वीकारले? असा ना पसंतीचा शब्द त्या १५ महिन्याच्या व त्यानंतरच्या काळात कधी डॉ.ठेकेदत्त यांचेकडून ऐकायला मिळाला नाही. त्यांच्या प्रदीर्घ स्थानबद्धतेमुळे त्यांच्या वैयक्तिक जीवनामध्ये आलेल्या आर्थिक संकटांना तोंड देताना होणारी यातायात व दगदग याचा पुसटसा उल्लेख सुद्धा कधी आपल्या सहकाऱ्यांच्या कानावर पडू नये याची दक्षता ते घेत असत. (NB-2019).

त्यांच्या नेतृत्वाची खासियत म्हणजे वैयक्तिक प्रसिद्धीपेक्षा संघटनेची ताकद वाढवण्यावर त्यांनी नेहमी भर दिला. कठोर शब्दांपेक्षा तर्कशुद्ध मांडणी, भावनिक उद्रेकांपेक्षा शिस्तबद्ध संघर्ष आणि क्षणिक लाभांपेक्षा दीर्घकालीन परिणाम यांवर त्यांचा विश्वास होता. आज त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे कठीण आहे. मात्र त्यांनी रुजवलेली मूल्ये, दिलेली दिशा आणि निर्माण केलेली वैचारिक परंपरा हीच त्यांची खरी शाश्वत ओळख आहे. संघटनेच्या इतिहासाचा संदर्भ पहाता, आमच्यासाठी संघटनेने काय केले? असा प्रश्न विचारण्याचे धाडस कोणी प्राध्यापक करणार नाही.

(४)

## विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला चौथ्या वेतन आयोगासाठी चा संघर्ष

सर्वोच्च न्यायालयाने वेतन आयोगाच्या बाबतीत स्थिर भूमिका त्याकाळी घेतली होती. सुप्रीम कोर्टाने यापूर्वी निर्णय दिलेले आहेत की आम्ही या वेतन आयोगाच्या कामांमध्ये ढवळाढवळ करणार नाही. विशेष काही गोष्टी असतील तर त्यामध्ये लक्ष देऊ. सर्वोच्च न्यायालयाने वेतन आयोगाच्या बाबतीत ही भूमिका स्थिर आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या 'स्टेट ऑफ उत्तर प्रदेश आणि इतर विरुद्ध जे. पी. चौरासिया आणि इतर' या याचिकेमध्ये न्यायालयाने काही आगाऊ हेतू ठेवून केले असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. अन्यथा वेतन आयोगाच्या शिफारशी आम्ही मान्य करू ही भूमिका अनेक प्रकरणांमध्ये घेतली आहे .

अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने दिनांक ४ ऑगस्ट १९८७ पासून सर्व विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षक देशव्यापी संपाला सुरुवात करतील असा निर्णय १७ ते १९ मे १९८७ या तीन दिवस मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या वैधानिक परिषदेमध्ये घेतला होता. त्यानुसार ४ ऑगस्ट १९८७ पासूनचे बेमुदत संप आंदोलन सुरू झाले होते.

या आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे ज्येष्ठ नेते प्रा.किशोर ठेकेदत्त हे या आंदोलनाच्या काळात अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष होते आणि पश्चिम बंगालचे प्राध्यापक संघटनेचे ज्येष्ठ नेते मृण्मय भट्टाचार्य हे सर कार्यवाह होते. या दोघांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय स्तरावर राज्यस्तरावर तसेच विविध राज्यांमध्ये वेतन आयोगासाठीचा केलेला संघर्ष या विशेषांकामध्ये नोंदवला आहे. या वेतन आयोगाचा लाभ देशातील दोन लाख तीस हजार विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना झाला होता तसेच मेहरोत्रा समितीने पहिल्या पाच वर्षासाठी शंभर टक्के फरकाचे रक्कम अनुदान म्हणून द्यावी अशा प्रकारची शिफारस केली होती पण केंद्र शासनाने ती शिफारस मान्य केली नाही. अतिरिक्त भाराच्या ८० टक्के मदत करू अशी केंद्र शासनाने भूमिका घेतली होती.

दिनांक ४ ऑगस्ट १९८७ रोजी सुरू झालेला देशभरातील विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षकांचा बेमुदत संप हा ४ सप्टेंबर १९८७ रोजी संपुष्टात आला. ३२ दिवसाच्या या संप काळात घडलेल्या अनेक घटनांचे तपशील या अंकात उपलब्ध आहेत.

शिक्षक दिनाच्या दिवशी राष्ट्रीय राजधानीत आंदोलन, जेलभरो आंदोलन, ३० ऑगस्ट १९८७ च्या मध्यरात्रीचा ४ कलमी प्रस्ताव त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होता.

१. मंत्रालयाने अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी निमंत्रण दिलेले आहे.

२. मंत्रालयाने महासंघाला आंदोलन मागे घ्यावी अशी विनंती केली आहे .

३. महासंघाने आपल्या आंदोलन मागे घेतले.

४. मानव संसाधन मंत्री एक निवेदन निर्गमित करतील व विद्यापीठांना आयोगाने महासंघाची चर्चा करावी आणि जे मुद्दे समोर आलेले आहेत त्यानुसार वेतन आयोगामध्ये काही बदल करणे आवश्यक आहे का? ते बदल सुचवावेत असे त्या निवेदनामध्ये नमूद केले होते .

विद्यापीठ अनुदान आयोगाबरोबर झालेल्या चर्चेमध्ये '**आश्वासित प्रगती योजना**' **(CAS)** हा या चर्चेचा गाभा होता. शासकीय सेवेमध्ये भरतीच्या अनेक संधी उपलब्ध असतात. परंतु प्राध्यापकांना या संधी मिळण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा अशी महासंघाची भूमिका होती. सेवाकाळात प्राध्यापकाला किमान दोन वेळा बढतीच्या संधी मिळाव्यात यासाठी महासंघाने प्रचंड प्रयत्न केले.

या आंदोलनातून खालील महत्त्वाच्या बाबी प्राध्यापकांना मिळाल्या

१. ७००-१६०० च्या धावत्या वेतनश्रेणीमध्ये सर्व सेवाकाळ व्यतीत करण्याची स्थिती संपुष्टात आली. मूळ वेतन श्रेणी, वरिष्ठ वेतन श्रेणी, निवड

श्रेणी अशा ३ वेगवेगळ्या श्रेण्या व दोन कालबद्ध पदोन्नतीच्या संधी शिक्षकांना उपलब्ध झाल्या. चौथ्या वेतन आयोगापासून ही प्राध्यापकांना सर्वात मोठी उपलब्धी होती.

२. पीएच.डी. असेल तर रीडर या पदनामा सह ३७००-५७०० ही वेतन श्रेणी, सिलेक्शन ग्रेड लेक्चरर हे पदनाम या वेतन आयोगातून प्राप्त झाले.

३. मूळ वेतनश्रेणीत दहा वर्ष काढल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणी व त्या वेतनश्रेणी दहा वर्षे काढल्यानंतर निवड श्रेणी देण्याची योजना शासनाला मागे घ्यावी लागेली. वीस वर्षाच्या ऐवजी सोळा वर्षाचा कालखंड निवड श्रेणी मिळवण्यासाठी आवश्यक असेल अशी योजना अस्तित्वात आली.

४. अधिव्याख्यात्याची नेमणूक होत असताना पीएच.डी किंवा एम.फील.ही पात्रता धारण करणाऱ्यांना नेमणुकीच्या वेळेस अनुक्रमे ३ व १ अशा आगाऊ वेतन वाढी देण्याची व्यवस्था या वेतन आयोगाने दिली.

# "रोलमॉडेल" म्हणजे नुटा बुलेटीन

## - प्राचार्य डॉ.अरविंद देशमुख, अमरावती

कुठलाही समाज हा आपल्या शिक्षण पद्धतीपेक्षा अधिक गतिमान असू शकत नाही व कुठलीही शिक्षण पद्धती ही तेथिल शिक्षकांपेक्षा अधिक गतिमान असू शकत नाही. अशा शिक्षण व शिक्षकांचे महत्त्व आपल्या देशातील सर्व थोर पुरुषांसोबत आपल्या भागातील वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख व संतश्री गुलाबराव महाराजांनी आपल्या प्रतिपादनातून व लेखनातून अधोरेखांकित केलेले आहे. अशा या शिक्षण क्षेत्रातील महाविद्यालयीन शिक्षकांकरिता, प्राध्यापकांकरिता मा. आमदार श्री.बी.टी.देशमुख सर यांनी अत्यंत अभूतपूर्व अशा प्रकारचे कार्य केलेले आहे. समस्त प्राध्यापकांना अत्यंत प्रतिष्ठेचे असे सामाजिक व कौटुंबिक जीवन जगता यावे त्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार शासनाकडून प्राप्त करून घेण्यामध्ये मा.श्री.बी.टी.देशमुख सर अत्यंत कृतज्ञतेने सर्व शिक्षकांच्या कायम स्मरणात राहतील. एवढे त्यांचे योगदान मोठे आहे. परंतु हे कार्य करीत असताना त्यांच्या वैयक्तिक स्वयंशिस्त, तत्त्ववादी कार्यपद्धती सोबतच नुटा ही प्राध्यापक संघटना व नुटा बुलेटिनचे योगदान देखील अनन्यसाधारण आहे. अर्थात मा.श्री.बी.टी.देशमुख सरांच्या अत्यंत अपवादात्मक अशा व्यक्तिमत्त्वाचे पूर्ण प्रतिबिंब आपल्याला नुटा बुलेटीन पडलेले दिसते आणि ते नुटा बुलेटीनचे स्वरूप आजपर्यंत नुटा बुलेटीनच्या सर्व संपादक व या मंडळातील सदस्यांनी जोपासलेले आहे.

नुटा बुलेटीनचा लुकच अत्यंत प्रभावी आहे हे आपण अनुभवलेले आहे व तो लुक आजही इतक्या वर्षानंतर जसाच्या तसा कायम आहे. महात्मा गांधींनी मांडलेल्या "इकॉनोमी ऑफ वर्ड्स" म्हणजे योग्य ठिकाणी, योग्य शब्द याचा प्रत्यय आपल्याला नुटा बुलेटीनमध्ये येतो. नुटा बुलेटिनचे स्वरूप अत्यंत आखीव व रेखीव आहे. मा.श्री.बी.टी. देशमुख सर यांच्याकडून एक वाक्य आपण ऐकलेले आहे की वर्तमानपत्रातील बातमी ही कधीही आपल्या कार्याचा आधार असू शकत नाही. परंतु या धर्तीवर प्रत्यक्ष शासन निर्णय निघाल्यावरही जो विश्वास संबंधितांना वाटणार नाही. तो विश्वास नुटा बुलेटीन मध्ये एकदा तो निर्णय प्रकाशित झाल्यानंतर सर्वांना वाटतो. ही नुटा बुलेटीनची उपलब्धी केवळ असाधारण आहे. अर्थात त्याचे संपूर्ण श्रेय हे या क्षेत्रातील तपःपुत जीवन असणाऱ्या मा.श्री.बी.टी. देशमुख सर व नुटाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आहे. नुटा बुलेटीन मध्ये मांडलेला प्रत्येक विषय अत्यंत कायदेशीर व वस्तुनिष्ठ असतो.

नेट, सेट चळवळीतील कार्यकर्ता म्हणून जेव्हा आज पासून ३५ वर्षांपूर्वी या प्रश्नांची मांडणी राज्यातील विविध नेत्यांसमोर करण्याचा योग आला त्यावेळेला काही मंत्री महोदयांनी त्या संबंधित मांडलेल्या भूमिकेचे मुद्दे घ्यावयास आपल्या स्वीय साहाय्यकांना सांगितले होते. अर्थात ही सर्व मांडणी नुटा बुलीटीन मधली होती हे या ठिकाणी नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे आणि म्हणून एखाद्या संघटनेचे मुखपत्र कसं असावं याचं "रोलमॉडेल" म्हणजे नुटा बुलेटीन आहे.

५. विद्यापीठामध्ये आणि महाविद्यालयातून काम करणारे शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल यांच्या बाबतीत सुद्धा अशा पद्धतीने निर्णय घेतला जाईल असे आश्वासन शासनाने दिले.

६. कृषी महाविद्यालयातील काम करणाऱ्या काही शिक्षकांना सुद्धा या वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या.

७. निरनिराळ्या राज्याच्या राज्य सरकारांनी ०१.०१.१९८६ पासून या वेतनश्रेण्या त्यांच्या त्यांच्या राज्यांमध्ये लागू कराव्या त्यासाठी केंद्र सरकार पूर्ण शक्ती नुसार प्रयत्न करेल असे मान्य करण्यात आले होते. हे संपूर्णपणे जरी यशस्वी झाले नसले तरी काही राज्यांमध्ये त्याचा उपयोग झाला.

या यशस्वी आंदोलनामध्ये देशभरात अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ व महाराष्ट्रात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघटना आणि त्यांच्या घटक संघटना अतिशय कणखरपणे उभ्या राहिल्या. संघटनेच्या नेत्यांविषयी देशभरात आदराची आणि कृतज्ञतेची भावना निर्माण झाली.

या विशेषांकामध्ये चौथा वेतन आयोग लागू करताना विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेल्या संघर्षाचा तपशील दिलेला आहे. शिक्षकांच्या कामाच्या तासांबाबत शासन आणि शिक्षक संघटनांमध्ये मतभेद निर्माण झाले. विद्यापीठ अनुदान आयोगाने आठवड्याला १५ तास अध्यापनाचे नियम दिले होते, परंतु शासनाने त्याचा वेगळा अर्थ लावून शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा ताण आणण्याचा प्रयत्न केला. याविरोधात शिक्षक संघटनांनी आंदोलन केले. १९८७ आणि १९८८ मध्ये दीर्घकाळ संप, निदर्शने आणि संघटनात्मक लढे झाले.

या संघर्षामध्ये विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवड वेतनश्रेणी लागू करण्यासाठी रिफ्रेशर कोर्सची अट घालण्यात आली. अनेक विद्यापीठांनी ही अट शिथिल केली, तर काही ठिकाणी शिक्षक संघटनांना पुन्हा आंदोलन करावे लागले. संघटनांनी शासन निर्णयांचा अभ्यास करून कायदेशीर आणि संघटनात्मक पातळीवर लढा दिला. अखेरीस शासनाला काही अटी मागे घ्याव्या लागल्या आणि शिक्षकांच्या मागण्यांना मान्यता द्यावी लागली.

विशेषांकामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना आणि इतर संघटनांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. शासनाशी झालेल्या बैठका, पत्रव्यवहार, परिपत्रके आणि आंदोलनांचा क्रमवार आढावा यात दिलेला आहे. शिक्षकांच्या वेतनश्रेणी, सेवा अटी आणि पदोन्नती यासाठी केलेल्या संघर्षाचा हा दस्तऐवजीकरणात्मक आढावा आहे.

या काळात रिफ्रेशर कोर्सची अट हा मोठा वादाचा विषय ठरला. वरिष्ठ आणि निवड वेतनश्रेणी मिळवण्यासाठी दोन रिफ्रेशर कोर्स पूर्ण करण्याची अट घालण्यात आली. अनेक विद्यापीठांनी शासनाच्या दबावाखाली ही अट लागू करण्याचा प्रयत्न केला. शिक्षक संघटनांनी शासन निर्णयांचा आणि नियमांचा अभ्यास करून या अटींना विरोध केला. काही कुलगुरूंनी शिक्षकांच्या बाजूने भूमिका घेत अट शिथिल केली. अखेरीस सततच्या आंदोलनांमुळे शासनाला रिफ्रेशर कोर्सची अट मागे घ्यावी लागली.

### (५)
### विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला पाचव्या वेतन आयोगासाठी चा संघर्ष

"५ वा वेतन आयोग विशेषांक" या अंकामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी पाचव्या वेतन आयोगासाठी केलेल्या संघर्षाचा सविस्तर इतिहास मांडलेला आहे. या विशेषांकात शिक्षक संघटनांची भूमिका, केंद्र व राज्य शासनाशी झालेल्या चर्चा, आंदोलने, संप, प्रशासकीय अडथळे आणि न्याय्य वेतनासाठी दिलेला लढा यांचे तपशीलवार वर्णन करण्यात आले आहे.

या संघर्षाची पार्श्वभूमी चौथा वेतन आयोग आणि त्यापूर्वीच्या काळातील अनुभवांमध्ये दिसून येते. विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या सेवाशर्ती, पदोन्नती, वेतनश्रेणी आणि कामाच्या अटी यामध्ये अनेक विसंगती होत्या. महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन (MFUCTO) तसेच अखिल भारतीय शिक्षक संघटनांनी या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष उभारला. शिक्षकांच्या सेवेमध्ये प्रगतीची संधी कमी असल्यामुळे त्यांना दीर्घकाळ एकाच वेतनश्रेणीत काम करावे लागत होते. या पार्श्वभूमीवर शिक्षक संघटनांनी वेतन आयोगाच्या माध्यमातून न्याय्य वेतन, वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी आणि पदोन्नतीच्या संधी यासाठी प्रभावी लढा उभारला. या संघर्षातून शिक्षकांना सेवेत प्रगतीची संधी मिळावी, निवडश्रेणीसाठी लागणारा कालावधी कमी व्हावा आणि प्राध्यापक पदापर्यंत पदोन्नतीचा मार्ग खुला व्हावा या महत्त्वाच्या मागण्या पुढे आल्या.

पाचव्या वेतन आयोगात राज्यस्तरावर फारसा संघर्ष करावा लागला नाही. परंतु केंद्र पातळीवर फार मोठा संघर्ष करावा लागला दिनांक ११ ऑगस्ट १९९८ पासून ते पाच सप्टेंबर १९९८ पर्यंत संबंध देशभर विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षकांना काम बंद आंदोलन करावे लागले त्याची संघर्ष गाथा या विशेष अंकामध्ये आपल्याला वाचायला मिळत आहे .पाचव्या वेतन आयोगाची नेमणूक दिनांक ९ एप्रिल १९९४ रोजी केंद्र शासनाने केली त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती जस्टीस ए. रतावेल पांडियन हे या आयोगाचे अध्यक्ष होते त्याचबरोबर सुप्रसिद्ध अर्थतज्ञ प्रा.सुरेश तेंडुलकर हे आयोगाचे सदस्य होते आणि प्रशासन सेवेतील जेष्ठ अधिकारी श्री.एम.के.काव हे या आयोगाचे सदस्य सचिव होते. निरनिराळ्या १८००० व्यक्तींनी व संघटनांनी या आयोगाकडे आपली निवेदने सादर केलेली होती. खुद्द या आयोगाने निर्णयास ६००० महत्त्वाच्या व्यक्तीकडे व तज्ञांकडे एक प्रश्नावली पाठवली होती यापैकी १२०० लोकांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून आयोगाकडे आपले मत नोंदवले होते ही बाब सुद्धा उल्लेखनीय आहे.

विधान परिषदेमध्ये या वेतन आयोगाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना तसेच उच्च शिक्षण मंत्र्यांचे निवेदन विधान परिषदेतील संपूर्ण संघर्ष यासंदर्भात प्रा.बी.टी.देशमुख भाऊ यांनी सविस्तर तपशील या अंकामध्ये दिलेला आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ महाराष्ट्र राज्य शिक्षक महामंडळ यांनी केलेला संयुक्त संघर्षाचा ठराव हे या वेतन आयोग विशेषांकातील महत्त्वाचा ठराव आहे.

दि.१३ मे १९९९ रोजी शालेय शिक्षकांना वेतन आयोगाच्या संदर्भात शासन निर्णय निर्गमित झाल्याने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने शिक्षक महामंडळाला विनंती केली की आपण आंदोलनामध्ये सहभागी होऊ नये.

या आंदोलनामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष प्रा.सी.आर.सदाशिवन, महासचिव प्रा.संभाजीराव जाधव, प्रा.एकनाथ मांजरेकर तसेच आमदार प्रा.बी.टी.देशमुख (भाऊ) यांनी सहभाग घेतला होता .

पाचव्या वेतन आयोगाच्या वैशिष्ट असे की, राज्यस्तरावर आंदोलन न होता लागू झालेला एकमेव वेतन आयोग होय असे या वेतन आयोगाचे यथार्थ वर्णन आ.बी.टी.देशमुख (भाऊ) यांनी पुढील प्रमाणे केले आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची स्थापना झाल्यापासूनच्या ४०-४५ वर्षात राज्यस्तरावर कोणतेही आंदोलन न होता अंमलात आलेला पाचवा वेतन आयोग हा एकमेव वेतन आयोग म्हणून सांगता येईल. राज्यस्तरावर कोणतेही आंदोलन न होता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पाचव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी महाराष्ट्रात सुरू झाली याचे फार मोठे श्रेय संघटनेबरोबरच तत्कालीन मा. उच्च शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील व तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना द्यावे लागेल. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने संघर्षाची जोरदार तयारी केली होती. तत्कालीन कायदेशीर व घटनात्मक तरतुदीनुसार "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची केंद्रशासन मान्य व्यवस्था" लागू करण्या न करण्याचा अधिकार राज्यशासनाला होता. पण एकदा ती व्यवस्था लागू करण्याचा निर्णय घेतल्यावर त्यामध्ये जोड-तोड किंवा तोडफोड करण्याचा अधिकार राज्यशासनाला जसा आज नाही तसा तो त्यावेळीही नव्हता. या बाबींचा सूक्ष्म अभ्यास तत्कालीन उच्च शिक्षण मंत्र्यांनी केला होता. आपण सत्तेवर येण्यापूर्वीच्या शासनाने इतर सर्व वर्गांना पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे हे एक, दुसरे म्हणजे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा एकच वर्ग आज वंचित राहिलेला आहे. तिसरे म्हणजे फक्त या एकाच वर्गाला वेतनश्रेण्या अजिबात लागू न करण्याचा निर्णय आजघडीला घेणे जवळ जवळ अशक्य आहे. चौथे असे की, एकदा लागू करावयाचे ठरविले की, घटनात्मक व कायदेशीर तरतुदींमुळे केंद्राच्या व्यवस्थेमध्ये आपल्याला बदल करता येत नाहीत. पाचवे असे की, या एकट्या वर्गाच्या बाबतीत जवळ जवळ १२०० कोटी रुपयाची मदत केंद्र शासनाकडून मिळणार आहे. याबाबतची तपशीलवार माहिती मा. उच्च शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी करून घेतली होती.

या विशेषांकात संघटनात्मक एकजुटीचे महत्त्व विशेष अधोरेखित करण्यात आले आहे. NUTA, MFUCTO आणि AIFUCTO या संघटनांनी संयुक्तपणे उभारलेल्या संघर्षामुळे शिक्षकांना न्याय्य वेतनश्रेणी, आर्थिक लाभ आणि सेवाशर्तींमध्ये सुधारणा मिळाल्या. राज्य आणि केंद्र शासनातील राजकीय नेतृत्वाशी सातत्याने संवाद साधत आंदोलनाचा दबाव कायम ठेवण्यात आला. अनेकदा शासनाने आश्वासने दिली, परंतु निर्णय लांबणीवर टाकले गेले. त्यावेळी संघटनांनी संप, मोर्चे आणि संघटित कृतींच्या माध्यमातून प्रश्न जिवंत ठेवला. शिक्षकांच्या हितासाठी दिलेला हा संघर्ष केवळ वेतनवाढीसाठी नव्हता, तर शिक्षण क्षेत्रातील सन्मान, सेवा सुरक्षितता आणि व्यावसायिक प्रतिष्ठा टिकवून ठेवण्यासाठीचा व्यापक लढा होता, असे या विशेषांकातून स्पष्ट होते.

(६)

### विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला सहाव्या वेतन आयोगासाठी चा संघर्ष

"विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी केलेला सहावा वेतन आयोगासाठीचा संघर्ष" हा NUTA Bulletin चा विशेषांक महाराष्ट्रातील विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकांनी आपल्या वेतन, सेवा हक्क आणि सन्मानासाठी दिलेल्या ऐतिहासिक लढ्याचा दस्तऐवज आहे. या विशेषांकात शासनाशी झालेला संघर्ष, राज्यव्यापी आंदोलने, न्यायालयीन लढाया, शासन निर्णयांमधील विसंगती आणि शिक्षक संघटनांच्या एकजुटीचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे.

विशेषांकानुसार, केंद्र सरकारने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर महाराष्ट्रातील शिक्षकांनाही त्या लागू व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन (MFUCTO), नुटा आणि विविध शिक्षक संघटनांनी मोठा संघर्ष उभारला. शासनाने २३ जुलै २००९ रोजी वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला असला तरी उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी त्या निर्णयात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा उल्लेख विशेषांकात करण्यात आला आहे. शिक्षकांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे भत्ते व सुविधा देण्याऐवजी काही लाभ कमी करण्याचा प्रयत्न झाला. यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता.

या संघर्षात आंदोलनांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ११ ऑगस्ट २००९ रोजी महाराष्ट्रभर शिक्षकांनी निदर्शने केली. अमरावती येथे हजारो शिक्षकांनी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आंदोलन केले. अनेक शिक्षकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आणि काही काळासाठी रोखून ठेवले. आंदोलनकर्त्यांनी शासनाच्या विरोधातील घोषणा देत शिक्षण व्यवस्थेतील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. या आंदोलनामुळे शासनावर मोठा दबाव निर्माण झाला.

विशेषांकात शासनाशी झालेल्या चर्चांचा सविस्तर उल्लेख आहे. शिक्षक संघटनांनी मुख्यमंत्री आणि उच्च शिक्षण मंत्र्यांशी अनेक बैठका घेतल्या. १६ ऑगस्ट २००९ रोजी झालेल्या चर्चेत शिक्षक प्रतिनिधींनी शासन निर्णयातील त्रुटी निदर्शनास आणून दिल्या. त्यानंतर शासनाने १२ ऑगस्ट २००९ च्या निर्णयात दुरुस्ती करून "ज्या बाबतीत शिक्षकांना अधिक लाभ मिळत असतील ते लाभ कायम राहतील" अशी महत्त्वपूर्ण तरतूद केली. हा बदल शिक्षकांच्या तीव्र आंदोलनामुळेच शक्य झाल्याचे विशेषांकात नमूद आहे.

या संघर्षातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे NET/SET मुक्त शिक्षकांचा प्रश्न. काही अधिकाऱ्यांनी NET/SET मुक्त शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाचे लाभ नाकारण्याचा प्रयत्न केला. शिक्षक संघटनांनी या भूमिकेला जोरदार विरोध केला. शासनस्तरावर अनेक बैठका झाल्या. शिक्षक प्रतिनिधींनी हा प्रश्न केवळ प्रशासकीय नसून सामाजिक न्यायाचा प्रश्न असल्याचे ठामपणे मांडले. अखेर शासनाला माघार घ्यावी लागली आणि NET/SET मुक्त शिक्षकांच्या प्रश्नावर सकारात्मक भूमिका घ्यावी लागली.

या संपूर्ण संघर्षात न्यायालयीन लढ्यालाही मोठे महत्त्व होते. शासनाच्या विसंगत निर्णयांविरोधात शिक्षक संघटनांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. वेतनश्रेणी, सेवा अटी, भत्ते आणि शिक्षकांच्या अधिकारांशी संबंधित अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयीन हस्तक्षेप झाला. न्यायालयांनी अनेक वेळा शासनाला शिक्षकांच्या हिताचे निर्णय घेण्याचे निर्देश दिले. या न्यायालयीन लढ्यामुळे शिक्षकांच्या मागण्यांना कायदेशीर बळ मिळाले आणि शासनावर दबाव वाढला. विशेषांकात या न्यायालयीन प्रक्रियांचा उल्लेख "शिक्षक चळवळीचा निर्णायक भाग" म्हणून करण्यात आला आहे.

विशेषांकात आंदोलनातील अनेक प्रसंग प्रभावीपणे मांडले आहेत. शिक्षकांनी राज्यभर मोर्चे, निदर्शने, धरणे आणि बैठका घेतल्या. काही ठिकाणी शिक्षकांना अटक झाली तर काही ठिकाणी शासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी करण्यात आली. शिक्षक संघटनांच्या नेतृत्वाने सातत्याने शासनाशी संघर्ष करत शिक्षकांचा आवाज बुलंद ठेवला. या चळवळीत संघटनात्मक एकजूट, कायदेशीर तयारी आणि आक्रमक आंदोलन यांचा प्रभावी संगम दिसून येतो.

प्रधान सचिव उच्च शिक्षण यांच्याविरोधात विशेष हक्कभंगाची सूचना दिनांक २५ मार्च २०१० रोजी विधान परिषद सदस्य प्रा.आ.बी.टी.देशमुख (भाऊ), आ.वसंतराव खोटरे, आ.विक्रम काळे यांनी दिली. मंत्रिमंडळ निर्णय घेतल्यानंतर १२ ऑगस्ट २००९ चा शासन निर्णय निर्गमित करताना मुद्दाम उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होईल अशी शब्दरचना शासन निर्णय निर्गमित करताना प्रधान सचिवांनी हेतूपूर्वक वापरल्याचे

उदाहरणासहित या विशेष हक्कभंगाच्या सूचनेमध्ये देण्यात आलेली आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अडवणूक करणे हे सहसंचालक कार्यापासून ते मंत्रालयीन सचिवापर्यंतची त्या काळातली परंपरा आजही चालू असल्याचे पहावयास मिळते.

या विशेषांकाचा मुख्य संदेश असा आहे की शिक्षकांचे वेतन आणि सेवा हक्क हे केवळ आर्थिक प्रश्न नसून शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंधित व्यापक सामाजिक प्रश्न आहेत. संघटित संघर्ष, आंदोलन आणि न्यायालयीन लढाई यांच्या माध्यमातून शिक्षकांनी शासनाला आपले निर्णय बदलण्यास भाग पाडले. त्यामुळे हा विशेषांक महाराष्ट्रातील शिक्षक चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरतो.

(७)

## सुधारित निवृत्तीवेतन योजना निषेध विशेषांक

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा 'सुधारित निवृत्तीवेतन योजना निषेध- विशेषांक' हा विशेषांक महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयानुसार व सर्व घटक संघटनांच्यावतीने प्रकाशित करण्यात आला आहे. या विशेषांकामध्ये शब्दबद्ध केलेले एकूण ४ लेख आहेत.

(१) कायमस्वरूपी १० टक्के वेतन कपात लादणारी सुधारित निवृत्तीवेतन योजना

(२) जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न हा सरळ सरळ शासन स्वामीत्वाधिकारीत धनाच्या वहन बळणाचा प्रश्न आहे

(३) भांडवली बाजारातील खेळाडू एका बाजूला व दुसऱ्या बाजूला आपले स्वतःचे कर्मचारी व शिक्षक

(४)जुनी पेन्शन योजना, नवीन पेन्शन योजना, आत्ता सुधारित नवीन पेन्शन योजना

या ४ लेखांमध्ये ब्रिटीशांच्या काळातील पेन्शन योजनेपासून ते २०२४ मध्ये विधानसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जाहीर झालेल्या सुधारित निवृत्तीवेतन योजनेचा संपूर्ण व सखोल विवेचन आलेले आहे. जे दि.०१ नोव्हेंबर २००५ नंतर व्यावसायिक जीवनामध्ये आलेल्या शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व शासकीय निमशासकीय कर्मचारी यांना मार्गदर्शक ठरणार आहे. सध्या सुरू असलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमध्ये (NPS) कर्मचाऱ्यांच्या कडून १० टक्के वेतन कपात ही कायमस्वरूपी केली जाते. महाविद्यालयीन पातळीवरील परिस्थिती पाहता डी.सी.पी.एस. ते एन.पी.ए.स ते यु.पी.एस. हा प्रवास होत असताना डी.सी.पी.एस. मध्ये जमा झालेली रक्कम त्याचे व्याज व डीसीपीएस खाते बंद करताना त्या खात्याचा हिशेब अद्यापही महाराष्ट्रातील अनेक प्राध्यापकांना मिळालेला नाही. ही बाब लक्षात घेता नव्या पेन्शनच्या योजनेच्या बाबतीत सुद्धा शासन किती गंभीर आहे हे लक्षात येते.

ब्रिटिशांनी सुद्धा त्यांच्या काळात त्यांच्या कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती नंतरची काळजी घेतलेली होती. इंडियन पेन्शन ॲक्ट, १८६७ मध्ये सुद्धा पेन्शन साठी कर्मचाऱ्यांच्याकडून वेतन कपात होत नव्हती. जुनी पेन्शन लागू करण्याच्या संदर्भात राज्यातील विविध आस्थापनावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन "VOTE FOR OPS" हे राबवलेले अभियान उल्लेखनीय होते. या अभियानाचे यश आज जरी प्रत्यक्षदर्शी नसले तरी भविष्यामध्ये ते दृष्टीक्षेपात येईल आणि स्वतःला जुनी पेन्शन लागू करणारे राज्यकर्ते आपल्या कर्मचाऱ्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू करतील. ही लढाई लोकन्यायालयात नक्की सुटेल. तशी काही उदाहरणे राजस्थान, पंजाब, छत्तीसगड, हिमाचल, झारखंड व सिक्कीम या राज्यांच्या संदर्भात पाहावयास मिळतात.

कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाची नोंद शासन दरबारी झाली नाही असे नाही. ऑक्टोबर २०२४ ची विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासनाने केंद्राचा कित्ता गिरवत कायदा न करता घाईघाईने मतपेटीवर डोळा ठेवून दिनांक २०.०९.२०२४ रोजी युनिफाईड पेन्शन स्कीम (यू.पी.एस) संदर्भात काढलेला शासन निर्णय कर्मचाऱ्यांची घोर निराशा करणारा ठरला. तिसऱ्या वेतन आयोगाचा प्रदीर्घ संघर्ष केल्यानंतर मिळालेली जुनी पेन्शन, सहाव्या वेतन आयोगात पूर्णपणे गमवावी लागली. ०१ नोव्हेंबर २००५ नंतर मात्र पूर्वी निवृत्त झालेले व आता निवृत्त होणारे असे भेदभाव करणारी व्यवस्था तयार झाली.

'पूर्वीचे व आत्ताचे' हा फरक होत असताना, सन २००५ पूर्वी जाहिरात आलेले, न्यायालयीन अधिकारी, घटनात्मक पद धारक, संरक्षण खात्यातील अधिकारी व सैनिक यांना जुनीच पेन्शन योजना लागू केली आहे. हा भेदभाव करताना राज्यकर्त्यांना संविधानाच्या अनुच्छेद १४ चा विसर पडला ही वस्तुस्थिती आहे.

नवीन पेन्शन योजना सुरु करताना, कर्मचाऱ्यांची १०% वेतन कपात व १४% शासन हिस्सा आता तो १८.५% होईल, शासनाने भांडवलदारांचा विचार केलेला दिसतो. भांडवलदारांना सामान्य जनतेच्या करातून मिळणारा पैसा मिळवून देणे व त्यांच्याकडून मिळणाऱ्या देणग्यांच्या आधारे आपला पक्ष व सत्ता यासाठी कसा उपयोग करता येईल याची अतिशय सखोल चर्चा तुमच्या लेखनात आली आहे. यापुढील काळात जेव्हा हा विषय न्यायालयात जाईल त्यावेळी याचिका करताना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना व या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना हा विशेष संदर्भ साधन म्हणून उपयोग होईल याची मला खात्री आहे.

काही राजकीय पक्षांनी याबाबत घेतलेली भूमिका नक्कीच कर्मचाऱ्यांच्या हिताची आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस -शरदचंद्र पवार गट यांनी महाविकास आघाडी व स्वतःच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात सुद्धा जुनी पेन्शन योजना लागू करू असे आश्वासित केले आहे. हे सुद्धा जुन्या पेन्शन योजने संदर्भातील उभ्या केलेल्या लढाईचे यश आहे.

सत्ता ही अशास्वत असते. ज्यांच्या साम्राज्यावरचा सूर्य मावळत नव्हता त्या इंग्रजांच्या गव्हर्नरचा साधर्म्य पोशाख आता लग्नाच्या वरातीत बँडवाले परिधान करत आहेत. सत्ताधाऱ्यांना या विषयाचे आज महत्त्व वाटत नसले तरी भविष्यात त्यांना जनांदोलनाच्या रेट्यामुळे सकारात्मक निर्णय घ्यावाच लागेल.

ज्या संघटना राज्य पातळीवर एकत्र येऊन फक्त जुन्या पेन्शनसाठी आंदोलन करतील त्यामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ सहभागी असेल अशी महासंघाची भूमिका आहे. राजस्थान सरकारने जेव्हा जुनी पेन्शन योजना लागू केली तेव्हा एम.फुक्टोचे अध्यक्ष डॉ.एस.पी.लवांडे सर व कार्यवाह डॉ.प्रवीण रघुवंशी सर यांनी २४ फेब्रुवारी २०२२ रोजी पत्र काढून या घोषणेचे स्वागत केले आहे. तसेच हे एम.फुक्टो. च्यावतीने ज्या ज्या ठिकाणी जुन्या पेन्शन साठी आंदोलने होतील त्या ठिकाणी स्वतः भेट देऊन एम.फुक्टो. ची भूमिका सांगून पाठिंबा व्यक्त केला व सक्रीय सहभाग घेतला आहे. याची सविस्तर नोंद अंकात घेतली आहे.

नवीन पेन्शन योजनेमध्ये कर्मचाऱ्यांची रक्कम गुंतवण्यासाठी जे मध्यस्थ नेमले आहेत ते आणि ज्या कंपन्यांमध्ये हे पैसे गुंतवले जाणार आहेत त्या कंपन्यासंदर्भात खात्री देण्याचे धाडस आज पर्यंत शासनाला झाले नाही. शेअर बाजारावर आधारित कंपन्यांचा इतिहास पाहिल्यास काही उदाहरणे व घोटाळे आपल्यासमोर आहेत. श्री हरिदास मुंदडा समभाग घोटाळा, श्री हर्षद मेहता समभाग घोटाळा, श्री केतन पारिख समभाग घोटाळा, या घोटाळ्यांनी अनेक ठेवीदारांना व गुंतवणुकदारांना मरण यातना दिल्या. काही गुंतवणूकदारांनी आपली जीवन यात्रा संपवली व काही बँका सुद्धा बुडाल्या. हा इतिहास डोळ्यासमोर असताना कर्मचाऱ्यांचे १०% व शासनाचे म्हणजेच सामान्य जनतेच्या करातून गोळा केलेले १४%, ही रक्कम शेअर बाजारात गुंतवण्याची धाडस शासन का करीत आहे? याचे उत्तर एकच आहे की, ही व्यवस्था आता भांडवलदारांच्या हिताची झाली असून सामान्य नोकरदारांना महत्त्व न देणारी व मतदारांना गृहीत धरणारी झाली आहे.

व्यावसायिक संघटनांनी राजकीय भूमिका घ्यायची किंवा नाही? याबाबत आदरणीय बी.टी.देशमुख (भाऊ) नी केलेले मार्गदर्शन आम्हाला दिशा देणारे आहे. व्यावसायिक संघटना या राजकीय पक्षांच्या बांधिलकी स्वीकारणाऱ्या असू नयेत, हे जरी खरे असले तरी आपल्या व्यावसायिक जीवनावर आघात करणाऱ्या राजकीय पक्षाच्या विरोधात व व्यावसायिक आघात परतवून लावण्यासाठी संघटनेच्या पाठीशी ठाम असणाऱ्या राजकीय पक्षाला पाठिंबा देण्याचे धाडस दाखवण्यात आपल्याला कमी पडून चालणार नाही. ही वस्तुस्थिती आहे .

हिमाचलप्रदेश मध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी कसे नियोजन करण्यात आले याचा १० कलमी कार्यक्रम मार्गदर्शक आहे. महाराष्ट्रातील संघटनांना तो नक्कीच उपयोगाचा आहे. आम जनतेच्या समोर हा प्रश्न नेऊन या प्रश्नाप्रती त्यांचा सहभाग व पाठिंबा मिळवणे हे काम तसे जिकीरीचे आहे. कारण आजची सामाजिक परिस्थिती पाहता, कर्मचाऱ्यांच्या प्रति सामाजिक सहानुभूती फारच कमी झाली आहे. त्याला अनेक कारणे आहेत. असे असले तरीही त्यासाठी सभा, बैठका, चर्चा, संमेलने इ.च्या माध्यमातून संघटनात्मक व सामाजिक बांधिलकी करण्याशिवाय पर्याय नाही.

दिनांक १२ डिसेंबर २०२३ रोजी, नागपूर येथील भव्य मोर्चा हे सर्व संघटनांच्या बांधणीचे फलश्रुती होती. या मोर्चामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष प्रा.डॉ.एस.पी. लवांडे सर व सेक्रेटरी प्रा.डॉ.प्रवीण रघुवंशी सर यांनी सहभागी घेऊन पाठिंबा दिला. तसेच राज्यभरातून हजारो प्राध्यापक या मोर्चामध्ये

सहभागी झाले होते.

माहितीच्या अधिकारात मिळालेली माहिती, राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (NPS) मधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती दर्शवते एनपीएस मध्ये सेवानिवृत्त झालेल्या २७०१ व्यक्ती पैकी २११८ व्यक्तींचे तपशील माहितीच्या अधिकारात अधिकृतपणे मिळवण्यात आलेले आहेत त्यामध्ये १२ व्यक्तींना पाचशे रुपये पेक्षा कमी निवृत्ती वेतन व निर्मला शर्मा यांच्या वाट्याला तर फक्त १४८.१७ पेन्शन आली आहे एनपीएस काय शेवट होणार आहे याचे हे महत्त्वाचे उदाहरण आहे. सेवेत असताना चांगल्या पगारामुळे 'आहे रे' (HAVES) गटात जगणारा लोकसेवक सेवानिवृत्तीनंतरचे वेतन पाहता 'नाही रे' (HAVE NOT) गटात जाणार हा केवढा मोठा बदल त्याला या पेन्शन योजनेमुळे सहन व्हावा लागणार आहे. लाडकी बहीण योजनेच्या ३०% रक्कम सुद्धा ३० वर्षे नोकरी करणाऱ्या लोकसेवकांना मिळत नाही ही वस्तुस्थिती या माहितीतून स्पष्ट होते. आपल्या नागरिकांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणाचे संरक्षण आणि प्रोत्साहन देणाऱ्या लोककल्याणकारी राज्याची संकल्पना राबवण्याची सुबुद्धी शासनकर्त्यांना मिळावी ही अपेक्षा करणे उचित ठरते. सन २००४ मध्ये पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या दोन राज्यांनी नवीन पेन्शन योजना स्वीकारली नाही हे धाडस इतर राज्याने दाखवले नाही ही वस्तुस्थिती आहे.

आदरणीय भाऊंच्या व्यक्तिगत जीवनाबद्दल फारशी माहिती प्राध्यापकांना व संघटनेमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना माहित नाहे. या विशेषांकाच्या माध्यमातून थोडीफार माहिती मला जाणून घेता आली. राजनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे प्रकरण हे गोर गरिबांचे तीर्थक्षेत्र आहे असे म्हणता येईल हे आदरणीय भाऊनी स्वतःच्या अनुभवासह मांडलेले आहे. यातून त्यांचे प्राथमिक शिक्षण, आर्थिक परिस्थिती, शिक्षक, पत्रकारिता क्षेत्रामध्ये केलेली सुरवात याविषयी माहिती मिळाली. मध्य प्रांत वऱ्हाड मधील मोर्शी तालुक्यातील भाऊंचे बेलोरा गांव, गावामधील 'जनपद' म्हणजे जिल्हा परिषद शाळा, बेलोरा शाळेत इंग्रजी सह शिक्षण घेताना भरावी लागणारी जादाची फी, मॉडेल स्कूल वर्धा, श्रद्धानंद बोर्डिंग, शिवाजी हायस्कूल ते विदर्भ महाविद्यालय, हा भाऊंचा शैक्षणिक प्रवास प्रेरणादायी आहे. विदर्भ महाविद्यालयात छात्र संघाचे अध्यक्ष, अमरावतीला 'दैनिक हिंदुस्थानचे' संस्थापक स्व.श्री बाळासाहेब मराठे साहेबांचे मार्गदर्शन व दैनिक हिंदुस्थानच्या पत्रकारितेमुळे त्यांच्या लेखणीला आलेली धार आम्ही अनुभवत आहोत.

जेम्स रॉबिन्सन व डेरॉन असेमोलगू यांचे "WHY NATIONS FAIL" पुस्तक नुकतेच वाचनात आले. या पुस्तकांमध्ये 'शोषण करणाऱ्या संस्था' (Extracting Institutions), ही संकल्पना सविस्तरपणे मांडलेली आहे. 'Why Nations Fails Today' तेरा क्रमांकाच्या प्रकरणांमध्ये "The most common reason why nations fails today is, because they have extractive institutions" हा महत्त्वाचा संदर्भ आला आहे. Extractive institution ची ३ महत्वाची वैशिष्टे या नव्या पेन्शन योजनेला लागू होतात.

(1) Limited access

(2) Exploitation of economic system

(3) Weak rule of law

या विशेषांकामध्ये दिलेले संदर्भ हे फक्त जुनी पेन्शन व नवीन पेन्शन एवढ्या पुरतेच मर्यादित नसून देशाच्या जडणघडणीमध्ये सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर भांडवलशाही कशी प्रभावी ठरू शकते याचे विवेचन करणारे आहेत हे 'निवडणूक रोखे कायद्याचा धुमाकूळ त्यातच दुखण्याचे मूळ' यावरील विवेचनावरून स्पष्ट होते. निवडणूक रोखे हे फक्त निवडणुकीचे अर्थकारण नसून शासन व्यवस्था प्रभावित करणारे व सत्ताधाऱ्यांचे राजकारण व विचारधारा प्रबळ करणारी व्यवस्था आहे हे आता सिद्ध झालेले आहे.

राजश्री छत्रपती शाहू महाराज व बडोद्याचे सयाजीराव महाराज गायकवाड यांनी लोकहितासाठी संस्थांच्या गंगाजळीचा केलेला उपयोग नक्कीच या राज्यकर्त्यांना मार्गदर्शक आहे. सध्या शासनाचा पैसा व धोरण फक्त मोजक्या कंपन्या, मोजकेच भांडवलदार व उद्योगपती यांच्या हितासाठी वापरला जात आहेत. तोच पैसा बहुजनांच्या हितासाठी कसा वळवायचा हा वैचारिक संघर्ष आता सुरू झालेला आहे.

"सेवानिवृत्तीनंतर पेन्शनचे महत्त्व डी.एस.नकारा प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे दिले आहे. जेवढ्या भक्ती भावाने मी माझ्या राजाची सेवा केली तेवढ्याच भक्ती भावाने मी ईश्वराची सेवा केली असती तर हे दुर्दैवाचे दशावतार पाहण्याची वेळ माझ्यावर आली नसती ही लोकसेवकांची भावना आणि जुनी पेन्शन योजना लागू करणे म्हणजे भविष्यात येणाऱ्या सरकारच्या विरोधात पाप करणे अशी शासन सल्लागाराची भूमिका. यामध्ये लोकसेवकांचे सेवानिवृत्ती नंतरचे जीवन अंधकारमय होणार आहे हे नक्की.

आपण कोणाचेही ऐकायचे नाही. मागणी नसताना योजना राबवायच्या आणि उभी हयात ज्या कर्मचाऱ्यांनी शासनाची सेवा केली त्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीच्या दुसऱ्या दिवशी आमच्या दारात पुन्हा दिसू नको, अशी कायदेशीर व्यवस्था करून ठेवायची ही राज्यकर्त्यांची अन्यायी प्रवृत्ती चीड आणणारी आहे. दि.०१ नोव्हेंबर, २००५ नंतर महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक व्यवसायामध्ये आलेल्या आम्हा सर्वांसाठी हा विशेषांक जुन्या पेन्शनच्या लढाईत 'ब्रह्मास्त्र' म्हणून उपयोगी येईल याची मला खात्री आहे.

**समारोप**

लेखामध्ये विशेषतः जुनी पेन्शन योजना, न्यायाधिकरणाची स्थापना, वेतन वितरण व्यवस्था आणि सहाव्या वेतन आयोगासाठी झालेला संघर्ष यांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. शिक्षकांना नियमित वेतन, सेवासुरक्षा आणि न्याय मिळवून देण्यासाठी नुटा, एम.फुक्टो. आणि विविध शिक्षक संघटनांनी केलेली आंदोलने, मोर्चे, उपोषणे आणि न्यायालयीन लढाया प्रभावीपणे मांडण्यात आल्या आहेत. आणीबाणीच्या काळातही प्राध्यापक महासंघाने शासनाविरोधात संघर्ष सुरू ठेवला, हे या चळवळीचे वैशिष्ट्य म्हणून नमूद केले आहे. त्याग, समर्पण आणि निष्ठा ही संघटनेच्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्या संघटनात्मक आयुष्यात वापरलेली त्रिसूत्री आहे.

शिक्षकांचे प्रश्न हे केवळ आर्थिक नसून शिक्षणाच्या गुणवत्तेशी आणि समाजाच्या भवितव्याशी संबंधित आहेत. संघटित संघर्ष, वैचारिक भूमिका आणि सातत्यपूर्ण चळवळीमुळेच शिक्षकांना न्याय, सन्मान आणि हक्क मिळाले. नुटा बुलेटीनने या सर्व संघर्षांचे दस्तऐवजीकरण करून पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी वारसा निर्माण केला आहे. त्यामुळे हे बुलेटीन शिक्षक चळवळीचा इतिहास, वर्तमान आणि भविष्य यांना जोडणारा महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरते.

मी शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) आणि महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एम.फुक्टो.) च्या वतीने या सुवर्णमहोत्सवी अंकास व नुटा बुलेटीनच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

## *नुटा बुलेटीनची सुवर्ण महोत्सवी विशेषांक मालिका*

'नुटा बुलेटीन'च्या प्रकाशनाला ५० वर्षे पूर्ण होत आलेली आहेत. नुटा बुलेटीन सुवर्ण जयंती विशेषांक मालिकेचे प्रकाशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत प्रकाशित करण्यात आलेले विशेषांक पुढीलप्रमाणे आहेत. :-

**(१)** विशेषांक पहिला, **"तद् विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः" "सतत प्रश्न विचारित राहणे विशेषांक"** पृष्ठ १ ते ८

**(२)** विशेषांक दुसरा, **संगणक शास्त्र या विषयाला दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीचे निर्मूलन - विशेषांक** पृष्ठ ९ ते २८

**(३)** विशेषांक तिसरा, **अपव्यवहारार्थ स्थळ निर्मिती करीत राहण्याचा उद्योग हाणून पाडणे - विशेषांक** पृष्ठ ३७ ते ६०

**(४)** विशेषांक चौथा, **युजीसी ड्राफ्ट रेग्युलेशन - विशेषांक** पृष्ठ ६१ ते ९२

**(५)** विशेषांक पाचवा, **लढवय्या गुरुवर्य - विशेषांक** पृष्ठ १०१ ते ११६

**(६)** विशेषांक सहावा, **सेवानिवृत्ती वेतन व्यवस्था विशेषांक** पृष्ठ १७३ ते २२८

**(७)** विशेषांक सातवा, **अमरावती वाढीव पाणीपुरवठा योजना विशेषांक** पृष्ठ २४१ ते ३३६

**(८)** विशेषांक आठवा, **'नुटा बुलेटीन'चा 'नुटा बुलेटीन'वरील सुवर्णवर्षीय विशेषांक** पृष्ठ ४९ ते ८०

हे सर्व अंक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. **- डॉ.प्रवीण रघुवंशी, अध्यक्ष, नुटा**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr.Mahendra V. Mete, 38, Ganediwal Layout, Camp, Amravati-444602. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 10.06.2026) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.06.2026**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

----------------------------------------------------

To,.........................................................................

...................................................................................

...................................................................................

...................................................................................